‘शतकांत एकच... सचिन’

**पुस्तकाचे दिमाखदार प्रकाशन**




# शब्द रुची


४८

जून २०२३ • मूल्य १० रु. • पृष्ठे ६०

प्रकाशक संघटनेचा
‘ग्रंथाली’ला पुरस्कार




के.ज. पुरोहित जन्मशताब्दी विशेषांक



Government of Maharashtra | MAGNETIC MAHARASHTRA #MadeForBusiness | MAKE IN INDIA | 75 Azadi Ka Amrit Mahotsav

# मॅग्नेटिक महाराष्ट्र



## प्रमुख औद्योगिक समूह

- **मुंबई–ठाणे–रायगड । १५००० एकर**
  अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन उद्योग व सुटे भाग । रसायने । औषधनिर्माण
- **पुणे–चाकण–तळेगाव–सातारा । ८००० एकर**
  डाटा सेंटर । रत्ने व आभूषणे । अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम लॉजिस्टिक्स
- **नाशिक–मालेगाव–अहमदनगर । ५००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वैद्यकीय उपकरण । इएसडीएम । अभियांत्रिकी
- **औरंगाबाद (AURIC, DMIC) – जालना । ८००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम । वस्त्रोद्योग
- **नागपूर– अमरावती । ४००० एकर**
  अंतराळ आणि संरक्षण । अभियांत्रिकी । वस्त्रोद्योग । अन्न प्रक्रिया
- **रत्नागिरी – सिंधुदुर्ग । ५,१५० एकर**
  अभियांत्रिकी । रसायने । तेल आणि नैसर्गिक वायू । शेती व अन्न प्रक्रिया । सागरी उत्पादने

## महाराष्ट्र : देशाचे आर्थिक शक्तीकेंद्र

- **भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था**
  महाराष्ट्राचे एकूण देशांतर्गत उत्पादन मूल्य ४२० अब्ज डॉलर्स; भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनामध्ये १४.२% योगदान
- **थेट परदेशी गुंतवणूकीमध्ये सर्वाधिक वाटा**
  एप्रिल २००० ते मार्च २०२३ या कालावधीत १८९ बिलियन डॉलर्स थेट परदेशी गुंतवणुकीस आकर्षित केले. भारताच्या एकूण वाट्यात ३०% योगदान.
- **उत्पादनात अग्रेसर**
  भारताच्या एकूण औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचे १३.८% योगदान
- **IPRS मध्ये सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे**
  केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत (DPIIT) इंडस्ट्रियल पार्क रेटिंग सिस्टीम (IPRS) अहवालानुसार महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे
- **उत्तम कायदा व सुव्यवस्था**
  महाराष्ट्र राज्य हे प्रगतिक प्रशासन व धोरण सातत्यासाठी ओळखले जाते.
- **निर्यातीत अग्रस्थानी**
  महाराष्ट्राचे निर्यात मूल्य सर्वाधिक आहे. भारताच्या एकूण निर्यातीत १६% योगदान.
- **सर्वोत्तम गुणवत्तेचे मनुष्यबळ**
  भारतातील सर्वाधिक म्हणजे ७०% रोजगार क्षमता गुणवत्ता महाराष्ट्रात आहे.
- **समृद्ध पायाभूत सुविधा**
  ४ आंतरराष्ट्रीय आणि १३ देशांतर्गत विमानतळ, २ प्रमुख व ४८ लहान बंदरे आणि सर्वाधिक ऊर्जा क्षमता.

## एकूण गुंतवणूकीस चालना – रु ९,४५,३४९ कोटी

**सामंजस्य करार – रु. ४,१७,८३५ कोटी**
(जून २०२० – जून २०२३)

**थेट परदेशी गुंतवणूक – रु. ४,०७,३२८ कोटी**
(ऑक्टोबर २०१९ – मार्च २०२३)

**नियमित गुंतवणूक – रु १,२०,१८६ कोटी**
(डिसेंबर २०२० पासून)

**वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२३ – प्रमुख कॉरिडॉर भागीदारांबरोबर धोरणात्मक गुंतवणूक सहकार्य करार:**

- स्वीस इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स इंडिया
- बर्कले विद्यापीठ
- सेंटर फॉर न्यू इकॉनॉमी अँड सोसायटी
- द वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम्स प्लॅटफॉर्म फॉर शेपिंग द फ्युचर ऑफ अर्बन ट्रान्सफॉर्मेशन

## प्रमुख सुधारणा

१. **प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा**
एमएसएमईसाठी राखीव असलेल्या क्षेत्रातून २५% क्षेत्र (तब्बल १११२.५ एकर) प्लग अँड प्ले डेव्हलपमेंटसाठी आरक्षित केले जाईल.
महाराष्ट्र प्लग अँड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर आणि कॅप्टिव्ह विक्रेत्यांसाठी परवडणाऱ्या भाड्याने शेड, सोयी – सुविधा, एक्स–पॅट हाऊसिंग आणि मॉड्युलर स्पेस १००% अनुकूल इकोसिस्टमसह वापरण्यास तयार असलेल्या पायाभूत सुविधांचा वापर करण्यासाठी गुंतवणूकदारांना थेट वाटप ऑफर करतो.

४. **गुंतवणूकदार प्रथम योजना– १४९ करार भागीदारांसाठी नेमणूक १० गुंतवणूक सहकारी**
संपूर्ण देखरेख आणि गुंतवणूकदारांना अविरतपणे आवश्यक सहाय्य पुरविण्याच्या उद्देशाने रिलेशनशिप मॅनेजर (आरएम) आणि रिलेशनशिप एक्झिक्युटिव्ह (आरइ) नियुक्त करण्यात आले आहेत.

## गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी

उद्योग विभागाने एमआयडीसीसोबत जून २०२० ते जून २०२३ या कालावधीत रु. ४,१७,८३५ कोटी रुपयांचे १४९ सामंजस्य करार केले आणि ५,६९,४७६ ची संभाव्य रोजगारांची निर्मिती केली.

- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जून व जुलै २०२० – रु १७,६८६ कोटी । १४,०२५ रोजगार**
  सामंजस्य करार– १५ । आधारभूत क्षेत्रे – रसायने, वाहन, इएसडीएम, तेल आणि वायू । प्रमुख राष्ट्रे – युएसए, जपान, सिंगापूर, दक्षिण कोरिया
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२० – रु ३४,८२९ कोटी । २३,१८२ रोजगार**
  सामंजस्य करार– १५ । आधारभूत क्षेत्रे – डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे – स्पेन, युनायटेड किंगडम, जपान, सिंगापूर, भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२० – रु ६१,०४२ कोटी । २,५५,३८० रोजगार**
  सामंजस्य करार– २५ । आधारभूत क्षेत्रे – डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे – भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जुलै २०२१ – रु १६,५०० कोटी । ५,००० रोजगार**
  सामंजस्य करार– २ । आधारभूत क्षेत्रे – तेल आणि नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे – ऑस्ट्रेलिया, भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, सप्टेंबर २०२१ – रु ३५,५०० कोटी । १०,००० रोजगार**
  सामंजस्य करार–२ । आधारभूत क्षेत्रे – अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे – भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, ऑक्टोबर २०२१ – रु २,८२३ कोटी । १,२५० रोजगार**
  सामंजस्य करार– १ । आधारभूत क्षेत्रे – विद्युत वाहने । प्रमुख राष्ट्रे – युके.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२१ – दुबई एक्स्पो २०२० – रु १५,६१७ कोटी । ११,३८५ रोजगार**
  सामंजस्य करार–२५ । आधारभूत क्षेत्रे – लॉजिस्टिक, ऑटो कॉम्पोनंट्स, ऑक्सिजन मॅन्युफॅक्चरिंग, डेटा सेंटर्स, जैवइंधन । प्रमुख राष्ट्रे – जपान, सिंगापूर, स्वीडन, कोरिया, जर्मनी, इटली व भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२१ व जानेवारी २०२२ रु ५,५१२ कोटी । ९,९८० रोजगार**
  सामंजस्य करार– १३ । आधारभूत क्षेत्रे – जैव–इंधन, IT/ITES, तांत्रिक वस्त्र, रसायने, ऑटो, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे – फ्रान्स आणि भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, मे २०२२ रु ८०,४७९.७८ कोटी । ९६,७०५ रोजगार**
  सामंजस्य करार– २५ । आधारभूत क्षेत्रे – आयटी पार्क, आयटी – आयटीइएस आणि डेटा केंद्रे, वस्त्रोद्योग, अन्न प्रक्रिया, पेपर आणि पल्प, अभियांत्रिकी आणि पोलाद, अक्षय ऊर्जा, लॉजिस्टिक, तेल व वायू । प्रमुख देश – सिंगापूर, इंडोनेशिया, यूएसए, दक्षिण कोरिया आणि जपान.
- **जेएसडब्ल्यू एनर्जी, सप्टेंबर २०२२ रु. ४,१९६ कोटी**
  सामंजस्य करार – १ आधारभूत क्षेत्र – ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे – भारत
- **जागतिक आर्थिक मंच २०२३, जानेवारी २०२३ रु. १,३७,६६६ कोटी (१७ अब्ज अमेरिकन डॉलर्स) । १,०१,३८९ रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या–१९ । प्रमुख क्षेत्रे– ऊर्जा, उच्च तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा उद्योग, पोलाद उत्पादन, कृषी आणि अन्न प्रक्रिया, आयटी/फिनटेक/डेटा सेंटर । प्रमुख राष्ट्रे भारत, पोर्तुगाल, जपान, यूएसए, मॉरिशस, नेदरलँड, फिनलँड, सिंगापूर, कॅनडा, तैवान, लक्झेंबर्ग, इस्रायल, कोरिया, जर्मनी.
- **आयएफसीसीआय, इन्व्हेस्ट इन महाराष्ट्र, एप्रिल २०२३ रु. ९६७ कोटी । ११८० रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या– ५ । प्रमुख क्षेत्रे – इलेक्ट्रिक वाहने, ऑटोमोबाईल, वैद्यकीय उपकरणे, आरोग्य, अन्न प्रक्रिया.
- **बजाज फिनसर्व्ह लिमिटेड, जून २०२३ रु. ५००० कोटी । ४०,००० रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या – १ । क्षेत्र – आर्थिक सेवा । देश – भारत

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION
।। उद्यमात् सकल समृध्दिः ।।
MIDC

मुख्य कार्यालय:
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
उद्योग सारथी, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९३
**वेबसाईट:** www.midcindia.org

प्रमुख कार्यालय:
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
४ (ए), १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर कॉम्प्लेक्स १, कफ परेड, कुलाबा, मुंबई– ४०० ००५.
**वेबसाईट:** www.midcindia.org

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची ४८

**जून २०२३, वर्ष दहावे**
**अंक दुसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
अतिथी संपादक : **डॉ. सुरेखा सबनीस**
संपादनसाहाय्य : **डॉ. निर्मोही फडके**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

कथाकार शांताराम जन्मशताब्दी विशेष लेख

**'दीपत्कार' – शांतारामांची कथा / ५**
**डॉ. उषा देशमुख / ९**
**डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी / १२**
**डॉ. रविन थत्ते / १५**
**डॉ. रवींद्र शोभणे / १७**
**प्रा. उषा तांबे / २१**
**प्रकाश एदलाबादकर / २४**
**डॉ. पांडुरंग भानुशाली / २७**
**नीला उपाध्ये / ३१**

### नियमित सदरे

**संजीवनी खेर / ३५**
**विनता कुलकर्णी / ३८**
**शरद काळे / ४१**
**किरण येले / ४६**

**वृत्तांत / ५०**

**ग्रंथपरिचय – डॉ. निर्मोही फडके / ५४**

**ग्रंथपाने – चांगदेव काळे / ५५**

# संपादकीय...

'कथा' हा मराठी भाषेतील सर्वाधिक लोकप्रिय वाङ्मयप्रकार; संस्कृत-प्राकृतची पूर्वपरंपरा घेऊन आणि मौखिक वाङ्मयातील सत्त्व स्वीकारून दीर्घकाल टिकून राहिलेला हा अस्सल देशी वाङ्मयप्रकार. आधुनिक मराठी साहित्यात हा वाङ्मयप्रकार 'लघुकथा' म्हणून रूढ झाला. वाचकप्रिय ठरला. हरिभाऊंपासून ज्या अनेक समर्थ कथाकारांनी मराठी कथाविश्व समृद्ध केले त्यापैकी एक नामवंत कथाकार म्हणजे शांताराम. २०२२-२०२३ हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष. 'शांताराम' हे नाव घेऊन आणि 'भेदरेखा' ही पहिली कथा लिहून सळसळत्या उत्साहाचे रूप असणाऱ्या के.जे. पुरोहित या तरुणाने कथालेखक म्हणून साहित्याच्या क्षेत्रात पाऊल टाकले ते १९४१ मध्ये. पुढे १९११ पर्यंत त्यांच्या कथालेखनाची सत्तर वर्षांची दीर्घ वाटचाल संथगतीने मात्र सातत्याने होत राहिली आणि मराठी साहित्यविश्वात उत्कृष्ट कथांची भर पडत गेली. दर्जेदार कथांचे देणे देणाऱ्या या कथाकाराचे कृतज्ञतेने आणि प्रेमादराने स्मरण करावे यासाठी 'शब्द रुची'च्या या विशेष अंकाचे आयोजन करण्यात आले आहे.

जुन्या-नव्या कथेच्या संधिकाळातली शांतारामांची कथा, माणसाच्या आयुष्यातील नानाविध प्रश्नांचा शोध घेणारी खऱ्याखुऱ्या अर्थाने 'जमिनीवरच्या माणसांची कथा' ठरली. दर्जेदार नियतकालिकांतून ही कथा वाचकांपर्यंत पोहोचली. समीक्षकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. 'संत्र्याचा बाग', 'मनमोर', 'शिरवा', 'अंधारवाट', 'उद्विग्न सरोवर', 'रेलाँ रेलाँ' आदी सतरा कथासंग्रहांतून प्रकाशित झालेल्या आणि संग्रहित न झालेल्या शांतारामांच्या कथा ह्या माणसांच्या मूलभूत प्रेरणांची दखल घेणाऱ्या कथा म्हणून सदैव ताज्या टवटवीत राहिल्या. सात दशके ओलांडूनही कालबाह्य ठरल्या नाहीत. विशिष्ट विचारप्रणाली, एखादी तात्त्विक भूमिका समोर ठेवून त्यांनी कथा लिहिली नाही. ठरावीक नीतीकल्पनांचा आग्रह धरला नाही. कोणत्याही 'इझम'चा झेंडा न मिरवता स्त्रियांच्या प्रश्नांपासून विस्थापितांच्या जीवनजाणिवांपर्यंतचे आणि नातेसंबंधांतील गुंतागुंतीपासून माणसाच्या एकाकीपणापर्यंतचे सर्व बारकावे शांतारामांची कथा टिपत गेली. नानाविध वृत्ती-प्रवृत्तींची माणसे, त्यांचे सामाजिक स्तर, जातिधर्मांची भिन्नता आणि यामुळे सामोरे येणारे वास्तव शांतारामांची कथा यथार्थपणे मांडत गेली. कधी प्रतीक-कथांमधून तर कधी संवादांतून. कधी 'गोष्ट सांगत' तर कधी प्रश्न उपस्थित करत. कधी ओघवत्या निवेदनातून तर कधी सखोल आत्मसंवादातून.

शांतारामांच्या कथावैशिष्ट्यांवर अधिक प्रकाश टाकणारे, त्यांच्या कथालेखनाकडे चिकित्सक दृष्टीने पाहून केलेले जाणकारांचे लेखन या अंकात आहे. जमिनीवरच्या माणसांची कथा लिहिणाऱ्या चिंतनशील वृत्तीच्या शांतारामांनी आपल्या दिलखुलास व्यक्तिमत्त्वाने अनेक माणसे जोडली. या अंकातील लेखांमधून याचाही प्रत्यय येईल. कौटुंबिक नातेसंबंध, गुरू-शिष्य नातेसंबंध, वाचक, समीक्षक, अभ्यासक अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर जोडल्या गेलेल्या अनेक माणसांपैकी काही मान्यवरांनी या अंकात शांतारामांच्या व्यक्तित्वाचे विविध पैलू उलगडून दाखवले आहेत. के.ज. पुरोहित - कथाकार शांताराम - यांच्याविषयी या मान्यवरांच्या मनात सदैव जागे असणारे प्रेमादराचे भाव आणि त्यांच्या कथेचे मोल विशद करण्यामागील कृतज्ञबुद्धी यामुळे 'शब्द रुची'च्या या अंकाला जे भरीव रूप प्राप्त झाले आहे त्याबद्दल अतिथी संपादक या नात्याने या सर्वांप्रती मन:पूर्वक आभार व्यक्त करत आहे.

'शब्द रुची'ची नियमित सदरे या अंकात वाचकांच्या भेटीसाठी आहेतच. एका नामवंत कथाकाराची स्मृती जपणारा अंक म्हणून हा अंक विशेष ठरावा. साहित्यजगताशी असणाऱ्या आपल्या अतूट स्नेहबंधाची 'ग्रंथाली' परिवाराने दिलेली ही एक वाचनीय साक्ष आहे. सदर अंकाचे संपादन करण्याची सुखद जबाबदारी माझ्यावर सोपवल्याबद्दल 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि 'शब्द रुची'चे संपादक अरुण जोशी यांचे विशेष आभार. सहसंपादक डॉ. निर्मोही फडके यांचेही आभार.

**- डॉ. सुरेखा सबनीस**
**अतिथी संपादक**
surekhass53@gmail.com



**के.ज. पुरोहित**
**(कथाकार शांताराम)**

# दीपत्कार

'दीपत्कार' ही शांतारामांची कथा 'सत्यकथा'च्या नोव्हेंबर १९५१च्या अंकात प्रसिद्ध झाली. पुढे १९६२मध्ये प्रकाशित झालेल्या 'धर्म' या त्यांच्या कथासंग्रहात ती समाविष्ट झाली. ही शांतारामांची एक अगदी वेगळ्या स्वरूपाची कथा. या कथेला रूढार्थाने कथानक नाही. ठसठशीत व्यक्तिरेखा नाहीत. या कथेचा एकूण भर वातावरणनिर्मितीवर आहे. काही घटना-प्रसंगांच्या आधारे आणि त्याहूनही अधिक भाषाशैलीच्या आधारे शांतारामांनी ही कथा फुलवत नेली आहे. सर्वसाधारणपणे त्यांची कथा जाणीवपूर्वक भाषेत गुंतलेली दिसत नाही. मात्र 'दीपत्कार' याला अपवाद आहे. प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीने मांडलेल्या या कथेत वैशिष्ट्यपूर्ण ठरावा असा भाषिक ओघ आहे. प्रसंगांची गतिमानता पकडत शब्दांच्या विशिष्ट लयीत निवेदन कथेला पुढे नेते. एरवी शांतारामांच्या कथेत निवेदनपद्धती कोणतीही असली तरी संवादांना विशेष प्राधान्य असते. या कथेत मात्र अगदी शेवटी येणारे मोजके संवाद सोडले, तर ही कथा संवादांकडे पूर्ण पाठ फिरवलेली अशी, शांतारामांच्या एकूण कथालेखनात वेगळी ठरते. ही कथा म्हणजे विशिष्ट अनुभवांची, त्या अनुभवांनुरूप शब्दकळा योजून केलेली भाषिक अभिव्यक्ती आहे. काहीतरी आत मनात घडत असते आणि काहीतरी बाहेर जनलोकांत घडत असते. या दोन्ही स्तरांवरची घटिते कार्यकारणभावाने परस्परांशी बांधलेली आहेत. हा एकसंघ पीळ आहे. हा पीळ बसत जाणे आणि उलगडत जाणे हे शांतारामांनी आपल्या शब्दसामर्थ्याच्या आधारे सहजी दाखवून दिले आहे. माणसाच्या मनाला तळाशी दडून बसलेल्या अंधाराची आणि त्या अंधाराच्या भयाला दूर सारणाऱ्या संस्कारांच्या दीपत्काराची ही कथा शांतारामांनी आपल्या शब्दांच्या ताकदीने दृश्यरूप केली आहे.

**पाच** दिवस आणि पाच रात्री मनाची भयंकर कुचंबणा सहन केल्यावर, अतृप्त इच्छांचे कढ अगदी असह्य झाल्यावर, सहाव्या रात्री मी आणि माझ्या मित्रानं त्या ललितकलांच्या मंडपात एकदाचा प्रवेश केला. पैसे खर्चून आत जाण्याची माझी ऐपत नव्हती. पोटाला चिमटा घेऊन हृदयाची भूक शमवण्याचं मी आणखीही कदाचित टाळलं असतं. जशा पाच रात्री तळमळत घालवल्या, तशाच आणखी दोन उरलेल्या रात्रीही घालवल्या असत्या. पण संयमाचे बांध तुटले, आत्मक्लेशाची परमावधी झाली आणि शेवटी खर्चाची तमा न बाळगता मी त्या समारंभाच्या मंडपात पाऊल टाकलं... माझ्या मित्रानं जरी स्वत:च्या इच्छांवर विजय मिळवला असता, तरीदेखील त्या आनंदोत्सवापासून मी दूर राहू शकलो नसतो आणि राहिलो असतो, तरी तळमळत, विव्हळत - किती दिवस, किती रात्री कुणाला ठाऊक. सुखाच्या तीरावर नुसतं उभं राहायचं आणि कोरडं परतायचं असं आम्ही किती दिवस करणार-करू शकणार? पाच दिवस मनाला लगाम घातला, तो आणखी किती ओढायचा? जास्त ओढला तर लगाम तुटायचा आणि मनाचा वारू चौफेर उधळायचा.

संध्याकाळ झाली की मंडपात असंख्य दीप जाळतात. आसमंत उजळून निघे; पण आम्हा दोघांची मनं अंधारून येत. मंडपात चाललेला संगीतसोहळा, नाट्यमहोत्सव, नृत्यपर्वणी पाहण्याची आमची कितीही इच्छा असली, तरी त्या मंडपाचे रूपेरी अडसर दूर करण्याचं सामर्थ्य आमच्यात नव्हतं. दुपारचं आपलं काम कसंबसं आटोपून आम्ही आपल्या खुराड्यात धापा टाकत आलो, की घाईघाईत पोटाच्या खळगीत कदान्नाचे चार घास घालत असू व पळतपळत त्या मंडपाकडे येत असू. मंडपापर्यंत धावत यायचं आणि मंडपाबाहेर थांबायचं. दीर्घ श्वास घेत तेथील दृश्य बघायचं. वेगात लहानमोठ्या मोटारी येत व पक्ष्यासारख्या थांबत. इतर वाहनं झरझर येत आणि निघून जात. प्रसन्न मुखानं नरनारी वाहनांतून उतरत आणि

मजेत मंडपात निघून जात. अनेक पायी येत, पण मस्तीत आत जात. मी आणि माझा मित्र अतृप्त आत्म्यासारखे मंडपाभोवती घिरट्या घालत असू. प्रत्येकाच्या वेषभूषेत अभिरुची असे, ऐट असे. प्रत्येकानं ठेवणीतले कपडे अंगावर चढवलेले दिसत. ज्यांचे कपडे साधे होते, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उत्साहाची, आनंदाची, बेफिकिरीची वस्त्रे असत; त्यामुळे तेही उठून दिसत. बराच वेळ आतील उत्सुक कुजबुज आणि बाहेरील धावपळीचा कोलाहल एकमेकांना साथ करत. हळूहळू आतील आवाज नरम होत, शांत होत. बाहेर मोटारचे कर्णे, रिक्षावाल्यांची ओरड, दुकानदारांचा गोंधळ कान बधिर करत. नंतर बाहेरचा गलका ओसरू लागे आणि आत चाललेल्या उत्सवाचे पडसाद आमच्या कानांवर येऊन पडत. तंतुवाद्यांचे स्वर आमच्यापर्यंत लाजत येत आणि आम्हाला हलकेच भुरळ घालत. मृदंगाचे बोल थबकत आमच्यापर्यंत येत आणि आम्हाला हलकेच धक्का देत. घुंगरांची रुणझुण आमच्यापर्यंत चोरपावलांनी येई आणि आमच्या कानांत गुजगोष्टी करू लागे. नाटकांतील भाषण आणि गाणी आमच्यापर्यंत अलगद येत, ओठांना गुदगुल्या करत. हळूहळू आमच्या मनातले दीप उजळत, लकाकू लागत, तकाकू लागत.

कार्यक्रम संपला की सगळी गर्दी मंडपाबाहेर उसळून येई आणि धुंदीत डुलत झुलत निघून जाई. मंडपातले आणि आमच्या मनातले दिवे विझून जात. हृदय हवेत गरगरे आणि पाय जमिनीवर रखडत घेऊन असं भंगलेलं व्यक्तित्व घेऊन आम्ही आपल्या खुराड्यात परत येत असू. दुपारभर काम करताकरता तडा गेलेलं व्यक्तित्व आम्ही कसंबसं जोडत असू आणि रात्री पुन्हा ते ललितकलांच्या त्या नाजूक प्रहारांनी तोडत असू. पाच दिवस आणि पाच रात्री आम्ही दोघं अतृप्त वासनांसारखे भिरभिरलो आणि भडकलो. वाटे, धक्काबुक्की करून मंडपात शिरावं, ऐटीत पुढं जाऊन बसावं आणि रसास्वाद घ्यावा. दिमाखानं आत जाणाऱ्या एखाद्या धनिकाला ओढावं आणि त्याचं तिकीट घेऊन आत घुसावं, नाहीतर स्वरांच्या शांत समुद्रात डुंबत असलेल्या त्या मंडपाला आग लावावी व सैरावैरा पळणाऱ्यांकडे पाहून खदाखदा हसावं. काहींनी तसं करण्याचा प्रयत्नसुद्धा केला. एकदोनदा मंडपाला तुरळक आगी लागल्या. दोनचारदा मंडपाला धक्के देण्यात आले. पाचदहादा दगड भिरकावण्यात आले. पण आम्ही दोघांनी यापैकी काही केलं नाही. तेवढं धैर्य आमच्याजवळ नव्हतं. तेवढा वाईटपणा आमच्याजवळ नव्हता. आम्ही दोघंही अशक्त होतो, गरीब होतो, भित्रे होतो. शेवटी आम्ही दोघांनीही पैशांचं अवसान आणलं आणि पैसे खर्चून मंडपात प्रवेश केला.

मंडपात आम्ही प्रवेश केल्यावर आतल्या स्वयंसेवकांनी आम्हाला आमची जागा दाखवली ती इतक्या तुच्छतेनं, की जणू भिकार भोजनाला आलेल्या भिकाऱ्यांनाच त्यांच्या जागा दाखवण्यात येत होत्या. पैसे खर्चूनही आम्हाला किंमत नव्हती. आपल्या जागेवर बसल्याबसल्या आम्हाला वाटू लागलं आपण या वैभवशाली जगाचे रहिवासी नाहीच-कधीही नव्हतो, होणार नाही. आपली खरी जागा बाहेर-किनाऱ्यावर. बसल्याबसल्या आम्ही माना उंचावून समोरचं दृश्य बघू लागलो आणि आम्हाला वाटलं, परत बाहेर जावं. तिथं निदान मोकळी हवा मिळेल. जीव तरी गुदमरणार नाही. पण आम्ही पैसे खर्च केले होते. महिन्याच्या संसाराला आम्ही भोक पाडलंच होतं. आता मनालाही भोकं पडू लागली. ती बुजणार असतील तर इथंच.

नटूनथटून आलेल्या स्त्रीपुरुषांच्या रांगा मंडपात झिरपत होत्या आणि रंगीत तुषारांसारख्या फुटत होत्या. रिकाम्या खुर्च्यांवर रंगीबेरंगी ठिपके बसलेले आणि सगळा मंडप अनेक रंगांच्या लहानमोठ्या फुलांनी बहरून आलेल्या उपवनासारखा दिसू लागला; पण फुलांचा वास मोहक नव्हता. निरनिराळ्या प्रकारची देशी-विदेशी प्रसाधनं-तेलं, पावडर, रंगरंगोटी-निरनिराळ्या प्रकारच्या चैनी सिगारेट, चिरूट, मद्य अशा सर्वांच्या मिश्र विसंगत वास हवेत दाटू लागला आणि श्वास कोंडू लागला.

मंडपातल्या प्रेक्षकांचे उनी, रेशमी, झगमगीत, सुळसुळ करणारे कपडे, त्यांच्या चित्रविचित्र तऱ्हा आणि रंग, त्यांचं एकमेकांकडे पाहून हसणं, खिदळणं, डोळे उडवणं, खांदे घुसळणं, त्यांचं बोलणं आणि बडबडणं - या सगळ्या गोष्टी मी बाहेरच्या जगात अनेकदा बघितल्या होत्या. त्यातल्या कित्येक मला आवडल्या होत्या. शक्य असतं तर त्यापैकी काही मी आत्मसात केल्या असत्या. आणि तरीही त्यांचं हे संमेलन माझ्या डोळ्यांवर येत होतं, खुपत होतं. त्या संमेलनाचे सुटे भाग मला कदाचित आवडले असते; पण त्यांचं हे सलग रूप मला उन्मत्तकारी वाटलं, अपमानास्पद वाटलं, तापदायक वाटलं, आणि तरीही तिथून उठून जावंसं मला वाटेना. त्या दृश्यात मी रंगत होतो आणि गुदमरत होतो. तो मिश्र अनुभव मला सहन होत नव्हता आणि तरीही माझे कान, माझे डोळे, माझं सगळं व्यक्तित्वच जागृत झालं होतं. दिव्याचा प्रखर प्रकाश मला दीपवत होता आणि तरीही मी डोळे मिटत नव्हतो. एखाद्या तरुणीनं शेजारच्या तरुणाला मारलेली हाक मला ऐकू येत होती. एखाद्या गुलहौशी मनुष्यानं दुसऱ्याला केलेली खूण मला दिसत होती. अस्पष्ट हालचालींचे अर्थ मला स्पष्ट होत होते. मला ते आवडत नव्हते. त्या वातावरणातील आढ्यता मला पसंत नव्हती. दर्प मला नको होता. त्यातील विसंगती मी विसरू शकत नव्हतो - आणि तरीही न आवडणाऱ्या त्या दृश्यात, त्या आवाजात मी रमत होतो - अनिच्छेनं पण निश्चितपणं. धनगराच्या पोरानं मखमली गादीवर लोळावं आणि कढावं तसा मी त्या वातावरणात खोल खोल शिरत होतो आणि तडफडत होतो.

मंडपातला गलबला हळूहळू शांत होऊ लागला. रंगमंचकावरील पडद्यावर प्रकाशाचे झोत पडले. उत्सुकतेनं हायसेपणाचे उसासे टाकले आणि सगळा मंडप एकदम स्तब्ध झाला. रंगमंचकावरील पडदा वर गेला आणि लोकांनी टाळ्या पिटल्या. बजवय्याच्या मध्यभागी बसलेल्या गायिकेनं श्रोत्यांना किंचित लवून अभिवादन केलं. वाद्यांच्या घरट्यातून सुरांचे पक्षी बाहेर पडले आणि मंडपात विहरू लागले, खेळू लागले, किलबिल करू लागले. त्या सुरांच्या साथीला गायिकेचा मधुर स्वर धावू लागला आणि तंतुवाद्य व तिचा गोड गळा एकमेकांशी फेर धरू लागले, पाठशिवण खेळू लागले, हूल देऊ लागले, आलिंगन देऊ लागले... सूरसागराच्या लाटा माझ्या पायाशी लोळू लागल्या, घोळू लागल्या, मला भिजवू लागल्या, ओलाचिंब करू लागल्या. मी शांत झालो. शांतीत न्हाऊ लागलो, पोहू लागलो. आनंदानं मी मोहरू लागलो. मघाचा माझा विद्वेष संपला, तडफड संपली. मघा माझ्या डोळ्यांना नको झालेली दृश्यं मला तोषवू लागली. स्त्रियांच्या उंची साड्यांचे फडफडणारे पदर माझ्या मनाला पंख्यासारखा वारा घालू लागले. त्यांचे रंग, त्यावरील फुलं, ठिपके, वेलबुट्टी सगळंसगळं मला आवडू लागलं. अधूनमधून त्या बावरल्यासारख्या किंकाळत, तेही मला आवडू लागलं. मघाशी मला गुदमरून टाकणारा तो मिश्र वास मला आवडू लागला. तंबाखूचा, मधाचा. रंग, आकार, वास सगळे एकमेकांशी सुसंगत वाटू लागले. गाण्याच्या त्या मैफलीला हे सगळं हवंच असं मला वाटू लागलं. माझं शरीर सगळ्यांच्या बरोबर कंप पावत होतं, हलत होतं. गायिका समेवर आली, की साऱ्यांच्या माना एकदम लवत - जणू शरीरं अनेक होती; मन एक होतं, हृदय एक होतं. माझ्याबरोबर आलेला माझा मित्रच केवळ माझा नव्हता तर मंडपातले सगळे पुरुष, सगळ्या स्त्रिया आणि मी एक होतो. एकाची आम्ही सगळे अनेक रूपं होतो. माझ्यात आणि त्यांच्यात रुचिवैचित्र्य असलं, वेशवैचित्र्य असलं तरी स्वभाववेद नव्हता-कुठलाच भेदभाव नव्हता. कुणी गरीब नव्हतं, कुणी श्रीमंत नव्हतं. कुणी वाईट नव्हतं, कुणी चांगलं नव्हतं. सगळेच श्रीमंत होते. सगळेच चांगले होते. सगळेच मानव होते - सगळेच प्रेमाच्या राज्यांतले नागरिक होते.

मध्यंतरात मी एक विड्याच्या दुकानातील आरशात माझं प्रतिबिंब पाहिलं. ते माझंच का, असा क्षणभर मला प्रश्न पडला. मीदेखील त्या मजलसीतील अनेक श्रोत्यांसारखाच होतो. स्वच्छंदी, बेफिकीर, रसिक. कित्येकांकडे पाहून मी दिलदारपणे स्मित केलं. कित्येकांना अभिवादन केलं. कित्येकांसह हसलो.

मध्यंतरानंतर पुन्हा गायनाला सुरुवात झाली. स्वरांच्या शिडीवरून कितीतरी उंच चढलो. जिवाला मोकळं वाटू लागलं. उंच पर्वतावरील विरळ हवा मला स्पर्शू लागली. मी एकटाच नव्हतो, माझ्यासह सगळा संगीतमंडप उंच उचलला गेला होता. यक्षकिन्नरांसारखे आम्ही विहरत होते. भूमीपासून उंच, आम्ही सारखं वर चाललो होतो. स्वरांच्या शिड्या संपत नव्हत्या. आम्ही सारखं उंच चाललो होतो. पृथ्वी आकाशाला बिलगली होती. आकाश पृथ्वीला आलिंगन द्यायला वाकलं होतं... मी ऐकत असलेलं संगीत किन्नरीचं, माझ्या हृदयाचं की तारकांचं हे मला समजत नव्हतं. मला वाटत होतं, मी तारकांच्या अगदी जवळ गेलो आहे - अगदी जवळ. जिथं नुसता प्रकाश होता - नुसता प्रकाश. स्वरांच्या शिडीवरील त्या प्रकाशाच्या प्रासादात आम्ही सगळे रंगीबेरंगी जीव स्वच्छंद वावरत होतो.

किती वेळ झाला कुणास ठाऊक; पण तो सगळा प्रासाद एकाएकी कोलमडला, मोडून मातीत मिसळला. काय झालं कुणालाच कळेना. एकाएकी आरडाओरडा सुरू झाला, धावपळ सुरू झाली. मी विरळ वातावरणातून एकदम जमिनीवर आदळलो. छे, छे, जमिनीच्याही खाली-गर्तेत. मंडपातले सगळे दिवे एकाएकी गेले. गाणं बंद झालं. कोलाहल वाढला. दिवे कसे गेले हे कळत नव्हतं. नुसता गोंगाट वाढत होता. काळाकुट्ट अंधार! काही दिसत नव्हतं. मी कुठं होतो? कुठं चाललो होतो? चाचपडत मी इकडेतिकडे फिरत होतो. माझा मित्रही मला गवसत नव्हता. कुणीच मित्र गवसत नव्हता. डोळे फोडून मी पाहण्याचा प्रयत्न करत होतो, पण काही दिसत नव्हतं. मी कुठंतरी चाललो होतो. स्त्रियांच्या भेदरलेल्या किंकाळ्या सुरू झाल्या. चीत्कार वाढू लागले. त्यांचा मागोवा घेत मी नुसता चाललो होतो- फेकला जात होतो. खोल खोल. अंधाराच्या गुहेत. मला स्त्रियांचे घाबरलेले आवाज तेवढे ऐकू येत होते आणि मी त्या भेदरलेल्या आवाजांचा पाठलाग करत त्या अंधकाराच्या काळ्याकभिन्न गुहेत धावत चाललो होतो. स्त्रियांचे चेहरे नीट दिसत नव्हते. त्यांची रंगीबेरंगी वस्त्रं दिसत नव्हती. ती वस्त्रं जिथं असावी तिथं होती का? वस्त्रं ओढल्याचा, वस्त्रं फाडल्याचा आवाज नुसता ऐकू येत होता. मी सैरावैरा धावत होतो. अनेक सैरावैरा धावत होते-त्या किंकाळ्यांच्या दिशेनं, वस्त्रं जिकडं फाटत होती तिकडं. इतके दु:शासन. इतक्या द्रौपदी. त्यांना कोण सोडवणार? कोण वस्त्र पुरवणार? गोपींची हरण केलेली वस्त्रं कितीही असली, तरी कुठवर पुरी पडणार? नुसते आवाज ऐकू येत होते - बांगड्या हलण्याचे, वस्त्र फाटण्याचे. आणि मी नुसता धावत होतो... मी जसजसा त्या आवाजांजवळ पोहोचलो, तसतसं मला वाटू लागलं हे आवाज भीतीचे नव्हते, गोंधळाचे नव्हते. हे सगळे आवाज प्रीतीचे, हे सगळे आवाज उन्मादाचे, वस्त्रं फाटली जात नव्हती. आभरणं हिसकावली जात नव्हती. स्वखुशीनं सगळे जण आणि सगळ्या जणी वस्त्रं भिरकावून देत होत्या. दागिने फेकून देत होत्या. पुरुषांची वस्त्रं आणि स्त्रियांची वस्त्रं एकमकोंवर आदळत होती. एकमेकांत गुरफटली जात होती. ज्यांची वस्त्रं एकमेकांत

गुरफटतील ते एकमेकांचे सखे, एकमेकांच्या सख्या. माझी सखी कोण? मी कुणाचा सखा? मी कुणाशी क्रीडा करायची? कुणाशी नाचायचं? कुणाचा हात धरायचा? केव्हापासून मी माझी सखी शोधायला हिंडत होतो? केव्हापासून मी धावत होतो? किती वेळ असं धावायचं? स्त्रियांनी ओरडायचं? पुरुषांनी धावून त्यांना पकडायचं? किती वेळ अधीर हृदयांची धडधड चालायची? माझं हृदय धडधडत होतं. मी धावत होतो. स्त्रिया मला हूल देत होत्या. ओरडून मला त्या बोलावत होत्या. हा पाठलाग किती वेळ करायचा? केव्हापासूनचा तो चालला होतो? पळाच्या सुखासाठी स्त्रिया धावत होत्या, पुरुष धावत होते-युगानुयुगं. मी अगदी थकून गेलो होतो, घामाझोकळ झालो होतो.

इतक्यात दिवे परत आले. सगळ्या मंडपातून टाळ्यांचा कडकडाट घुमला. स्त्रियांचं ओरडणं थांबलं. मी त्यांच्याकडे बघितलं. मघाच्या अंधारात मी त्यांना पाहिल्यासारखं वाटू लागलं. आपण त्यांच्याच मागे धावत होतो अशी खात्री पटली. त्यांच्या चेहऱ्यावर अजूनही भीतीची थरथर होती. मी माझ्या कपाळावर हात नेला. कपाळ घामानं ओलंचिंब झालं होतं. मी माझ्या जागेवरच होतो. माझा मित्रही आपल्या जागेवरच होता. पण माझं कपाळ घामानं ओलंचिंब झालं होतं. अंधाराच्या लांबच लांब गुहेत धावताना मला आलेला घाम. मी घाबरलो. धडधडणाऱ्या छातीवर हात ठेवला. पुन्हा पूर्ववत सगळा मंडप आणि माझं मन उजळून टाकणाऱ्या त्या दीपमालेकडं पाहत मी हात जोडले आणि माझ्या मुखांतून उद्‌गार निघाले, 'शांताकारं भुजंगशयनम्.'

त्यानंतरच्या गायनात माझं लक्ष लागलं नाही. माझ्या शेजारच्या स्त्री-पुरुषांकडे बघण्याचं धैर्य मला होईना. मी त्यांची नजर टाळू लागलो. ते स्त्री-पुरुष, तो विजेच्या दिव्यांनी लखलखणारा मंडप, ती गायिका, तिचं ते गाणं, सगळंच एकमेकांशी विसंगत वाटत होतं. त्या मैफलीत बसायला कुणीच लायक नव्हतं. ती मैफल नव्हती. एकमेकांवर तुटून पडायला दबा धरून बसलेल्या प्राण्यांचा तो मेळावा होता – बरं झालं, लवकरच ते गाणं संपलं आणि आम्ही सगळे खाली मान घालून घराकडे परतलो. एखादं प्रेत सरणावर ठेवून परतावं तसं.

परत येताना मी माझ्या मित्राशी बोलत नव्हतो. तो माझ्याशी बोलत नव्हता. मुकाट्यानं आम्ही आपल्या खोलीवर आलो.

खोलीवर येताच मी खाटेवर पडलो तोच माझी हाडं कडकडा मोडली आणि माझ्या व्यक्तित्वाचे तुकडे झाले. आपल्या खाटेवर पडल्या पडल्या माझा मित्र मला म्हणाला,

''आज मंडपात दिवे गेले, तेव्हा मजा आली नाही?''

मी उत्तर दिलं नाही. तोच बोलत होता,

''अरे, सारंगनगरच्या राजाची तर म्हणे ही नेहमीचीच युक्ती होती. आपल्या राजधानीतल्या सुंदर सुंदर स्त्री-पुरुषांना तो आपल्या दिवाणखान्यात गाण्याच्या मैफलीसाठी बोलवी. गाणं रंगात आलं की एकदम सगळे दिवे विझवून टाकी आणि त्या अंधारात वाटेल तो धुडगूस घाली.''

माझ्या मित्रानं सांगितलेली ती राजाची गोष्ट ऐकताच मला त्याचा भयंकर राग आला व मी तुसड्या आवाजात त्याला म्हणालो,

''बरं बरं, झोप आता. बडबड पुरे.''

''बरं बाबा!'' म्हणत झोपण्याच्या पूर्वी तो दिवा मालवू लागला. मी त्याचा हात धरत म्हणालो,

''दिवा बंद करू नकोस.''

त्याला कळलं नाही. त्यानं विचारलं,

''झोपायचं ना? मग दिवा कशाला?''

मी त्याच्यावर रागावत सांगितलं,

''उगीच बोलू नकोस, दिवा राहू दे.''

त्या भणभणत्या दिव्याकडे पाहत मी कितीतरी वेळ खाटेवर पडून होतो आणि स्वतःशीच पुटपुटत होतो, 'दिव्या दिव्या दीपत्कार...'


●


॥ग्रंथाली॥

# मित्रास्त

**के.ज. पुरोहित**

इ.स. १९६३ ते २०१४ अशा अर्धशतकाच्या दीर्घ कालपटावर पसरलेली आणि नानाविध नियतकालिकांत विखुरलेली मात्र आजही आपला ताजेपणा जपलेली ही व्यक्तिचित्रे.




**के.ज. पुरोहित यांच्या जन्मशताब्दीदिनी १५ जून २०२३ रोजी प्रसिद्ध होत आहे!**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



डॉ. उषा मा. देशमुख

# मराठी लघुकथापरंपरेतील 'शिरवा'

**कथा** या वाङ्मयप्रकाराशी प्रत्येक मानवाचे फार घनिष्ठ संबंध आहेत. काऊचिऊच्या गोष्टीपासून आजच्या वर्तमानकालीन वास्तवात कथेचा करिष्मा कमी झालेला नाही. मराठी कथा आपली विविध रूपे घेऊन रूपगर्विता होत आहे. तिच्यात अनेक प्रवाह वाहते आहेत. वाहत राहतील. एक अत्यंत रसिकप्रिय वाङ्मयप्रकार म्हणून कथेकडे बघितले जाते. जागतिक पातळीवरही हाच अनुभव आपल्याला येतो. मराठी कथेच्या संदर्भातील आपला अनुभव असाच असतो. गेल्या आठ-दहा दशकांपासून मराठी कथेची बदलती रूपे वाचकाला मोहवून टाकीत असतात. मराठी लघुकथेची गंगोत्री हरिभाऊ आपट्यांच्या काळात अवतरली आणि पुढे तिला वेगवेगळ्या वाटा आणि वळणे मिळत गेली. कथा हा वाङ्मयप्रकार सागरासारखा सखोल आहे, आकाशासारखा विस्तीर्ण आहे, वाऱ्यासारखा चंचल आहे आणि क्षितिजासारखा कुतूहलजन्यही आहे. वाचकाच्या अभिरुचीला भिडणारा आणि अनुभव, आशय आणि आविष्कारातून झटिती प्रत्यय देणारा असा वाङ्मयप्रकार म्हणजे लघुकथा हा होय.

मराठी कथेचा विचार केला तर मराठी वाङ्मयाच्या विराट स्वरूपात कथेचे योगदान फार सूक्ष्म सखोल आहे. आणि इतर भाषक कथांपेक्षा मराठी कथा ही दोन पावले पुढेच आहे असे म्हणता येईल. मराठी कथेच्या विकासात, जडणघडणीत, वाटचालीत आणि परिवर्तनशीलतेत मराठी कथाकारांचा फार मोठा सिंहाचा वाटा आहे. मूळ कथा, निर्माता कथाकार आणि वाचणारा वाचक यांच्या स्वरमेळातून कथेची भावयात्रा संपन्न झालेली असते. मुंबईच्या साहित्य सहवासात तर कथाकारांचे नंदनवन फुललेले आहे. नवकथेचे उद्गाते गंगाधर गाडगीळ, स्त्रीजीवनाचा आलेख काढणाऱ्या विजया राजाध्यक्ष, मानवी इच्छाआकांक्षांचे दर्शन घडवणारे अरविंद गोखले, नीलिमा भावे, सुकन्या आगाशे, मराठी कथेला विशेष लोकप्रियता मिळवून देणारे कथाकार म्हणजे व.पु. काळे, गिरिजा कीर, दीपा गोवारीकर इत्यादी कथाकारांत शांतारामांची कथा आपले एक विशिष्ट स्थान निर्माण करून साक्षात झालेली आहे. गेल्या शतकापासून अगदी आजपर्यंत कथा या वाङ्मयप्रकाराला समृद्ध करण्याचे कार्य आपल्या कथानिर्मितीतून कथाकारांनी केलेले आहे. आणि कथेच्या समृद्धीत मराठी कथाकारांचे भरीव योगदान आहे. त्यात शांताराम यांच्या कथेचा विचार प्रस्तुत करायचा आहे. त्याला कारणही तसेच आहे. १५ जून २०२३ रोजी के.ज. पुरोहित उपाख्य शांताराम यांची जन्शताब्दी आहे. त्या निमित्ताने त्यांची कथाकार म्हणून असलेली वैशिष्ट्ये आणि त्यांच्या कथेचे विशेष थोडक्यात लक्षात घेत आहे. प्रस्तुत लेखन म्हणजे परीक्षण, निरीक्षण किंवा अर्थनिर्णयन करून शोध घेण्याचे नाही तर शांतारामांच्या कथेचे संस्कार रसिक मनावर कसे झाले आहेत आणि शांतारामांच्या कथेचे ठळक विशेष कोणते? हा विचार केलेला आहे. मराठी कथेच्या प्रवाहात शांताराम यांच्या कथेचे एक आगळेवेगळेपण दिसून येते. ते कसे?

नवकथेच्या उदयापूर्वी आणि फडके-खांडेकर यांच्या युगात शांतारामांनी कथालेखनाला सुरुवात केली. इसवीसन १९४५-४६ पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांनी सातत्याने लेखन केले. वऱ्हाडी स्वभावाप्रमाणे त्यांचे कथालेखन संथ, ऐसपैस, गोष्टीवेल्हाळ आणि मैफल जमावी असे आहे. वर्षातून दोन-चार कथा आणि आठदहा वर्षांत एखादा कथासंग्रह अशी शांतारामांच्या कथेची वाटचाल आहे. ती संथ गजगामिनी आहे. निवांत आहे. तिला कोणतीच घाई नाही, तिची कुणाशी स्पर्धाही नाही अशी 'एकला चालो रे' वृत्तीची शांतारामांची कथा आहे. शांतारामांच्या कथेने पन्नास साठ वर्षांचा कालखंड व्यापलेला आहे. समाजजीवनातील स्थित्यंतरे, व्यक्ती जीवनावर त्याचा होणारा परिणाम, अनेक पातळीवरून जीवन जगणारी भोवतालची माणसं आणि जीवनातील वाहते वारे यांच्या स्पर्शातून शांताराम ांची कथा साकारलेली आहे. मराठी कथेच्या स्थित्यंतराच्या

आहारी न जाता ही कथा आपला मार्ग शोधते.

शांताराम कथाकार म्हणून ओळखले गेले असले तरी त्यांनी इतर वाङ्मयप्रकारातही लेखन केलेले आहे. 'संत्र्याचा बाग' ते 'सोन्याचे मांजर' हे विविध जीवनदर्शनाचे व्याप्त असलेले कथासंग्रह, आत्मपर असे ललित लेखन, 'व्रात्यस्तोम' ते 'ठेवणीतल्या चिजा', छोटेखानी असे 'बीजाक्षरे' हे समीक्षालेखन, देशविदेशात केलेल्या प्रवासाचा 'सफरनामा' विविध प्रकारची संपादने, भाषांतरे, रूपांतरे आणि अनुवादही त्यांनी केलेला आहे. आगामी प्रकाशनातही 'मित्रास्त'सारखे व्यक्तिचित्रात्मक लेखन, दोन कादंबऱ्या आणि एक नाटक अशा विविध प्रकारी लेखनाची आस या कथाकाराच्या मनात निर्माण झालेली दिसते. विविध ग्रंथांना प्रस्तावना, पुस्तकपरीक्षणे, मुलाखती, भाषणे यांच्यासह शांतारामांचे साहित्यविश्व गजबजलेले आहे. त्यातून 'साहित्या'वर निष्कलंक

जवळ जाणारी ठरते. त्या काळात वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे यांची कथासृष्टी अशीच लघुनिबंधसदृश होती, तो प्रभाव आणि परिणाम शांताराम यांच्या कथेत उतरलेला आहे. 'संत्र्यांचा बाग', 'मनमोर', 'शिरवा' या शांताराम ांच्या कथासंग्रहातून लघुनिबंध आणि कथा यांची एकरूपता दिसून येते. लघुनिबंधातील काव्यात्मता, ऐसपैसपणा आणि गोष्टीवेल्हाळ वृत्ती शांतारामांच्या प्रतिभेला मानवणारी अशीच होती. पुढच्या काळात म्हणजे साठसत्तरच्या काळातील त्यांची कथा, व्यक्तिविशेष स्पष्ट करणारी ठरली. त्यातही मध्यमवर्गीय समाजजीवन हा त्यांना जिव्हाळ्याचा विषय वाटला. मध्यमवर्गाची भावनिक वाढ, व्यक्ती-कुटुंब यातील ताणतणाव, बदलते सांस्कृतिक वातावरण या अंगाने 'छळ आणि इतर कथा', 'जमिनीवरची माणसं', 'चंद्र माझा सखा' या संग्रहांतील कथा बघाव्या. शांतारामांच्या कथेची वीण







प्रेम करणारा आणि त्याची पूजा बांधणारा एक समर्थ, सर्जनशील लेखक-कथाकार या स्वरूपात त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व स्पष्ट होते. पीएचडीचे तीन प्रबंध त्यांच्या साहित्यावर; विशेषतः त्यांच्या कथेवर सिद्ध झाले आहेत. असा शांतारामांच्या साहित्याचा 'सफरनामा' डौलाने सिद्ध झालेला आहे. 'मी म्हणजे माझा परिसर' असे 'व्रात्यस्तोम'मध्ये शांताराम म्हणतात. स्वभावातील उत्साह, नव्या जुन्याचा योग्य आदर, प्रसन्नवृत्ती, खेळकरपणा आणि कृतीउक्तीत आलेली विलक्षण तृप्ती आणि खळखळता उत्साह त्यांच्या सर्वच लेखनातून पाझरलेला आहे. शांतारामांच्या कथेतून आणि एकूण सर्वच लेखनातून जीवनमूल्यांची जोपासना केलेली दिसून येते.

गोष्टीवेल्हाळ स्वभाव आणि अभिव्यक्तीचा उत्साह यातून सुरुवातीची शांताराम यांची कथा ही लघुनिबंधाच्या

जीवनमूल्यांनी विणली गेली आहे. त्यामुळे समाजातील विविध स्तरांतील माणसं हाच कथाकाराच्या कथेचा मूलभूत विषय असल्यामुळे त्यांच्या कथेत विविध स्तरांतील माणसं आणि त्यांचे वैविध्यपूर्ण जीवन यांचा अतिशय कलात्मक असा आलेख काढलेला दिसतो. 'अंधारवाट', 'चेटूक', 'संध्याराग' या संग्रहांतील कथेची साक्ष घेता येते. स्त्रीपुरुषसंबंध, ग्रामीण स्तरावरील संघर्ष, सांस्कृतिक तफावतीमधून निर्माण होणारे भावनिक आणि व्यक्तिगत ताणतणाव त्यांच्या कथेत जाणीवपूर्वक निर्माण न होता लीलया आविष्कृत होतात त्यामुळे त्यांची कथा वाचनीय तर होतेच, शिवाय सूक्ष्म सखोलही होते.

ज्या कालखंडात नवकथा ही मराठी वाङ्मयविश्वाची पायाभूत म्हणून समजली गेली त्याही काळात शांतारामांच्या कथेने आपले सत्त्व सोडले नाही. त्यांची कथा प्रवाहपतित

“

**शांताराम आपली कथा कशी सांगतात, त्यांतील घटकांची मांडणी कशी करतात याविषयी रा.भा. पाटणकर लिहितात–**

''सर्वच चांगले कथाकार जीवनाविषयी नवी जाण देण्याचा वास्तवातील कुठल्यातरी अंगाचे मूल्यन किंवा पुनर्मूल्यन करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांतले काही आपली मर्मदृष्टी आपले मूल्यन आपल्या कथांमधील घटितांच्या मांडणीत नि:शेषपणे जिरवून टाकतात. शांताराम या वर्गातले कथाकार नाहीत. घटितांच्या व घटनांच्या वर्णन–कथनाबरोबर ते आपले भाष्यही देत असतात. काही वेळा हे भाष्य कथावस्तूशी प्रत्यक्षपणे निगडित असते; इतर काही वेळा ते स्वैर असते, एकूण जीवनाविषयी किंवा त्यातल्या एखाद्या महत्त्वाच्या अंगाविषयी असते. त्यामुळे बऱ्याच वेळा असे वाटते, की शांताराम कथा लिहीत नसून ते आपल्याशी बोलत आहेत; कथनाच्या ओघात बोलत आहेत किंवा बोलण्याच्या ओघात गोष्ट सांगत आहेत... वाटत राहते की आपण वाचक नसून श्रोते आहोत; कोणीतरी आपल्याशी बोलत आहे. आपला एखादा स्नेही गप्पा मारण्याच्या ओघात एखादा प्रसंग वर्णन करीत आहे. एखादी घटना सांगत आहे. त्याच्या अनुषंगाने जीवनावर भाष्य करीत आहे, अधूनमधून निष्कर्ष काढत आहे. स्पष्टीकरणे देत आहे. असा संदर्भ मनासमोर आणला तर शांतारामांच्या निवेदनशैलीबद्दल बरेच काही लक्षात येईल... अनौपचारिकता, जाणीवपूर्वकतेचा अभाव, थोडाफार सैलपणा, काहीवेळ घटनांचे कथन, व्यक्तींचे चित्रण, मध्येच चिंतन, थोडीफार भाष्यकारी (कॉमेंटरी), विशिष्ट घटनांवरून, माणसांच्या बोलण्याचालण्यावरून काढलेले निष्कर्ष... वरील प्रकारची निवेदनपद्धती ज्या कथेमध्ये वापरलेली असेल ती लघुनिबंधाच्या फार जवळ येते. लघुनिबंधातही अनौपचारिकता, गप्पागोष्टींकडे असलेला कल, विशिष्ट पातळीवरची वैचारिकता इत्यादी वैशिष्ट्ये सापडतात... लेखकाच्या चिंतनाला, भाष्यकारीला महत्त्व येऊ लागले की कथा ही निबंध या वाङ्मयप्रकारची काही प्रमुख वैशिष्ट्ये आत्मसात करू लागते. शांतारामांच्या कथांच्या बाबतीत अनेक वेळा असे झाले आहे... त्यांनी आपल्या लघुकथेत लघुनिबंधाला आत्मसात करून घेतले. त्यामुळे त्यांच्या कथांना 'सांगितलेल्या गोष्टी'चे स्वरूप येणे अपरिहार्य होते.''

---

ठरली नाही. गंगाधर गाडगीळ, कमल देसाई यांच्या कथेत जी नवता दिसून येते तशी नवता शांतारामांच्या कथेत नाही तर ती नव्याजुन्याच्या संगमावर उभी आहे. कथेतील कलाजाणीवाही पृथगात्म अशाच आहेत. शांतारामांची कथा नवीही नाही आणि पारंपरिक जुनीही नाही तर ती 'स्व'तंत्र आणि स्वयंभू अशीच आहे. 'शिरवा'सारखा तिचा वाचनानुभव आनंददायी ठरतो.

मराठी लघुकथेचा 'शिरवा' म्हणजे शांतारामांची कथा आहे ती 'खांरी'सारखी चंचल आणि 'वाघा'सारखी मनस्वी आहे. आपल्याच डौलदार चालीने जाणाऱ्या गजगामिनी होय. शांताराम यांच्या कथेत चंद्रपूर–नागपूर या शहरांबरोबरच विदर्भातील इतर गावाखेड्यांतील जीवन अधोरेखित झालेले आहे. शांतारामांची कथा आणि आत्मलेखन विदर्भाच्या प्रादेशिकतेला सामोरे गेलेले आहे. विदर्भातील शहर, तालुके, सांस्कृतिक आणि सामाजिक पर्यावरण, विदर्भाची प्रादेशिकता आणि विदर्भाचा स्वभाव त्यांच्या कथेतून आणि आत्मपर लेखनातून व्यक्त होतो. कथेत आलेल्या समस्या, स्त्रीपुरुष जीवनातील चढ–उतार, विदर्भाचा गोष्टी वेल्हाळपणा आणि औदार्य अशी अनेक वैशिष्ट्ये लेऊन शांतारामांच्या कथेतील वातावरण व्यक्तिरेखा, भाषाविशेष, अभिव्यक्तीची शैली प्रकटली आहे. एका अर्थाने विदर्भाचे 'मैत्र' शांतारामांच्या कथेने जपलेले आहे. अखेरच्या काळात शांतारामांची कथा थोडीफार बदलली, पण तिचा मूळ पिंड कायम राहिला. त्यांच्या कथेतून वैदर्भीय शैलीचा, बोलण्याच्या पद्धतीचा आढळ कथेतील संवादातून येत असतो. एक दिलदार वृत्ती घेऊन त्यांची कथा सिद्ध झालेली आहे. शांतारामांच्या कथात्म साहित्याचा एक विशेष म्हणजे लघुनिबंधात कथाबीज असते तर कथेत लघुनिबंधाचा डौल असतो. या अर्थाने मराठी कथासाहित्याचे एक नवे वळण म्हणून शांतारामांच्या कथात्म साहित्याकडे बघितले पाहिजे. ललित लेखकाच्या लेखनातच त्याचे चरित्र आणि आत्मचरित्र छायांकित झालेले असते. शांतारामांच्या कथात्म साहित्यात आणि एकूण त्यांच्या सर्व निर्मितीत त्यांचे व्यक्तिमत्त्व अनुस्यूत असलेले आपल्या लक्षात येते. त्यांच्या समकालीनांच्या साहित्यनिर्मितीपेक्षा हे वळण फार वेगळे आणि स्वतंत्र ठरते. प्राचार्य के.ज. पुरोहित इंग्रजी साहित्याचे जाणकार अभ्यासक असूनही त्यांच्या साहित्यावर इंग्रजी साहित्याची पडछाया पडलेली दिसून येत नाही. काही थोडेफार संदर्भ वगळता शांतारामांच्या कथेतील अनुभवकथन अस्सल भारतीय आहे. त्यांच्या कथेत म्हणूनच वेगळेपणा जाणवतो. त्यांच्या काळातील मराठीतील कथात्मक साहित्याच्या धबधब्यात त्यांची कथा काहीशी बाजूला पडली पण म्हणून तिचे मोल कमी झाले नाही. लेखकाचा सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोण, संयत कलापूर्ण अनुभवाचे आशयात संक्रमण, मानवतेवरील श्रद्धा, जागृत जिज्ञासा आणि चोखंदळ बहुश्रुतता यांचे तरंग वाचकाच्या लक्षात आल्यापासून राहत नाहीत.

मराठी लघुकथेच्या परंपरेत आणि लघुकथेच्या इतिहासात शांतारामांच्या कथेचे एक स्वतंत्र स्थान आहे. या दृष्टीने या कथेचा पुनर्विचार झाला पाहिजे.

**– डॉ. उषा देशमुख**
vijaydeshmukh986@yahoo.com



# शांतारामांच्या कथांमधील स्त्री व्यक्तिरेखा

डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी

**कोणत्याही** कथाकाराचे कथांतर्गत अनुभवविश्व वैविध्यपूर्ण व्यक्तिरेखांनी गजबजलेले असते. त्या व्यक्तिरेखांचे अस्तित्व, त्यांचे दृष्टिकोन, त्यांचे जगण्याचे स्वतःचे असलेले तत्त्वज्ञान, त्यांचे परस्परसंबंध या साऱ्यांतून कथासृष्टी आकाराला येत असते. त्यांचे अस्तित्व-being - त्या सृष्टीपुरते अत्यंत खरे असते. म्हणूनच वाचक म्हणून आपण त्या व्यक्तिरेखांशी काहीएक नाते जोडतो. त्यातल्या काही एकदा वाचल्या की आपल्या अंतरसृष्टीत वसतीला येतात.

'भेदरेखा' (१९४१) ही कथाकार शांताराम यांची पहिली कथा. तिथपासून १६ कथासंग्रहांतील जवळपास २५० कथा आणि अनेक असंग्रहित कथा लिहिणाऱ्या या लेखकाच्या कथाविश्वातील वैशिष्ट्यपूर्ण स्त्रीपात्रांचा धावता परिचय या छोट्याशा लेखुल्यात देण्याचा प्रयत्न आहे. वास्तविक हा एका मोठ्या संशोधनपर निबंधाचा विषय आहे. तरी शांतारामांनी निर्माण केलेली ही 'कागदी अस्तित्व' किती जिवंत आणि किती खऱ्यापेक्षा खरी वाटतात, त्याची ही झलक.

शांतारामांची कथा ही जुन्या-नव्या कथेच्या संधिकालातली कथा आहे. सुमारे सात दशके ते सातत्याने कथालेखन करत होते. या सर्व काळात आजूबाजूला घडणाऱ्या बदलांचे पडसाद त्यांच्या कथेवर थेट नाही तरी कमीअधिक पडलेच. विविध प्रदेश आणि विविध ठिकाणे इथल्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथाविश्वात आढळतात. नागपूर, ब्रह्मपुरी, चार्मोशी, चंद्रपूर, बिलासपूर, अमरावती इत्यादी. मुळात या कथाकाराची दृष्टी रूढार्थाने सामाजिक, राजकीय, तात्त्विक अशी चौकटबद्ध नाही. त्यामुळे अर्थातच त्यांच्या पात्रांवरही लेबल लावता येत नाही. त्यांची पात्रे आणि ती वावरतात तो परिसर यांमध्ये एकजिनसीपणा आहे. त्यांची स्त्रीपात्रे सामान्य आहेत आणि माणसाची मर्यादा त्यांनाही आहे. कारण त्यांची सर्वच पात्रे जमिनीवरची आहेत. सामान्यपणाचे गुण-अवगुण सारे त्यांच्यात दिसतात. मात्र एखादी घटना अशी घडते की त्यांच्या सामान्य जीवनात काहीतरी असामान्यत्व दाखल होते.

शांतारामांनी देह आणि मन दोन्हींसह स्त्री रंगवली. त्यांची स्त्रीपात्रे पारंपरिक आहेत, तशीच बंडखोर आहेत. भाबडी आहेत तशीच धूर्त, बनेल आहेत. सोशिक आहेत तशीच आक्रमक आहेत. काव्यात्म, हळुवार वृत्तीची आहेत, तशी हिंस्र आहेत. त्यातही पुन्हा एक पारंपरिक स्त्री दुसऱ्या पारंपरिक स्त्रीसारखी नाही. बंडखोरीच्याही अनेक तऱ्हा आहेत.

मराठी साहित्यात तोवर रूढ झालेल्या स्त्रीरूपांच्या म्हणजे रूढ कौटुंबिक चौकटीतील आजी, आई, वहिनी, बहीण वगैरेंसारखी शांतारामांची स्त्रीरूपे साचेबद्ध नाहीत. उदाहरणार्थ, बहिणी-बहिणी या नात्याच्या दोन कथा पाहा. मावशी (लाटा) या कथेतील रन्नू आणि रामी या दोन सख्ख्या बहिणी आहेत; पण त्या सवतीदेखील आहेत. बाबूलाल आणि रन्नू या जोडप्याला बरीच वर्षे मुलबाळ नसते. आपला दोष नाही हे समजल्यावर बाबूलाल रामीशी लग्न करतो. रामीला आई-वडिलांच्या दबावाखाली आणि बहिणीचा संसार वाचवण्याच्या नैतिक जबाबदारीपोटी हे लग्न करावे लागते. तिला व बाबूलालला दोन मुले होतात. रन्नू आणि तो एकमेकांच्या अगदी प्रेमात बुडालेले असतात तसे प्रेम काही रामीच्या वाट्याला येत नाही. काही वर्षांनी या सगळ्या गोष्टीला एक अनपेक्षित कलाटणी मिळते. रन्नूला दिवस जातात. 'मला मूल झाल्यावर आता तू या घरात राहू शकत नाहीस,' असे ती रामीला सुनावते. तिचे बाळंतपण रामी करते. रन्नूच्या नवऱ्याशी लग्न करून बहिणीचा मोडणारा संसार सावरणारी रामी रन्नूच्या नवजात बाळाला ज्या प्रेमाने आणि 'फुलासारखं हातात घेते' त्यावरून दिसते की इथेही ती पुन्हा मोठ्या मनाची ठरते. कथेचे मावशी हे शीर्षक त्या दृष्टीने खूपच बोलके आहे.

'बहिणी' (छळ) या कथेतील मोठी बहीण सुमन आणि धाकटी विमल. मोठी आता वयाने बरीच प्रौढ आहे. शिक्षिकेची नोकरी करतेय. धाकटी कॉलेज कन्यका आहे,

अल्लड आहे. सतत स्थळांकडून नकार येणाऱ्या सुमनला एका नकाराबरोबर वेगळाच धक्का बसतो. तिला नकार देणारे स्थळ विमलला मागणी घालते. सुमन या लग्नाला संमती देते खरी पण तिच्या मनात अपमान, मत्सर, दुःख, हेवा यांच्या लाटा उसळतात. शांताराम तिच्या या स्वाभाविक प्रतिक्रियेची फार चांगली दाखल घेतात. विमल जेव्हा 'तू किती चांगली आहेस ग आक्का!' म्हणते तेव्हा सुमन म्हणते 'मी चांगली नाही ग! तुला माहीत नाही. तू समजतेस तशी मी चांगली नाही.' ती कशी व का चांगली नाही हे वाचकाला समजले तरी त्याची सहानुभूती तिच्याच वाट्याला जाते. माणसातली नाती कोरड्या व्यवहाराच्या मातीत उतरली की कशी होऊन जातात, याचे चित्रण या दोन्ही कथा करतात. एकाच आईबापांनी वाढवलेल्या दोन मुली किती आमूलाग्र भिन्न स्वभावाच्या असू शकतात, तेही दिसते.

'रती' (अंधारवाट) या कथेतील रती खन्ना ही शांतारामांची एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा आहे. सौंदर्य, सत्ता आणि पैसा अशी त्रिविध सामर्थ्ये या स्त्रीजवळ आहेत. म्हणजे जगज्जेतीच म्हणायची! कमालीची आक्रमक आणि तितकीच आत्मकेंद्री स्त्री. एका मोठ्या व्यापारी कंपनीची ती प्रमुख अधिकारी आहे. स्वतःचे हितसंबंध जपण्यासाठी विविध लोकांना वापरून घेण्यात वाक्‌बगार, सेक्सच्या खेळात निष्णात. इतकी की अन्वर ड्रायव्हरचादेखील ती स्वतःच्या शरीरसुखासाठी वापर करून घेते. कामवासना मूलभूत आहे, त्यामुळे स्थळ, काळ, सामाजिक प्रतिष्ठा वगैरेंना झुगारून ती कसा स्वतःचा कार्यभाग साधून घेते, त्याचे दर्शन ही कथा घडवते. अशा प्रकारची स्त्री तिच्या आकर्षणशक्तीच्या परिघात वाचकालादेखील सहज ओढून नेते.

'गोपिका' (रेलाँ रेलाँ) या कथेतील गोपिका हीदेखील अतिशय देखणी स्त्री आहे. गांजेकस, निष्क्रिय, म्हातारा नवरा आणि उनाड, गुंड मुलगा यांनी तिच्या आयुष्याचे पार मातेरे करून टाकले आहे. आपल्या या अशा संसारासाठी ती कष्ट उपसते आहे. तिचे आयुष्य तिला अब्रूने जगायचे आहे. पण तसे जगता येणे कठीण होऊन बसले आहे. बँकेतला साहेब विशिष्ट हेतूने तिला रात्री घरी बोलावतो तेव्हा तिने त्याच्याकडे जावे असे नवरा आणि मुलगा सुचवतात. तिने कष्टांबरोबर अशाही कामासाठी शरीर वापरावे असे सुचवणारे घरचे नादान लोक, गावातले टारगट वृत्तीचे लोक यांतून आपलं स्त्रीत्व कसे जपायचे म्हणून ही स्त्री कासावीस झाली आहे. आर्थिकदृष्ट्या अत्यंत विपन्नावस्था असल्याने तिचे हे देहसौंदर्य साधनरूप होते. स्त्रीदेहाच्या सौंदर्याच्या या दोन टोकांच्या दोन तऱ्हा इथे दिसतात.

'शिष्टाई' या कथेतील बबी तर आजच्या काळातली वाटावी अशी स्त्री आहे. पंधरा वर्षांनंतर संसार मोडून हव्या त्या पुरुषाबरोबर ती पळून जाते. 'बायका हव्या असणाऱ्या लोकांच्या' मदतीने सिनेमाक्षेत्रात जाऊ इच्छिणारी बिनधास्त स्त्री. स्वतःला जे हवे ते मिळवण्यासाठी काहीही करू शकणारी. मनाची, समाजाची, कुटुंबाची बंधने झुगारून देणारी.

स्त्रीच्या कामवासनेची आणखी काही रूपेही शांताराम यांनी संवेदनशीलतेने उकलली आहेत. 'वेडी' (संत्र्याचा बाग) या कथेत सदबा पाटलाची एकुलती एक बालविधवा मुलगी आहे. तिला वेडाचे झटके येत असतात. पाटलाच्या घरावर दरोडा पडतो तेव्हा दरोडेखोर तिला पळवून नेतात. तिचा उपभोग घेतात. नंतर तिला सोडून देतात. ती परत येते तेव्हा तिच्या नैसर्गिक वासनांची तृप्ती झालेली असते म्हणून तिचे वेडाचे झटके थांबतात. मात्र जेव्हा तिला तिच्या वासना अनावर होतात तेव्हा तिला पुन्हा वेडाचे झटके येऊ लागतात. घरच्या गड्याकडून तिची तृप्ती करवून घेतली जाते. अशी ही अगदी विलक्षण कथा आणि व्यक्तिरेखा आहे. शरीर आणि मन यांच्यातील अत्यंत गुंतागुंतीच्या नात्याचा शोध घेताना शांताराम यांनी या व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. अशीच आणखी एक व्यक्तिरेखा म्हणजे 'मंजिऱ्या' (कृष्णपक्ष) या कथेतील वेणू. वेणू सुंदर आहे पण वयाने वाढलेल्या तिच्या शरीराला अद्याप कामवासनेचा स्पर्श नाही. ती लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी माघारी येते. काही काळाने तिच्या वासना जाग्या होतात, पण त्याची तृप्ती कशी करायची, हे उमगत नाही. तिला भ्रम होतात, भ्रमातच शरीरसुख, भ्रमातच तृप्ती... अशा ताणात बिचारी 'फुलासारखी सुंदर' वेणू मरून जाते.

'उद्रेक' या कथेत स्त्रीने मनात आणले तर ती तिच्या देहाचा किती ताकदीने उपयोग करू शकते हे शांतारामांनी दाखवले आहे. या कथेतील सुनंदा ही साधीसुधी स्त्री आहे. या प्रचंड जगात आपले स्वतःचे एक छोटेसे जग उभारून त्यात सुखी होण्याची साधीशी कांक्षा तिला आहे. नवरा, मुले, आपण... साधेसे प्रामाणिक आयुष्य, सुखाचा संसार यांची गोड चित्रे मनात रंगवत असता अचानक हिरवळीखाली साप निघावा तसे तिच्या नवऱ्याचे कृष्णकारस्थान उघडकीला येते आणि त्याला जन्मठेप होते. हा धक्का इतका मोठा असतो की तिचे ते चिमुकले जग उद्ध्वस्त होते. ती नोकरीत बदली घेऊन, आईवडिलांच्या आधाराने दुसऱ्या गावी स्थिरावते. दोन माणसांच्या खुनाने रंगलेल्या हातांनी नवरा सुट्टीसाठी तिच्या दारात येऊन ठाकतो, तेव्हा विचार करते की 'का नाही?' मनसोक्त लैंगिक सुख- मनावेगळे- निव्वळ शरीराचे भोग घेते. माणूस आत गाभ्यात अखेर पशूच, हे सत्य तिला असे अनुभवाने उमगते. नवऱ्याच्या नरदेहातील वानर आणि स्वतःच्या देहातली कुत्री तिला जाणवते. सामाजिक-सांस्कृतिक चौकटीच्या पलीकडे असणारं निखळ स्त्रीत्व ही बाब शांतारामांच्या स्त्रीपात्रांचे वेगळेपण अधोरेखित करते.

शांतारामांच्या कथाविश्वात अशा लोकविलक्षण स्त्रिया लक्ष वेधून घेतात. पण याचा अर्थ असा नाही की सर्वसामान्य स्त्रिया या कथाविश्वात नाहीत. साधे, सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या 'अपेशी' (छळ) कथेतील हतबल रमाबाई, 'ओलावा'मधील (उद्विग्न सरोवर) असहाय आई-प्रेमाताई अशी रूपेही दिसतात.

राधाबाई (राधाबाई, चंद्र माझा सखा), सत्यभामा (सत्यभामा, अंधारवाट) ही पात्रेदेखील अगदी सामान्यच आहेत. परंतु त्यांच्यात एक अंतर्यामीचा स्फुल्लिंग आहे. स्त्रीची प्रतिष्ठा, तिचे बळ, तिचा स्वाभिमान आणि तिची संघर्षशील वृत्ती यांचे दर्शन ही पात्रे घडवतात. राधाबाईचा नवरा परागंदा होतो. बैरागी होतो. आता आपल्या कुंकवाला काहीच अर्थ नाही. नवरा सोबत नसतानाचे ते कुंकू तिला पुरुषांच्या वाईट नजरांपासून वाचवू शकत नाही म्हणून ती नवरा जिवंत असूनही कुंकू लावणे सोडून देते. त्याच्या पश्चात मोठ्या अटीतटीने ती संसाराचा गाडा ओढते. आणि अचानक एक दिवस नवरा परततो. जनरीत कशी विपरीत, की सर्वांची सहानुभूती त्यालाच मिळते. तेव्हा ही मानी स्त्री त्याच्याबरोबर संसार करायचे चक्क नाकारते आणि घरदार सोडून तीर्थयात्रेला निघते. निघताना शेजारणीकडून मळवट भरून घेते. मळवट भरणे ही तिची कृती दाखवते की तिने नवऱ्याचे अस्तित्व नाकारले आहे.

यांपेक्षा अगदी वेगळी हळुवार, काव्यात्म वृत्तीची स्त्रीरूपेही आहेत. 'चंद्र माझा सखा' (चंद्र माझा सखा) या गाजलेल्या कथेची नायिका वृत्तीने अगदी तरल आहे. आपल्या रोजच्या आयुष्यातील अलौकिक क्षण चंद्राच्या साक्षीने पकडू पाहणारी आहे. किती लोभसवाणे आहे तिचे ते जगणे. 'जडपणाची जाणीव संपली. अंधाराची पाठशिवण संपली. आता नुसता प्रकाश, नुसता आनंद, नुसती प्रसन्नता. मी संपूर्ण आनंदमय झाल्ये होत्ये. माझ्या व्यक्तित्वाची सगळी ओझी गळत होती. वस्त्रांचं ओझं. शरीराचं ओझं.' स्नेहलतादेखील (जमिनीवरची माणसे) अशीच हळवी, स्वप्नाळू आहे.

'चेटूक' (चेटूक), 'जाळे' (उद्विग्न सरोवर), 'रानपाखरे' (रेलाँ रेलाँ) अशा कथांमधून त्यांनी काही आदिवासी स्त्रीपात्रे रंगवली आहेत. सोने सापडून देण्याचा मंत्र देणारी कंजारीण 'रानपाखरे'मध्ये आहे. 'चेटूक'मधली बिंदा प्रणयसंबंध ठेवून रक्त शोषून प्रेमपात्राचा बळी घेणारी आहे. 'जाळे'मधील आदिवासी स्त्रीच्या जाळ्यात शहरी अशोक सापडतो. त्याची प्रेयसी त्याला शोधत तिथवर पोचते खरी पण अशोक काही तिच्या हाती लागत नाही. 'गंधा' (चेटूक) कथेतील इंद्रा सरीन पुरुषाला आकर्षून घेणारा सुगंध जन्मजात असलेली आहे. 'नागीण'मधील (छळ) नीलाचे सौंदर्य अत्यंत उग्र आहे. मायावी आहे. ते अखेर तिच्यावर प्रेम करणाऱ्या महेंद्रचा बळी घेते.

थोडक्यात सांगायचे तर शांतारामांनी रेखलेल्या स्त्रीरूपांचा पट वैविध्यपूर्ण आणि वैचित्र्यपूर्ण आहे. शांतारामांच्या कथांचे अभ्यासक रा.भा. पाटणकर यांनी म्हटले आहे, 'लोकमानसात स्थिरपद झालेल्या अतिस्निग्ध स्त्रीप्रतिमेला शांतारामांनी नाकारले आहे. स्त्रीची आदिम प्रतिमा दुहेरी अशीच आहे. ती मृदू भद्रकाली आहे. तशीच ती हिंस्र उग्रकालीही आहे. विशिष्ट संस्कृतीच्या संस्कारामुळे आक्रमक, आयुष्यातील जीवघेण्या स्पर्धेत निष्ठूरपणे इतर स्त्रीपुरुष स्पर्धकांना आपल्या स्वकेंद्रित उत्कर्षासाठी बाजूला सारणारी स्त्री आपल्याला पटकन ओळखीची वाटत नाही.'

**– डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी**
vandanabk63@gmail.com

॥ग्रंथाली॥




**श्रमिकांच्या अनोख्या जगात**


**विवेक पटवर्धन**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

**लढा मुंबईचा कोविडशी**

**सुरेश काकाणी**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**





डॉ. रविन थत्ते

# केशवकाका ह्यांचे द्वैताद्वैत

**हल्लीचे** वर्तमान आणि त्याचे वर्तमानपत्रातले वार्तांकन मोठे गोंधळून टाकणारे असते आणि त्यातले खरे काय आणि खोटे काय हे कळायलाच मुळी मार्ग उरलेला नाही. आणि त्यातच भरीला म्हणून दुष्काळात तेरावा ह्या न्यायाने समाजमाध्यमांनी मांडलेला धुडगूस आहेच. 'काय आणि कधी जाहले आणि ते कधी निमाले' म्हणायच्या आधीच नवीनच काहीतरी जन्माला यावे असा आजचा जमाना आहे. अर्थात ह्या प्रश्नाचा तोडगा आपल्या पूर्वजांनी आपल्यासमोर मांडून युगे लोटली आणि त्यात हे सगळे जगच मुळी खोटे आहे आणि ज्यातून हे जग प्रसवते तेच केवळ खरे आहे असे मांडून ते मोकळे झाले होते. हे जे खोटे आहे ते द्वैत आणि जे खरे आहे ते अद्वैत असे त्यांचे म्हणणे. ते तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ठीकच. परंतु मग जगाला सारावे आणि मला बघावे अशातला मी नाही ह्या सुप्रसिद्ध ज्ञानेश्वरांच्या श्रीकृष्णाच्या तोंडी असलेल्या उक्तीचे आणि 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत' ह्या त्यांच्या शब्दांचे काय करायचे हा एक प्रश्नच आहे. तिथे द्वैत आणि अद्वैत ह्या कल्पनाच मुळी मोडीत निघतात. एका कवीने ज्ञानेश्वरांचे वर्णन पहिला बंडवाला केले होते ते ह्या त्यांच्या भूमिकेमुळेच असणार. जग एक गंमत आहे असे आजमावत आणि त्यात शक्यतोवर गमतीने जगावे असे द्वैताद्वैत ओळखून किंवा बाजूला सारून जगणारी जी माणसे मला भेटली त्यातले एक केशवकाका. त्यांच्याबद्दल मी लिहावे असे ग्रंथालीने सुचवले म्हणून हे दोन शब्द लिहीत आहे.

लग्न ही गोष्ट द्वैताचाच एक विलोभनीय अवतार असतो. त्यात स्त्रीच्या आयुष्यात सासर आणि माहेर असे द्वैत अवतरते. पुरुषाला किंवा नवऱ्याला ही सोय नाही. सासुरवाडीची माणसे असा शब्दप्रयोग कृत्रिम वाटतो. असे असले तरी ती त्याच्या लग्नानंतरची माणसे पुरुषाच्या आयुष्यात येतातच आणि त्यातल्या काहींशी गट्टी होते हे मी अनुभवले आहे. त्यातले एक केशवकाका. ते माझ्या बायकोच्या मावशीचे यजमान आणि ती त्यांना केशवकाका म्हणत असे म्हणून तेच नाव मी वापरत असे. ते माझ्याहून वयाने खूपच मोठे म्हणून गट्टी हा शब्द विचित्र वाटावा असाच होता. गट्टी होण्यासाठी आणखी एक द्वैत आडवे होते. ते म्हणजे माझ्या आयुष्यावर आणि मानसिकतेवर पुण्याचा जबरदस्त पगडा होता. आणि केशवकाका खानदेशाच्याही पलीकडले नागपूर-चंद्रपूरचे अस्सल वऱ्हाडी. अहो पुणे तिथे काय उणे अशी माझ्या मनातली निरगाठ केशवकाकांच्या ऐसपैस दिलखुलास आणि गुणग्राही स्वभावाने उकलली गेली ह्याचे श्रेय त्यांना द्यायलाच हवे. हे द्वैत त्याच्यामुळे मावळले. हा प्रश्न केवळ पुणे-नागपूर असा नव्हता. त्यांच्या स्वभावातल्या ऋणानुबंधी ऐसपैसपणामुळे ते अमरावतीसारख्या त्या काळच्या मोठ्या शहरात राहत होते तेव्हा चंद्रपूरचे अनेक तरुण नातेवाईक शिक्षणासाठी त्यांच्याकडे राहत असत हे ऐकून माझ्या लहानपणची माझी मी काका-मामांकडे राहत असे त्याची आठवण मला झाली. आणि माझ्या मनात तेही आणखी एक पालक असा एक अनुबंध तयार झाल्याची एक आठवण आहे.

अर्थात केशवकाका एक प्रसिद्ध मराठी कथाकारही होते. इंग्रजीचे प्राध्यापक आणि इंग्रजी वाङ्मयाची उत्तम जाण असलेले केशवकाका ते द्वैतही मोठ्या शिताफीने आणि आनंदाने जगले. मी शाळेत होतो तेव्हा माझी आई स्त्री, किर्लोस्कर अशा मासिकांमध्ये लिहीत असे, त्यामुळे घरी मराठी मासिके येत असत. पुढे ती गेली पण मासिके येतच राहिली त्यामुळे 'शांताराम' ह्या लेखकाच्या त्या काळाच्या थोड्या पुढे असलेल्या मानवी स्त्री-पुरुषांच्या स्वभावाच्या नैसर्गिक, मानसिक, शारीरिक भावनांना वाट करून देणाऱ्या प्रवाही सहज कथा वाचून मी प्रभावित झाल्याचे आठवते. एका अर्थाने ते ना.सी. फडके ह्यांचे स्वयंभू उत्तराधिकारी आहेत असे मला तेव्हा सुचले होते. ते सुचणे खरे की खोटे



साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यानंतर...

हे साहित्यिकांनी ठरवावे. केशवकाका पुढे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले तेव्हा ते माझे नातेवाईक आहेत असे मी मोठ्या अभिमानाने सांगत असे. त्या घटनेच्या आधीही त्यांची सरकार दरबारी ऊठबस असे हे माझ्या लक्षात आले होते, परंतु सरकारी ऊठबस असूनही ते सरकारधार्जिणे नव्हते हेही लक्षात आले होते. लोकसंग्रह हा त्यांचा स्वभावाचा एक फार सुंदर पैलू होता आणि त्या संग्रहात सर्व प्रकारच्या माणसांची ऊठबस होती आणि त्यांच्या बरोबर केशवकाकांच्या गप्पा रंगत त्याला फड हा मराठी शब्द चपखल होता आणि तो फड मी थोडा दुरून का होईना अनुभवला होता. मराठीत गप्पिष्ट आणि गोष्टीवेल्हाळ असे दोन शब्द आहेत आणि त्याला इंग्रजीत raconteur हा थोडा जास्त चांगला शब्द आहे. तसे ते होते. व्यक्तींबद्दल बोलताना आणि प्रसंग रंगवून सांगतांना त्याला निष्पाप पण मार्मिक विनोदाची झालर असे. कुचेष्टा ही गोष्ट त्यांच्या ध्यानीमनीही नसे. त्या गप्पांच्या फडात मध्ये पानसुपारीचा आणि ताम्बुलाचा डबा किंवा चंची असे आणि तेही अद्वैत आमच्यात होतेच. अशाच एकेवेळी त्यांनी मला सगळे लिखाण हे मुळात प्रथमपुरुषी एकवचनी असते किंवा असावे लागते असे सांगितले होते आणि ते वाक्य मनात ठेवूनच मी माझे पहिले पुस्तक 'जाणीव' लिहिले, हे इथे नमूद करतो. ते पुस्तक पुढे लोकप्रिय ठरले त्यामागे केशवकाकांचा कानमंत्र होता आणि तो मंत्र मनात ठेवूनच कोठलाही अभिनिवेश न बाळगता मी माझे सगळे नंतरचे लिखाण केले आहे. अशाच आणखी एका प्रसंगी मी त्यांना विचारले होते, परिस्थिती कशीही असो माणसे द्वेषयुक्त लिखाण करतात ते बरोबर की चूक? ते थोडे थबकले आणि नंतर म्हणाले होते, आयुष्य नेहमी अपूर्णच असते. त्या अपूर्णतेचा किती सोस करायचा हे प्रत्येकाने ठरवायला हवे परंतु द्वेष आणि क्रोध हा कोठल्याही लिखाणाचा स्थायीभाव होऊ नये असे माझे मत आहे. त्यांची कुटुंबवत्सलता सर्वसामावेशक अशीच होती हे वारंवार दिसत असे आणि म्हणूनच सुरेखा सबनीस ह्यांनी त्यांचे केलेले पुढील वर्णन त्यांच्या द्वैताद्वैताचे उत्तम दर्शन घडवते. त्या लिहितात– त्यांचे व्यक्तिमत्त्व कोठेही आक्रमक झालेले नाही. परंतु विलक्षण प्रसन्न आणि बहुरंगी आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर म्हणत असत आत्मक्लेश आणि परपीडा टाळली तर आनंद अबाधित राहतो आणि वाढतोही. तसेच केशवकाका ह्या द्वैती जगात वावरले आणि तेच त्यांचे द्वैताद्वैत होते.

**– रविन थत्ते**

rlthatte@gmail.com

**स्वत:च्या कथालेखनाविषयी पुरोहित लिहितात–**

''...मला वाटतं माझं लिखाण जितकं अनुभवांतून आलेलं आहे तितकं नसलं तरी बऱ्याच प्रमाणात ते वाचनातून आकारलेलं आहे. ज्यांनी माझ्या कथा किंवा लघुनिबंध वाचलेले आहेत त्यांना पटेल की अनुभव घेण्याची माझी पद्धत, तो व्यक्त करण्याची शैली परिष्कृत आहे. हे परिष्करण वाचनामुळे आलेलं आहे...''

''...माणूस म्हणून मी जितका जितका माणसांमध्ये बुडून गेलेला असतो तितका लेखक म्हणून त्यांच्यापासून दूर गेलेला असतो. या माणसाचं व्यक्तित्व दुहेरी तर नाही ना, अशीदेखील पुष्कळांना शंका येते. 'शिरवा', 'वाढवेळ', 'वाघ', 'कंटाळा', 'विवस्त्र', 'खार', 'अनंत', 'शुकसंवाद' अशा माझ्या निरनिराळ्या प्रकारच्या कथा घ्या. त्यांत तरलता आहे, सूक्ष्मता आहे, अतीव एकटेपण आहे, जखमी मन आहे, गांभीर्य आहे, कडवट विनोद आहे...'' (के.ज. पुरोहित, १९९५, पृ. १६९)

''...निरनिराळ्या घटना, निरनिराळ्या भाववृत्ती, निरनिराळ्या व्यक्तिरेखा पाहून मी त्या समजू शकतो; त्यांचा काही एक अर्थ मी लावू शकतो. वाचक टीकाकारांच्या मते माझ्या लिहिण्यात एक निराळा वैयक्तिक दृष्टिकोण स्पष्ट दिसतो. मात्र ठरावीक सामाजिक, राजकीय, साहित्यिक तत्त्वज्ञानविषयक अशा कोणत्याही पक्षीय दृष्टिकोणातून मी कशाकडेही बघत नाही. लेखक म्हणून मला दिसणाऱ्या विविधतेत मला एक सत्य सतत जाणवत आलं आहे की जड वास्तवाच्या पलीकडे, पाशवी वास्तवाच्या पलीकडे एकचित्तत्व असतं आणि त्यामुळेच अगदी वास्तववादी लिखाणदेखील अंतिम अर्थानं प्रतीकात्मक असतं. माझं लिखाण, माझ्या 'खार', 'शिंगं', 'वाघ' इत्यादी कथा या अर्थानंच प्रतीकात्मक आहेत. याचा अर्थ माझं लेखन संपूर्णपणे आत्मनेपदी वा गूढ आहे असं नव्हे.''



डॉ. रवींद्र शोभणे

# शांतारामांच्या कथेतील स्त्री-पुरुषसंबंधांचे वास्तवदर्शन


**मराठी** कथेच्या जडणघडणीच्या काळात म्हणजेच नवकथेच्या काळात मराठीत जे महत्त्वाचे कथाकार झालेत त्यांपैकी शांताराम यांचा विचार व उल्लेख अग्रक्रमाने करावा लागतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जागतिक साहित्यातच आमूलाग्र बदल घडून येत होते. जगण्याच्या, जीवनमूल्यांच्या संदर्भात सर्वसामान्य माणसाच्या श्रद्धाच पार उन्मळून पडत होत्या. मराठीत याच काळात नवसाहित्याचा जोरकस प्रवाह रूढ झाला आणि त्यातून केवळ महानगरीयच नव्हे तर निमशहरी आणि ग्रामीण भारतातील, महाराष्ट्रातील जीवनजाणिवा नव्या दृष्टिकोनातून, नव्या आविष्कारांसह साहित्यातून प्रकट व्हायला लागल्या. या काळात मराठी कथेपुरता विचार करावयाचा झाला तर गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले यांच्याबरोबरीने शांताराम (प्रा. के.ज. पुरोहित) यांचे नाव जाणकारांच्या नजरेस पडू लागले. त्यांचा पहिला कथासंग्रह 'संत्र्याचा बाग' १९४२ साली म्हणजे त्यांच्या वयाच्या एकोणिसाव्या प्रकाशित झाला. त्यानंतर १९४६ साली त्यांचा दुसरा कथासंग्रह 'मनमोर' या नावाने प्रसिद्ध झाला. त्यानंतर पुढचा म्हणजेच तिसरा कथासंग्रह 'शिरवा' १९५७ साली म्हणजे तब्बल अकरा वर्षांनी प्रसिद्ध झाला. हा कालक्रम देण्यामागचा हेतू असा की सुरुवातीचा त्यांचा कथालेखनाचा पहिला बहर होता. आणि हा बहर ओसरल्यानंतर पुढे त्यांनी आपल्या कथेकडे अधिक तटस्थपणे पाहत, कलात्मक शक्यता आणि जीवनाविषयीच्या वेगळ्या जाणिवांचा पैस तपासत लिहिलेली कथा अधिक प्रगल्भ आणि मूलगामी अशी झाली होती. कारण हा तिसरा कथासंग्रह मौजेतर्फे प्रकाशित झाला होता. आणि १९४५ ते १९६० हे दीड दशक तर मराठी कथेच्या संदर्भात अधिक महत्त्वपूर्ण असे समाजले जाते.

शांतारामांचा जन्म विदर्भातला. शिक्षणही विदर्भातच झाले. त्यामुळे वैदर्भीय जनजीवन, रीतिभाती, संस्कार या सगळ्या गोष्टी त्यांच्या प्रकृतीत, रक्तात खोलवर भिनलेल्या. मुरलेल्या. त्यांच्या पहिल्या कथासंग्रहाच्या शीर्षकावरूनसुद्धा वैदर्भीय मातीचा हा संस्कार त्यांच्यावर किती खोलवर भिनलेला होता ते जाणवते. त्यांच्या कथांतील बहुतेक व्यक्ती, वातावरण, चालीरीती, संस्कार वैदर्भीयच असतात हे त्यांच्या कथांची प्रकृती पाहून जाणवते. खरे तर त्यांची आपल्या हयातीतील भरपूर वर्षे मुंबईसारख्या महानगरात गेलीत. मुंबईने त्यांना कौटुंबिक आणि साहित्यिक दृष्ट्या स्थिरस्थावर केले. तथापि त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू विदर्भच राहिला आहे. गंगाधर गाडगीळ ह्या अर्थाने लेखकाचे नंदनवन ही संकल्पना मांडतात ती शांतारामांच्या संदर्भात पुरेपूर समर्पक ठरते, ती यामुळेच.

कथाकार म्हणून शांतारामांचा विचार केला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे त्यांची कथेवर असलेली निष्ठा. नैष्ठिकपणे त्यांनी कथेची धरलेली कास शेवटपर्यंत सोडली नाही. त्यांनी कथेसोबतच इतरही लेखन केले. नाही असे नाही; त्यात आत्मपर लेखन आहे, आठवणी आहेत, व्यक्तिचित्रे आहेत, अनुवादही आहेत; पण हे सगळे करताना त्यांनी कथा या वाङ्मयप्रकाराला कधी बाजूला सरले नाही किंवा आपल्याला आताशा कथा सुचत नाही, असाही सूर त्यांनी शेवटपर्यंत कधी काढला नाही. उलट २०११पर्यंत ('सोन्याचे मांजर' हा शेवटचा कथासंग्रह) किंवा त्यानंतरतरही काही काळ त्यांचे कथालेखन दिवाळी अंकांमधून सुरूच होते. त्यांचे या काळापर्यंत एकूण सतरा कथासंग्रह प्रकाशित झाले होते. या सतरा कथासंग्रहांत त्यांच्या जवळजवळ दोनशेच्या वर कथा प्रकाशित झाल्या आहेत. या कथांचे विषय, भूप्रदेश, माणसे, वातावरण काही अपवाद सोडले तर वैदर्भीय असेच आहे. त्यांनी आपल्या कथांमध्ये जे विषय हाताळले ते निश्चितच विविधांगी स्वरूपाचे आहेत. त्यात सामाजिक, मनोविश्लेषणात्मक, मानवी नात्यातील तरल संवेदना, रूपकात्मकता इत्यादी विषय किंवा कथालेखनाची प्रकृती दिसून येते; पण त्यासोबतच

त्यांनी लिहिलेल्या स्त्री-पुरुष नात्यातील, त्याच्या संबंधातील, ताणतणावातील गुंतागुंत साकारणाऱ्या कथा अधिक प्रभावी दिसून येतात. आजची मराठी कथा ज्या धीटपणे किंवा धाडसाने स्त्री-पुरुषसंबंधांचे चित्रण करते त्याचा विचार करता त्याकाळी अशाप्रकारचे कथालेखन करणे काळाच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकणारे होते, याचाही विचार आपल्याला करावा लागतो. किंबहुना या स्वरूपाचे लेखन किंवा चित्रण ही त्या काळीही बंडखोरी होती. आणि ती बंडखोरी नवसाहित्याने प्रथमतः सुरू केली हेही तेवढेच निर्विवाद. त्यापूर्वी अशा स्वरूपाचे लेखन करताना तत्कालीन लेखक/लेखिकांना समाजभयास्तव टोपणनावाने लेखन करावे लागल्याचीही मराठीत काही उदाहरणे आहेत; तथापि या बंडखोरीला तत्कालीन सांस्कृतिक धुरिणांनी केलेला विरोध, उठलेली वादळे (उदाहरणार्थ, मर्ढेकरांवर चाललेला अश्लीलतेचा खटला, भाऊ पाध्येंच्या 'वासूनाका'मुळे उठलेले वादळ, उद्धव शेळकेंच्या 'बाई विना बुवा'च्या शेवटाने झालेला स्फोट किंवा पुढे तेंडुलकरच्या नाट्यलेखनाच्या संदर्भात उठलेली वादळे ही प्रातिनिधिक उदाहरणे समोर ठेवली असताना या सगळ्या प्रकृतीला पाठबळ पुरवत आविष्काराच्या वाटा अधिक निर्भीड करण्याचे कार्य नवकथेच्या काळात ज्यांनी केले त्यापैकी शांताराम हे एक महत्त्वाचे कथालेखक ठरतात. त्या दृष्टीने शांतारामांच्या काही कथांचे परिशीलन या निमित्ताने करणे अगत्याचे ठरते.

'संत्र्याचा बाग' या शांतारामांच्या पहिल्या कथासंग्रहातील शीर्षककथा असलेली पहिलीच कथा या दृष्टीने समोर ठेवावी लागते. या कथासंग्रहात एकूण सोळा कथा आहेत. त्यापैकी 'संत्र्याचा बाग', 'वेडी', 'वंचना' आणि 'जीवनातील साक्षात्कार' या कथांमधून शांताराम या स्वरूपाच्या संबंधांचे चित्रण करताना दिसतात. या कथासंग्रहाच्या वेळी शांतारामांचे वय केवळ अठरा-एकोणीस वर्षांचे होते, हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच या कथा काहीशा बिचकत, दबकत या विषयाला स्पर्श करताना दिसतात. कारण या काळात आणि कथाकाराच्या वयाचा विचार करता या वयात या विषयाचे आकलन आणि मांडणीला स्वाभाविकपणे काही मर्यादा पडल्यावाचून राहत नाहीत. पण या मर्यादेतसुद्धा शांताराम या विषयाबद्दल असलेली आस्था आणि निर्भीडपणा अधिक तन्मयतेने व्यक्त करताना दिसतात. या कथासंग्रहातील बहुतेक कथांवर वि.स. खांडेकर आणि ना.सी. फडके यांच्या लेखनाचा बऱ्यापैकी प्रभाव होता. त्यामुळे या काळातील कथांमधून येणारे हे चित्रण काहीसे उपरे वाटते. ते स्वाभाविक वाटत नाही. 'मनमोर'पर्यंत त्यांच्या कथांचा प्रवास हा असा झालेला दिसून येतो. पुढे शांतारामांची कथा बदलत गेली. अधिक प्रगल्भ होत गेली. विशेषतः स्त्री-पुरुषचित्रणाच्या संदर्भात विचार करायचा तर ती शारीर पातळीवरून मानसिक-भावनिक पातळीवर




स्थिरावली. मानवी नात्याचे अनेक कंगोरे ती तपासू लागली. नात्यातील अनेकांगी पदर अधिक तन्मयतेने चितारू लागली. उद्रेक या कथेमध्ये हा झालेला बदल तपासून पाहिला तर तो त्यांच्या कथेच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ठरवता येईल.

कथाकार म्हणून शांताराम स्त्री-पुरुषसंबंधांबद्दलची कथा उभी करतात, तेव्हा ते त्या कथेमागील अनुभव स्वच्छपणे साकारताना दिसतात. हा कथात्म अनुभव मांडताना ते कुठल्याही दृष्टिकोनाची पडछाया त्या कथेवर पडणार नाही इतके सजग असतात. ते ज्या काळात कथालेखन करत होते त्या काळात मराठी साहित्यात युंग आणि फ्राईड या पाश्चात्य विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव अधिक खोलवर जाणवत होता. भारतीयच नव्हे तर जागतिक वाङ्मयात या दोन विचारवंतांच्या विचारांचे प्राबल्य आणि महत्त्व ठळकपणे जाणवत होते. मराठी नवकथेत या प्रभावाचे दर्शन बहुतेक लेखकांच्या लेखनातून होताना दिसते. उलट या विचारवंतांच्या प्रभावाला बाजूला सारून लेखन करणे दुरापास्त ठरणारे होते. त्यामुळे नवसाहित्याच्या पंथाचा थेट नसला तरी अप्रत्यक्ष प्रभाव मानणाऱ्या शांतारामांच्या कथेत हा भाग असणे तेवढेच स्वाभाविक होते. आणि स्त्री-पुरुषांच्या संबंधांच्या, शरीर-मनाच्या घुसमटीचा, मनोव्यापाराचा आधार म्हणजे या विचारांनी मांडलेले काही आडाखे, काही सिद्धांत. या निकषांवर त्यांची 'उद्रेक' ही एक यशस्वी कथा म्हणून ओळखली जाते.


शांतारामांच्या कथेचे वैशिष्ट्य म्हणजे ती कथा समग्र समाजदर्शनाने भारावलेली अशी आहे. ग्रामीण पातळीवरील जीवनापासून तर शहरी मध्यमवर्गीय आणि शहरी उच्चवर्गीय

जीवनाचा ही कथा सारख्याच अगत्याने विचार करते. हे त्यांच्या समग्र कथेच्या संदर्भात म्हणता येते; तसेच त्यांच्या स्त्री-पुरुषसंबंधांवरील कथांच्या संदर्भातसुद्धा म्हणता येते. त्यातही 'धर्म', 'गोपिका', 'चुरण', 'वेडी', 'राधाबाई' या ग्रामीण अनुभवविश्वाच्या कथा किंवा 'व्यवहार', 'वंचना', 'संत्र्याचा बाग', 'जमिनीवरची माणसं', 'स्वतःचं शरीर', 'अंधारवाट', 'उद्रेक' इत्यादी कथांमधून या संबंधांचे अनेक आयामी दर्शन घडते. 'रती'सारखी कथा ही एकाच वेळी शरीर-मनाच्या पातळीवर वावरत असताना ती आपल्या उच्चभ्रू समाजातील नीतिमत्तेचेही दर्शन घडवणारी ठरते. या प्रकारच्या विविधस्तरीय कथांमधून लेखक केवळ तटस्थपणे जीवनदर्शन घडवत नाहीत तर त्यामागे त्यांची त्या अनुभवासबंधीची आणि त्या त्या अनुभवातून परिष्कृत होणाऱ्या निष्ठांची प्रतीती सहजपणे येते. लेखक विविध पातळ्यांवरचे, विविध प्रकारचे लेखन करतो तेव्हा तो त्या समाजाचा एक घटक म्हणून कोणत्या बाजूचा आहे असा प्रश्न नकळतपणे वाचकांच्या मनात निर्माण होऊ शकतो. लेखकाचे ताठस्य हे अनुभवदर्शनापर्यंत आपण गृहीत धरतोच. त्यापुढे आशयाच्या आणि ध्वन्यार्थाच्या दृष्टीने विचार केला तर असे दिसते की कथाकार हे समाजस्वास्थ्याचा अधिक उदारपणे विचार करणारे लेखक आहेत. आपल्या लेखनातून कळत नकळत कुठला तरी संदेश वाचकांपर्यंत पोहोचत असतो. हा संदेश समाजस्वास्थ्य टिकून राहण्यासाठी आणि सामाजिक घडणीच्या संदर्भात कसा पूरक ठरतो, हे तपासून पाहणारे एक सर्जनशील लेखक म्हणून ते त्याचा गंभीरपणे विचार करतात.

कथेची मांडणी करताना शांताराम या सगळ्या बाबींचा विचार करताना मानवी स्वाभाविक भावना आणि अंत:प्रेरणा यांचा विसर पडू देत नाहीत. उदाहरणेच द्यायची झाली तर दोन-तीन कथांची देता येतील. पहिली कथा 'उद्रेक'. या कथेतील नायिका-सुनंदाच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची, स्वत्वाची कुठलीही तमा न बाळगता तिचा नवरा आपल्या मनाप्रमाणे तिच्या शरीराचा तिच्या मनाविरुद्ध भोग घेतो. तिच्या मनात त्याच्याविषयी प्रचंड घृणा आहे. तिरस्कार आहे. पण तो तिच्या शरीराचा भोग घेत असताना एकीकडे मनात त्याच्याविषयीची घृणा असली तरी शरीराला मात्र त्या क्षणी ते सुख हवे असते. तशाही अवस्थेत ती शरीराने त्याला साथ देते; पण नंतर आपले शरीर त्या क्रियेत त्याला का साथ देत होते म्हणून ती अस्वस्थही होते. मनाची आणि शरीराची ही द्वंद्वात्मक अवस्था, ही उलघाल सर्जनाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाची ठरते. तीच गोष्ट त्यांच्या 'धर्म' कथेच्या संदर्भात. आपला नवरा सखाराम हा पुरुष नाही, तो आपल्याला पुत्र देऊ शकत नाही, आणि आपण हा वाडा, हे घर, इथली चांगली माणसे सोडून जाऊ शकत नाही अशा पेचात अडकलेली नायिका-अंजनी -शेवटी वामन नावाच्या जवळच्या नात्यातल्या पुरुषाला जवळ करते आणि त्याच्यापासून दोन मुलांना जन्माला घालते. पण सखारामला आपण पुरुष नाही हे जसे ठाऊक आहे तसेच साऱ्या गावालासुद्धा ठाऊक आहे. अशा वेळी मुलांचं पितृत्व कुणाकडे हा पेच भयंकर स्वरूपात उभा राहतो. आणि शेवटी त्यातून अंजनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारते. अंजनीसोबतच सखाराम सुद्धा आत्महत्या करतो. आपण आपल्या जीवनात नैतिकता झुगारली आणि आपल्या धर्मापासून दूर गेलो याचे प्रायश्चित्त म्हणून शेवटी अंजनी हे असे पाऊल उचलते. नैतिकतेच्या मर्यादा ओलांडण्याचा परिणाम, शेवट काय हा प्रश्न संपूर्ण कथा वाचताना वाचकांच्या मनात रेंगाळत राहतो तेव्हा शांताराम त्यावरील उत्तर या शेवटच्या स्वरूपात देऊन समाजातील नैतिकतेच्या, आपल्या मूळ धर्माच्या बाजूने उभे राहतात.

याच विवेचनातली तिसरी कथा म्हणजे 'अंधारवाट'. इथेसुद्धा पुन्हा वेगळ्या स्वरूपात नैतिकतेचाच विचार ते नकळतपणे मांडतात. या कथेतील नायक गुलाबराव यांची बायको त्यांना सोडून घरातून निघून गेली आहे. आपली बायको आपल्याला सोडून गेली ही बोच, अपमानाची सल त्यांच्या मनात खोलवर दडून आहे. विठोबा हा त्यांची देखभाल करणारा त्यांचा नोकर. दोघांचीही कहाणी समांतरपणे चालणारी. दुभती म्हैस हे प्रतीक या कथेत सर्वार्थाने बोलके असेच आहे. त्या म्हशीचे दावे तोडून पळून जाणे ही घटना त्यांच्या आयुष्यात घडलेल्या घटनेला समांतर जाणारी. तसेच, कथेचा आंतरिक आशय अधिक गहिरा करणारी. यात शरीर आणि शरीराशी संबंधित सगळ्या विकारांना एक पैस मिळत जातो. शेवटी गुलाबरावांचे वेश्येकडे जाणे हेही या कथेतील नैतिक वर्तन म्हणूनच स्वीकारावे लागते. थोडक्यात लेखकाला आपल्या लेखनात आणि पर्यायाने त्यातील माणसांच्या वर्तनात ही नैतिकता पेरावी लागतेच. कारण जाणकार वाचक तुमच्या लेखनाच्या पलीकडे जाऊन तुमच्या लेखनातली ही नैतिकता तपासत असतो. शांतारामांच्या काही कथा मराठी कथासृष्टीत केवळ आपली वेगळी ओळख निर्माण करत नाहीत; तर त्यातल्या काही कथा मराठी कथावाङ्मयात पताकास्थानी शोभून दिसतील अशा गुणवत्तेच्या आहेत. 'धर्म' ही त्यातलीच एक कथा सांगता येईल.

शांतारामांच्या कथालेखनाच्या दृष्टीने त्यांच्या कथांचे काही टप्पे पडतात. त्यातला तिसरा टप्पा म्हणून 'अंधारवाट' हा कथासंग्रह केंद्रस्थानी ठेवावा लागतो. कारण या कथासंग्रहानंतर त्यांची कथा वेगळ्या वाटेने विकसित होऊ लागली हेही नाकारता येत नाही. आधीची काहीशी घटनाप्रधानतेच्या अंगाने विकसित होणारी कथा या वळणावर मनोविश्लेषणाच्या अंगाने जाणारी ठरते. शिवाय ही कथा अधिक धिटाईने उभी राहताना दिसते. यात व्यक्त होणारे माणसांचे विश्व हे मध्यमवर्गीय




असले तरी त्या विश्वातील माणसाच्या शरीर-मनाची, त्याच्या वासना-विकारांची, कामजीवनातील आंतरद्वंद्वांची, श्रद्धेची इत्यादी गोष्टींची या कथेत झालेली संरचना त्यांच्या कथेचे वेगळेपण अधिक प्रभावीपणे व्यक्त करते, हे महत्त्वाचे.

त्यांच्या स्त्री-पुरुषसंबंधांच्या संदर्भातील कथांचा विचार करायचा झाला तर ही कथा अधिक महत्त्वाची ठरते. कारण ती पूर्वाश्रमीच्या कथेतील सगळी सांकेतिकता बाजूला सारून माणूसपणाच्या जवळ जाणारी ठरते. ती अश्लील किंवा वादळी ठरत नाही. किंवा तसा देखावाही उभा करत नाही. तर मानवी शारीरप्रेरणा आणि त्या प्रेरणांच्या मागे असलेले स्वाभाविक वर्तन यावर ही कथा उभी राहते. शरीर-मनाची भूक ही मानवी प्रकृतीची आदिम भूक. पण या भुकेच्या पुढे जाणारी नाती कोणत्या पातळीवरची आहेत, त्यातून व्यक्त होणाऱ्या संबंधांची जात आणि त्या संबंधांतून व्यक्त होणारी जीवनविषयक जाण या बाबी या कथेला किंवा कलाकृतीला तिची एक मूल्यात्मकता बहाल करू पाहतात. शांतारामांची कथा शरीरमनाची भूक नाकारत नाही. उलट शरीरमनाची भूक, निसर्गदत्त वासनांचे दमन आणि त्यातून येणारी विकृती यांचे चित्रण ही कथा 'वेडी' किंवा 'मंजिऱ्या'सारख्या कथांतून येतेच; त्यातही ते या कथांतून स्त्रीमनाची विविध रूपे शोधण्याचा प्रयत्न करतात. ही स्त्री मग पत्नी, आई, बहीण, सखी, प्रेयसी या पातळीवरील दिसून येते. अर्थात या पातळीवर वावरताना तिच्यातली आदिमत्वाची जाणीव मात्र लेखक सातत्याने जगती ठेवतात. या अशा कथांमधून लेखक आदर्शवाद किंवा तत्सम वादांना आपल्या आसपासही फिरकू देत नाही, तर वास्तवाच्या भक्कम पायावर ही कथा उभी राहते. आणि याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'स्वतःचे शरीर' ही कथा समोर ठेवता येईल. यातली गुलाब म्हणजे मातृत्व आणि स्त्रीत्व या दोलायमान अवस्थेत हिंदोळत असते, तेव्हा ती आपली मूलभूत गरज म्हणून मुलीसंबंधी खोटे बोलते आणि भूपेंद्रसोबत फिरायला निघून जाते. तिचा हा निर्णय हेच या कथेचे मर्मस्थान ठरते. या कथेच्या संदर्भात शांतारामांच्या कथेचे अभ्यासक डॉ. विलास खोले लिहितात-स्त्री-पुरुषसंबंधांच्या चित्रणाबाबत शांतारामांची कामगिरी मोलाची आहे. माणसाची शारीरता ओळखणे-फिजिकॅलिटी ओळखणे ही बाब महत्त्वाची आहे. विशेषतः ज्या काळात मनोव्यापारांवर-मनोविश्लेषणावर भर दिला जात होता त्या काळात मराठी कथेला शारीर अनुभवांची जाण ठेवण्याचे काम शांतारामांनी केले आहे. त्यांनी शारीर बाबींना मानसिक पातळीवर नेण्याची आणि मानसिक बाबींना शारीर पातळीवर उतरवण्याची क्षमता कथा लिहून सिद्ध केली. (प्रस्तावना : शांताराम कथा : निवडक कथा) डॉ. खोलेंसारख्या अभ्यासकाच्या या विधानातून शांतारामांच्या कथेची पृथगात्मता अधिक प्रभावीपणे व्यक्त होते.

शांतारामांच्या स्त्री-पुरुषसंबंधांच्या कथांचे वैशिष्ट्य तपासून पाहता त्यांच्या लेखनाची काही वैशिष्ट्ये चटकन लक्षात येतात. त्यातले पहिले वैशिष्ट्य म्हणजे, कथेचे संयतपण. ही कथा कुठे आक्रस्ताळी, पिसाट, एकारलेली अशी होत नाही. तर त्यातून व्यक्त होणारा अनुभव अतिशय संयतपणे, तटस्थपणे आणि तरीही नेमकेपणाने मांडत जाते. अनावश्यक शरीरवर्णने, अनावश्यक बारकावे ही कथा देत नाही. दोन शब्दांमधील जागा अतिशय प्रभावीपणे बोलकेपणाने व्यक्त करते. या कथेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ही कथा मिताक्षरी आहे. यातील बहुतेक कथांचे विषय आजच्या संदर्भात तपासून पाहिले तर ते दीर्घकथेच्या सीमारेषेवर जाणारे वाटतात. परंतु शांताराम कथेतील काही गोष्टी वाचकांच्या सद्सदविवेकावर सोडून देतात. काही गोष्टी सूचकपणे मांडून त्यातली अर्थवाहकता अधिक प्रभावी करतात.

शांतारामांच्या कथेतील स्त्री-पुरुषचित्रणाच्या संदर्भात हा टाकलेला साधा प्रकाशझोत आहे. मूळ कथाप्रदेश अधिक सूक्ष्मपणे हाताळणे हे काम जिकीरीचे, पण अर्थपूर्ण असे ठरू शकेल, याची जाणीव ठेवावी लागते.

**– डॉ. रवींद्र शोभणे**
shobhaner@gmail.com



उषा तांबे

# सुखाचा सदरा घातलेला माणूस : शांताराम

**१९६२-६३** चे शैक्षणिक वर्ष सुरू होत होते. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्थशास्त्र या विषयीची निवड करून मी कॉलेज मधून घरी परतत होते. आवडीचा 'इंग्रजी साहित्य' हा विषय अमरावतीच्या कॉलेजमध्ये उपलब्ध नव्हता. तेवढ्यात 'उषा, थांब! हा काय भलताच विषय घेऊन ठेवला आहेस! बदल तो अर्ज आणि 'इंग्लिश लिटरेचरचा अर्ज भर!' असं आग्रहानं सांगत पुरोहितसर पुढे आले. प्रचंड प्रयत्न करून त्यांनी त्या विषयाची परवानगी आणली होती. धावतच मी कार्यालयात गेले, अर्ज मागे घेतला आणि 'इंग्लिश लिटरेचर' असं ऐटीत लिहून पुन्हा सुपूर्द केला. सरांनी आपल्यासाठी काहीतरी खास केलंय, हे लक्षात आलं, पण ते किती खास होतं, त्यानं आपलं आयुष्य किती बदलणार आहे, हे समजण्यासाठी बराच काळ जावा लागला.

त्यांच्या पत्नी, प्रभाताई, आम्हाला शाळेत इंग्रजी शिकवत होत्या. पदवीची तीन वर्षं पुरोहितसर आम्हाला तो विषय शिकवत होते. त्यामुळे त्या कुटुंबाशी अनेक वर्षांचे स्नेहबंध होते. अनेक वर्षांनंतर मुंबईमध्ये मी चर्चगेटला राहत असताना असेच रस्त्यावर एकदा सर भेटले आणि मध्ये काही काळ गेल्याच नसल्यासारखे म्हणाले, मग आता तू कॉलेजमध्ये शिकवायला कधी सुरू करते आहेस? मुलं पुरेशी मोठी झाली आहेत की तुझी! पुन्हा एकदा सरांनी माझ्या आयुष्याला नवी दिशा दाखवली आणि मी सिडनहॅम कॉलेजमध्ये रुजू झाले. नागपूर-मुंबई विद्यापीठांमधला फरक, माझ्या इंग्रजीच्या अभ्यासात पडलेला खंड, अध्यापनाचा नसलेला अनुभव, या शंकाकुशंकांना क्षणात दूर सारत त्यांनी मला पुन्हा एकदा आत्मविश्वास मिळवून दिला. नंतर मुंबई मराठी साहित्य संघातील आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातील माझ्या कामांसाठी वेळोवेळी मार्गदर्शन केलं. लेखनाला उत्तेजन दिलं. आपली मार्गदर्शकाची भूमिका पुरोहित पती-पत्नींनी कुठेही दडपण न आणता सातत्यानं पार पाडली. इंग्रजी साहित्य, मराठी साहित्यक्षेत्रातील वावर, यापलीकडे पती-पत्नीच्या सहजीवनाबद्दलही त्यांच्याकडून सतत शिकायला मिळालं. त्यात आम्ही दोघंही पुरोहितसरांचे विद्यार्थी असण्याचा विलक्षण योगायोगही होताच! त्यांच्या घराची दारं येणाऱ्यासाठी सतत उघडी असत. सरांची आता लेखनाची वेळ असेल का असा विचारही कुणाच्या मनात येत नसे. लेखनासाठी माणसांना टाकणारा मी नव्हे त्यांनी 'व्रात्यस्तोम'मध्ये जाहीरच केलेलं आहे.

त्यांनी प्रामुख्यानं कथालेखन केले. 'परागंदा'सारख्या काही कथांमध्ये कादंबरीची बीजं दडलेली असूनही त्यांनी



कार्यक्रमात संबोधित करताना के.ज. पुरोहित

तिचा विस्तार केला नाही. एका मुलाखतीत ते असंही म्हणाले होते, की एवढा (कादंबरीएवढा) वेळ घालणारा प्रकार लिहिणं माझ्या स्वभावातच नाही आणि कथेला गौण स्थान फक्त इंग्रजी वाङ्मयात, तेही साधारण १९३५ पर्यंतच होतं इतर युरोपीय देशात, अमेरिकेत, तसं नाही. त्यांच्या कथा विषयांमध्ये कमालीचं वैविध्य आहे. शहरी/ग्रामीण असं विभाजन त्यांच्या कथांमध्ये नाही. 'जमिनीवरची माणसं'मधील मध्यमवर्गीय स्नेहलता, 'बळी'मधली नागो गोंडाची बायको 'झिमा', नागपूरच्या पलीकडेच पाकिस्तान असेल असे वाटणारा 'परागंदा'मधील निर्वासित मुजीब, 'अंधारवाटे'मधील विश्वासघातानं उद्ध्वस्त झालेले गुलाबराव अशी कितीतरी पात्रं ते समर्थपणे सजीव करतात. मध्यमवर्ग तर त्यांचाच वर्ग. पण शेतीची पूर्ण प्रक्रिया त्यांना माहीत आहे. मध्य प्रदेशातील आदिवासींच्या जीवनाचे तपशील ते देऊ शकतात. पोतराजाचे दुःख त्यांना कळले आहे. आदिवासींच्या मनावरची कोकाम हाराजांची पकड त्यांना जाणवली आहे. या सर्व कथांचे परिसर अगदी वेगवेगळे आहेत आणि बारीकसारीक तपशिलांसह शांतारामांनी ते जिवंत केले आहेत. 'मी म्हणजे माझा परिसर' असे अभिमानानं सांगणाऱ्या पुरोहितसरांनी 'खार', 'शिरवा', 'जाणीव', 'वाघ' अशा भावसंपन्न, प्रतीकात्मक कथाही तेवढ्याच ताकदीनं लिहिल्या आहेत.

स्त्रीरूपाचे अनेक प्रकार त्यांनी आपल्या कथांमध्ये दाखवले आहेत, पण सर्व स्त्रियांची प्रातिनिधिक अशी एक व्यक्तिरेखा निर्माण केली नाही. त्यांच्या कथांमध्ये भावविवश, हळुवार अशा स्त्रिया नाहीत पण रूढ अर्थाने ते स्त्री-मुक्तिवादी नाहीत. त्यांच्या कथांमधील स्त्रिया, मग त्या शहरी असोत वा ग्रामीण, हताश होणाऱ्या नाहीत, आत्मसन्मानासाठी झगडणाऱ्या स्वतंत्र, विग्रही, वास्तववादी आहेत. 'नागीण'मधील 'नीला', 'रती'मधील 'रती', या तर उग्र, आक्रमक आहेत.

मनुष्यांच्या आदिम वासनांचे सामर्थ्य ते नाकारत नाहीत, हे 'वाघ'सारखी कथा दाखवते. परंतु या चित्रणांमध्ये कोठेही विकृती किंवा गंड येत नाही. शरीर संबंधांच्या वर्णनांनी ते वाचकांना उत्तेजित करत नाहीत, पण वासनांच्या आहारी जाणाऱ्यांनाही ते तुच्छही मानत नाहीत. ही सहिष्णुता आपल्या परिसरानं दिलेली आहे असं ते मानतात. विदर्भातील परिसर फार तीव्र नाही आणि सपाट प्रदेशावरील समाज जास्त सहिष्णू असतो असं ते म्हणतात.

शांतारामांनी सामाजिक संस्थेचं, पारंपरिक मूल्य चौकटीचं महत्त्व ओळखलं आहे. अशा संस्थांची अपरिहार्य आवश्यकता त्यांनी ओळखली आहे. जमिनीशी, घराशी, कौटुंबिक परिसराशी नाते तुटणे हे त्यांच्या दृष्टीने भयावह आहे. पारंपरिक सामाजिक चौकटींमुळे व्यक्तींना आधार मिळतो, पण त्यासाठी किंमत मोजावी लागते, काही इच्छा दाबून ठेवाव्या लागतात, व्यवस्थेविरुद्ध बंड केलं तरी अपराधी भावना राहतात, हेही ते जाणून आहेत. परंतु तुटत जाणारे व्यक्तिसामिष्ट संबंध त्यांना अपार दुःख देऊन जातात. स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी इतरांना वापरणारी माणसे त्यांना मान्य नाहीत. समाजात मुलं नसलेली व्यक्ती त्यांना सर्वाधिक भयप्रद वाटते. त्यामुळे समाजाच्या चौकटीतल्या दोषांसहीत किंवा त्या दोषांपासून शक्य तेवढी मुक्त अशी मूल्यव्यवस्था टिकवून धरणं त्यांना महत्त्वाचं वाटतं. जीवनात चांगल्या तसेच वाईट गोष्टी असतात. चांगल्या साहित्यात संपूर्ण जीवनदर्शन अपेक्षित आहे. परंतु अनेकदा काही लेखकांनी नकारात्मक चित्रण केलेलं दिसतं. तसंच शांतारामांनीही जीवनाची काळी बाजू दाखवली आहे. परंतु एकंदरीने त्यांचे लेखन सकारात्मकतेकडे झुकणारं आहे.



**एका घरगुती समारंभात के.ज. पुरोहित आणि प्रभाताई**

'मी, माझा परिसर, माझं गाव हाच माझ्या सर्वात आवडीचा विषय असतो' असं ते अनेकदा म्हणालेले आहेत. परंतु विदर्भामध्ये मान्यता मिळवायला वेळ लागतो, हेही ते मान्य करतात. मला जी मान्यता, प्रतिष्ठा मिळाली, ती मी पुणे-मुंबईला आलो नसतो, तर अशक्यप्राय राहिली असती असं ते प्रांजळपणे सांगतात. मिळालेल्या मान्यतेमध्ये ते समाधानी होते. त्यांनी सव्वादोनशेच्या वर कथा लिहिल्या. हे सातत्य, ही निर्मितीक्षमता मराठीमध्ये विरळाच दिसते.

लेखनासाठी त्यांनी माणसांना कधीही दूर केलं नाही. प्रभाताई 'सहचर' या लेखात म्हणतात, ह्यांना माणसं फार आवडतात. मैफिलीत त्यांचं मन रमतं. परंतु त्यांच्या कथा सूक्ष्म, तरल आहेत. माणूस म्हणून मी जितका जितका माणसांमध्ये बुडून गेलेला असतो, तितका लेखक म्हणून त्यांच्यापासून दूर गेलेला असतो. ''माझं लेखन स्वतःच्या एकांताशी सोबत करण्यासाठी आहे, तसंच ते स्वतःशी लढण्यासाठीही आहे...'' समाजाशी संगर करणारा मी नव्हे. माझी लढाई पुष्कळदा माझ्याशीच चालू असते. हा त्यांचा व्यक्तिमत्त्व आणि लेखन यांच्यामधील विरोधाभास हेही त्यांचं एक वैशिष्ट्य आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या समर्थनार्थ

ते वॉल्ट व्हिटमनच्या पुढील ओळी उद्धृत करतात–

Do I contradict myself?
Very well; then; I contradict myself.
I am large. I contain multitudes!

१९८९ साली अमरावती इथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं. शब्दशः एका मतानं ते निवडून आले होते. स्वागत समितीच्या मनात अमरावतीच्या दुसऱ्याच एका लेखकाचं नाव होतं. परंतु पुरोहितसरांच्या समन्वयवादी भूमिकेमुळे अमरावतीच्या स्वागत समितीचा विरोध, नामांतरवादी मोर्चा, इत्यादींची ते सहज आणि यशस्वी हाताळणी करू शकले. आपल्या भाषणात त्यांनी काही ठोस, पण सहजी मान्य न होणारे विचारही मांडले. साहित्य आणि शासन यांच्यात कायम तेढ असू शकत नाही. शासकांच्या सहवासामुळे साहित्यिक शीलभ्रष्ट होतील एवढं त्यांचं शील दुर्बल नसतं, असं त्यांनी भाषणात म्हटलं. महाराष्ट्रातच मराठीचा वाचकवर्ग बदलतो आहे याची त्यांना जाणीव आहे. परंतु या अधिकतर ग्रामीण, नवसाक्षर वर्गासाठी मुद्दाम वेगळं साहित्य लिहावं असं त्यांना वाटत नाही. किंबहुना वाचकवर्गामध्ये शहरी, ग्रामीण, मध्यमवर्गीय असे भेदच करू नयेत; सकस आणि समाजाभिमुख साहित्य सर्व तऱ्हेच्या वाचकांना आकर्षित करून घेईल – मात्र त्यासाठी साहित्यानं आपल्या जमिनीशी नातं पुन्हा जोडलं पाहिजे, निःसत्त्व चकचकीतपणाच्या आकर्षणाचे धोके ओळखले पाहिजेत, असं ते म्हणतात.

त्यांनी 'शांताराम' हे नाव का घेतलं याबद्दल एका ठिकाणी ते लिहितात, कवी अनिलांचं 'भग्नमूर्ती' हे काव्य व त्या प्रकारची, मुक्तछंदाची भलावण करणारी प्रस्तावना वाचून मी बिथरलो, व वाटलं ते लिहून काढलं अशी मुक्तछंदावर सडकून टीका करणारा लेख लिहिल्यामुळे त्यांनी शांताराम हे टोपण नाव घेतलं. शांता हे त्यांच्या आईचे नाव. पुढे ते कथाकार शांताराम याच नावानं ओळखले जाऊ लागले.

आमच्या पुरोहितबाईंनी 'सहचर' नावाचा अत्यंत सुंदर, सरांचे मार्मिक वर्णन करणारा लेख लिहिला आहे. लहानपणी त्या म्हणत, वाटेवरचा भोवरा, तोच माझा नवरा असा सदैव गडबडीत असणारा पती त्यांना लाभला. सामारोपादाखल त्या म्हणतात, 'या भोवऱ्याबरोबर हिंडताना, गरगरताना, डुलताना, पडताना कुठे काही लागलंच नाही, असं नाही; पण कायम लागलं, ते सुखच!

**– उषा तांबे**

ushatambe8@gmail.com


ग्रंथाली


**द्वारकानाथ संझगिरी** लिखित

**शतकांत एकच... सचिन**

**Scintillating Sachin**

इंग्रजी रूपांतर – **सतीश मुटाटकर**




**मूल्य ८०० रुपये । सवलतीत ५०० रुपये**

**मूल्य १००० रुपये । सवलतीत ६०० रुपये**



प्रकाश एलाबादकर

# साहित्यक्षेत्रातील आनंदयात्री : 'शांताराम'

**गेल्या** पिढीतील ज्येष्ठ कथाकार प्रा. के.ज. पुरोहित 'शांताराम' यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष. मराठी साहित्यातील नवकथांच्या प्रारंभीच्या काळात कथांना वेगळे वळण देणारे शांताराम यांची कथा आजही कालातीत आहे. प्रा. पुरोहित यांना विदर्भ साहित्य संघाने, कै. ग.त्र्यं. माडखोलकर स्मृती जीवनव्रती हा सर्वोच्च वाङ्मय पुरस्कार प्रदान करून त्यांचा गौरव केला होता. कथाकार शांताराम ह्यांना आदरांजली अर्पण करणारा माझा लेख.

१५ जून २०२२. मराठी साहित्यामधील श्रेष्ठ कथालेखक कै. प्रा. केशव जगन्नाथ पुरोहित ऊर्फ 'शांताराम' यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष या दिनांकापासून सुरू झाले. १५ जून २०२३ रोजी त्याची सांगता आहे. आज पुरोहितसर असते तर, शतायुषी झाले असते. महाराष्ट्राच्या अतिपूर्वेला असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी हे पुरोहितांचे गाव. या भागाला झाडीपट्टी असे संबोधन आहे. मराठी साहित्यात त्यांचे कथाक्षेत्रातील योगदान फार मोठे आणि महत्त्वाचे आहे. कथा या एकाच साहित्य प्रकाराला त्यांनी वाहून घेतले होते, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, वा.कृ. चोरघडे, ग.दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, पु.भा. भावे, सदानंद रेगे या आणि अशा अनेक तालेवार कथाकारांनी मराठी कथासाहित्यात आपापल्या स्वतंत्र मुद्रा कायम करण्याचा तो काळ होता. त्याच काळात शांताराम आपली कथा घेऊन आले आणि कालांतराने स्थिरावले. नुसते स्थिरावलेच नाही तर आपले एक विशिष्ट आसन त्यांनी निर्माण केले.

शांतारामांचा जन्म नागपूरचा. सध्याच्या गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी आणि बिलासपूर येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण आणि नंतरचे शिक्षण चंद्रपूरला झाले होते. वयाच्या सतराव्या वर्षी १९४० साली मॅट्रिक झालेल्या शांतारामांचा 'वाऱ्यावरील विचार' हा लेख 'सह्याद्री' मासिकाच्या त्याच



वर्षीच्या डिसेंबर महिन्याच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. कवी अनिल यांच्या काव्याविषयीचा तो लेख होता. सप्टेंबर १९४१ सालच्या सह्याद्री मासिकाच्या अंकात शांतारामांची पहिली कथा प्रसिद्ध झाली 'भेदरेखा!' त्या वर्षभरात त्यांनी आणखी पंधरा कथा लिहिल्या आणि त्यांचा पहिला कथासंग्रह १९४२ साली प्रसिद्ध झाला, 'संत्र्याची बाग' त्यालाही आज ८१ वर्षे झाली. म्हणजे या कथासंग्रहाचे हे सहस्रचंद्रदर्शनाचे वर्ष आहे हे विशेष!

'भेदरेखा'नंतर त्यांनी मागे वळून बघितलेच नाही. मनमोर (१९४६), शिरवा (१९५७), छळ आणि इतर कथा (१९५९), जमिनीवरची माणसं (१९५९), लाटा (१९६२), धर्म (१९६२), चंद्र माझा सखा (१९६९), अंधारवाटा (१९७७), उद्विग्न सरोवर (१९८२), चेटूक (१९८४), निवडक शांताराम (१९८९), काय गाववाले (१९८९), संध्याराग (१९९०),

रेलां रेलां (१९९२), चैत्रागम (२००४), आणि कृष्णपक्ष (२००६)असे शांतारामांचे सोन्याचं मांजर (२०११) आणि एकूण सतरा कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. नंतरच्या काळात त्यांनी दोन लघुनिबंधसंग्रह आणि बीजाक्षरे हा समीक्षात्मक लेखांचा संग्रह प्रसिद्ध केला. व्रात्यस्तोम (१९९५), मी असता (१९९८), आठवणींचा पार (१९९८), ठेवणीतल्या चीजा (२००३) ही त्यांची आत्मकथनपर पुस्तके त्या-त्या काळातील समाजजीवनावर प्रकाश टाकतात. नुसतीच समाजजीवनावर प्रकाश टाकत नाहीत तर, त्यांचे त्याविषयीचे चिंतनही समोर आणतात. त्यांनी प्रवासवर्णनपर असे सफरनामा हे पुस्तक लिहिलेले आहे. शांतारामांची कथा व्यामिश्र स्वरूपाची आहे, त्यांचे लघुनिबंध लेखनही वेगळ्या वाटांनी जाणारे आहे. मानवी जीवनातील विकार आणि संस्कार यांच्यातील संघर्ष, आणि परस्परसंबंधाचा वेध त्यांच्या कथांमधून प्रकर्षाने जाणवतो. त्यांचे लघुनिबंधही असेच विचार प्रेरक आहेत.

ज्येष्ठ समीक्षक रा.भा. पाटणकर लिहितात, दैनंदिन जीवनातील साधेसुधे प्रसंग निवडून त्या संबंधीचे मिश्किलतेची झाक असणारे चिंतन, तल्लख कल्पकतेचे दर्शन घडवणारी खुसखुशीत शैली, चौफेर डोळस निरीक्षण, देशी-विदेशी वाङ्मयाचे संस्कार, तसेच कला आणि वाङ्मयीन प्रश्न यासंबंधीचे मर्मग्राही आकलन या लघुनिबंधातून आढळते. शांतारामांची निरोगी, आनंदी व निर्विकल्प अशी जीवनदृष्टी या लघुनिबंधातून स्पष्ट प्रतिबिंबित होते. भोवतीच्या सामाजिक, सांस्कृतिक चौकटीत आपापल्या स्वभावानुसार आणि वासनाविकारांनुसार सहजपणे, मुक्तपणे जगणारे स्त्रीपुरुष रंगवताना स्वतःची अशी विशिष्ट मूल्यभावात्मक भूमिका ठेवून कथालेखन करणारा कथाकार, ही शांतारामांची ओळख आहे. मानवी स्वभावातील, वर्तनातील विसंगती, प्रकृतीतील दोष, या उणिवा जाणून घेणारी सहृदय व्यापकता आणि जीवनातील व्यामिश्रतेकडे व विसंगतीकडे पाहण्यातल्या समजूतदारपणामुळे घनस्वरूपी मूल्यांबद्दल व जरूर तेथे केलेल्या बंडखोरपणाबद्दल त्यांना वाटणाऱ्या आदरामुळे त्यांच्या कथा मूल्ययुक्त झाल्या आहेत.

त्यांचे प्रारंभीचे शिक्षण चंद्रपूरला झाले. नागपूरहून १९४६ साली इंग्रजी साहित्यात ते एम.ए. झाले. ज्येष्ठ समीक्षक कुसुमावतीबाई देशपांडे यांचे ते आवडते विद्यार्थी होते असे आमच्या एका ज्येष्ठ मित्राने सांगितले. १९४६ ते १९६४ या कालावधीत अमरावतीचे विदर्भ महाविद्यालय, नंतरच्या काळात १९७१पर्यंत नागपूर महाविद्यालय (मॉरिस कॉलेज) आणि नंतर मुंबईचे इस्माईल युसूफ महाविद्यालय येथे ते प्राध्यापक होते. १९८१साली ते तेथूनच प्राचार्य म्हणून निवृत्त झाले.


वैनगंगेच्या काठावरील अतिदुर्गम भागातील चामोर्शी


'जीवनव्रती' प्रदान करतानाचा क्षण

गावापासून-सिंधुसागराच्या किनाऱ्यावरील मोहमयी मुंबई-पर्यंतच्या ह्या प्रवासातील डोळस निरीक्षणे त्यांच्या साहित्यात जागोजागी विखुरली आहेत. वैनगंगेच्या प्रवाहातील खळखळाट आणि सिंधुसागराचा धीरगंभीर मर्मर ध्वनी त्यांच्या लेखनात एकरूप झालेले दिसतात. हा वैदर्भीय सारस्वत एका फार मोठ्या परिवर्तनशील कालखंडाचा डोळस साक्षीदार आहे. पहिल्या महायुद्धाच्या काळापासून एकविसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंतचा प्रवास त्याच्या कथेत आहे. ग्रामीण भागातील जीवन ते अद्ययावत शहरी जीवन असा मोठा पट ते आपल्या कथांमधून उलगडून दाखवतात. मानवी जीवनातील नीतिमत्ता आणि मूल्ये यांची जपणूक करणारे त्यांचे साहित्य आहे. विदर्भापासून बरीच वर्षे दूर राहूनही आपली 'वैदर्भी रीती' सोडली नाही. एकदा गप्पांच्या ओघात ते मला म्हणाले, प्रकाश, मुंबईला घोळीची भाजी मिळत नाही. घोळीच्या सीझनमध्ये मी नागपूरला आलो किंवा कुणी मित्र नागपूरला आला की, इथून भरपूर घोळ घेऊन मुंबईला जातो आणि मग घोळीची भाजी खायला माझे मुंबईतील खास नागपुरी मित्र घरी बोलावतो. घोळीचा उत्सव!!

वैदर्भीय मातीची अशी ओढ त्यांच्या लेखनात आणि स्वभावात दिसत असे.

१९८९ साली अमरावतीला ६२वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते. रा.सु. गवई हे त्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. त्या संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक खूप गाजली होती. अमरावती येथे एकेकाळी प्राध्यापक असलेले के.ज. पुरोहित आणि मूळचे अमरावतीचेच बाशिंदे असलेले पत्रकार-नाटककार विद्याधर गोखले हे दोन दिग्गज परस्परांविरुद्ध शड्डू ठोकून उभे होते. अण्णासाहेब गोखले या संमेलनाचे अध्यक्ष व्हावेत अशी अमरावतीकरांची मनोमन इच्छा होती. परंतु अण्णासाहेब गोखले निवडणूक हरले आणि अध्यक्षपदाची माळ पडली ती पुरोहितसरांच्या गळ्यात. पुरोहितसर फक्त एकाच मताने निवडून आले. परंतु अण्णासाहेब



संमेलनात असे वावरले की, जणू तेच संमेलनाचे अध्यक्ष आहेत. निवडणुकीतील सर्व विरोध संमेलन सुरू होताच मावळून गेला. हेच विदर्भीय मातीचे आणि वृत्तीचे वैशिष्ट्य आहे. मतभेद जरूर असतात परंतु मनभेद मात्र कधीच नसतात. अण्णासाहेब आणि पुरोहितसर या दोघांच्याही उपस्थितीने अमरावतीचे संमेलन उजळून निघाले होते. याच संमेलनात अण्णासाहेबांची प्रकट मुलाखत झाली होती. माझी आणि पुरोहित सरांची पहिली भेट आणि ओळख या संमेलनात झाली.

त्यानंतर लगेच १९९० साली पुन्हा भेट झाली. विदर्भ साहित्य संघाचे ४१वे विदर्भ साहित्य संमेलन १९९० साली चंद्रपूरला झाले होते. आनंद निकेतन महाविद्यालय (वरोडा) येथील मराठी साहित्याचे प्राध्यापक आणि ज्येष्ठ नाटककार प्रा. मो.दा. देशमुख या संमेलनाचे अध्यक्ष होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी उद्घाटक होते. या संमेलनात पुरोहित सरांना सन्मानपूर्वक बोलावले होते. नंतर दोनचारदा भेटी झाल्या.पुढे वाढते वय आणि प्रकृतिअस्वास्थ्य याने नागपूरला त्यांचे येणे कमी होत गेले. महाराष्ट्रात दरवर्षी अनेक नियतकालिकांचे दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. प्रतिष्ठित आणि नवोदित अशा अनेक कथालेखकांच्या कथा त्यात प्रसिद्ध होत असतात. त्यातून त्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट कथेला पुरस्कार देण्यासाठी पुरोहितसरांनी विदर्भ साहित्य संघाला देणगी दिली. दरवर्षी १४ जानेवारीला होणाऱ्या विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभातील वाङ्मय पुरस्कारांमध्ये हा 'शांताराम कथा पुरस्कार' प्रदान केला जातो. सन्मानचिन्ह आणि ५००० रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

के.ज. पुरोहित, 'शांताराम' यांनी जवळपास सहा दशकांवर मौलिक लेखन करून मराठी साहित्याचे कथादालन आणि विचारदालन समृद्ध केले. विदर्भाच्या या सिद्धहस्त कथाकाराला विदर्भ साहित्य संघाने २०१५ सालचा, पत्रमहर्षी आणि श्रेष्ठ कादंबरीकार ग.त्र्यं. माडखोलकर स्मृती जीवनव्रती हा सर्वोच्च वाङ्मय पुरस्कार घोषित केला. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी त्यांचे, प्रकृतीच्या कारणाने, नागपूरला येणे शक्य नव्हते. विदर्भ साहित्य संघाने हा समारंभ, मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहकार्याने, मुंबईला साहित्य सहवास (वांद्रे) येथे पुरोहितसरांच्या निवासस्थानी, ६ फेब्रुवारी २०१५ रोजी आयोजित केला होता. विदर्भ साहित्य संघाच्या तत्कालीन सरचिटणीस शोभा उबगडे, कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे आणि मी, या समारंभासाठी मुंबईस गेलो होतो. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन मी केले होते. डॉ. शोभणे यांनी प्रा. पुरोहितांच्या गौरवपर भाषण केले होते. शोभाताईंनी आभार मानले. मी गोंदियाला असताना माझे शाळेतील कलीग मनोहर बाळकृष्ण जोशी हे एकेकाळी अमरावतीला विमविमध्ये पुरोहितसरांचे विद्यार्थी होते. ते या समारंभाला अंधेरीहून मुद्दाम आले होते. या समारंभाला मुंबई मराठी साहित्य संघाच्या अध्यक्ष उषा तांबे, सचिव उज्ज्वला मेहेंदळे, कादंबरीकार अरुण साधू, डॉ. उषाताई देशमुख, अशोक बेंडखळे, सुरेखा सबनीस, गंगाधर गाडगीळ यांच्या सहधर्मचारिणी अशी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. पुरोहितसरांसारख्या देदीप्यमान कारकीर्द असलेल्या साहित्यिकाशी जवळचा संबंध येणे, आणि त्या निमित्ताने आपल्याही आयुष्यात प्रकाशाचे चार किरण येणे हा भाग्ययोगच नाही काय?

**– प्रकाश एदलाबादकर**
edlabadkar.p@gmail.com

॥ग्रंथाली॥

# घुसमट

**दत्ता पवार**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**



परिस्थितीने दंश केलेल्या एका प्रौढ स्त्रीची एक कथा-व्यथा आहे. प्रथम ती वंचनेच्या रांगोळ्या घालते. मग ती कालांतराने एक एक रांगोळी पुसून टाकण्याचा प्रयत्न करते. यातच तिची घुसमट होते.

**– दत्ता पवार**



डॉ. पांडुरंग भानुशाली

# कथाकार शांताराम यांच्या प्रतीककथा


**प्राचार्य** के.ज. पुरोहित उपाख्य कथाकार शांताराम यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. कथाकार शांताराम यांच्या विविध धाटणीच्या सुमारे ३०० कथा प्रसिद्ध आहेत. त्यांचे एकूण १७ कथासंग्रह आणि ललितगद्य, आत्मनिवेदनपर लेखसंग्रह इत्यादी २५ च्या वर त्यांची पुस्तके आजपर्यंत प्रकाशित झालेली आहेत. त्यांनी कौटुंबिक जिव्हाळ्याच्या, मानवी नात्यासंबंधीच्या, मानवी कामजीवन आणि स्खलनशीलतेच्या कथा जशा लिहिल्या, तशाच त्यांनी तरल काव्यात्मक अशा प्रतीककथा, (मूडकथा) लिहिलेल्या आहेत. 'शिरवा', 'चंद्र माझा सखा', 'दीपत्कार', 'जाळे', 'परीक्षा', 'मानव', 'पुरुष', 'खार', 'शिंगे', 'कंटाळा' अशा प्रतीककथा लिहिलेल्या आहेत.

१९४० नंतर बा.सी. मर्ढेकरांनी मराठी नवतेच्या साहित्य चळवळीने मराठी साहित्यमध्ये जे नवे प्रवाह रूढ केले, त्यामुळे मराठी साहित्याचीच नव्हे तर त्यावरील समीक्षेचीही घुसळण झाली. त्यामुळे समकालीन लेखकांवर त्यांचा प्रभाव पडणे साहाजिकच होते. त्यामुळे मराठी साहित्य आमूलाग्र बदलले. नवकथा ही घटना-प्रसंगांनी, न कथानक कथांनी, आशय-आविष्काराच्या एकात्मतेने, मानवी क्षणभंगुरता, वैश्विक आव्हाने, मानवी स्खलनशीलता हा युगबोध कवेत घेत कथाकारांनी कथेला एक नवा आयाम देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. प्रतीकात्मता हा नव्या कथांचा सहजधर्म मानला गेला. त्यामध्ये गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, पु.भा. भावे, अरविंद गोखले, कथाकार शांताराम, कमल देसाई, गौरी देशपांडे प्रा. केशव मेश्राम, बाबूराव बागूल, वामनराव चोरघडे, मधुकर केचे इत्यादी अनेक लेखकांनी नव्या युगबोधाच्या कथा लिहिल्या. मा.गा. देशमुख म्हणाले त्याप्रमाणे, कथाकार शांताराम हे पाचवे नवकथाकार मानले गेले. (अर्थात त्यांनी स्वत: असे काहीही म्हटले नाही) रंजन, बोध आणि जीवननिष्ठेपलीकडे जीवनाचे आकलन, अनुभवाशी एकरूप होऊन निर्माण होणाऱ्या सखोल आणि व्यापक भावनांच्या आवेगाने केलेला आविष्कार म्हणजे वाङ्मय ही नवी जाणीव हीच नववाङ्मयामागील प्रेरणा मर्ढेकरांनी मानली आणि त्यांच्या ह्या नवतेच्या विचाराशी नाते सांगणाऱ्या कथा अनेक कथालेखकांनी लिहिल्या. एकटेपणा हा नवतेचा युगबोध मानून मानवी संबंधांचा वेध घेण्याचा प्रयत्न नवकथाकार करू लालगे. जीवनाचे वैयर्थ, शूद्रत्व, मृत्यूची सर्वभक्षकता, क्षणभंगुरता, एकाकीपण यातून आलेली हताश वृत्ती नवकथेचा विषय होऊ लागली. कामविकारांसारख्या मूलगामी प्रेरणांचे मानवी जीवनावर असलेले वर्चस्व त्यातून येणारी स्खलनशीलता, त्यातून गौण होत जाणारी नैतिकता, पावित्र्य या संकल्पनांचे चित्रण नवकथेत होऊ लागले.

हा बदल कवेत घेत कथाकार शांतारामांनी आपल्या कथा लिहायला सुरुवात केली. अर्थात वरील सर्वच बदल त्यांच्या कथांमधून दिसतच असे नाही. परंतु तरल भाववृत्ती, मानवी संवेदना, नातेसंबधाचे ताणेबाणे, जीवनातील कामवासना ह्या गोष्टी प्रामुख्याने त्यांनी आपल्या कथांतून व्यक्त केलेल्या आहेत. त्यांनी नव्या-जुन्याचा ताणाबाणा जुळवत आपल्या कथा लिहिल्या. त्यांनी नागर, ग्रामीण, आदिवाशी, नीतीकथा, आदिबंधात्मक कथा, विनोदी कथा अशा विविध प्रकारच्या कथा लिहिल्या, त्यातील वरील प्रतीकात्मक कथांचा विचार इथे करावयाचा आहे. लेखकाला एखाद्या प्रतिमेने झपाटलेले असते. त्यावर तो मानवी भावभावना आरोपित करीत त्यांवर प्रतीके तयार करून कथा बेततो. जी.ए. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'विदुषक', 'नाग', 'गुंतवळ', 'मुखवटा' यांसारख्या कथा ह्या उदाहरणादाखल घेता येतील. शांतारामांच्या 'शिरवा' या कथेत अश प्रकारची तरलता, भावस्थिती (मूड) व्यक्त झालेली आहे. उन्हाच्या काहिलीनंतर पावसाचा आलेला शिरवा मानवी जीवनातील सारा शीणभाग, कंटाळा, नैराश्य कसा घालवून टाकतो त्याचे वर्णन या कथेत येते. कचेरीतील अर्धवट राहिलेले काम रामचंद्रराव घरी आणतात. उन्हाच्या

काहिलीत हाऽऽय, हुऽऽश्श करीत चेहऱ्यावरील घाम निपटीत ते आपले काम पूर्ण करीत होते. अशा वेळी निसर्गाच्या खोड्या सुरू झाल्या. सोसाट्याचा वारा धूळ उडवीत आत शिरत होता. कागद अस्ताव्यस्त करीत होता. तेवढ्यात पावसाने त्यांच्या तोंडावर एक थंडगार हबका मारला. ढग लोंबकळत सशाची पांढरी पिल्ले उलटी टांगल्यासारखी दिसू लागले. रामचंद्रराव निसर्गाला मुक्तपणे प्रतिसाद देऊ लागतात. ते मुलासारखे होऊन आपल्या बायकोलाही त्यात सामावून घेण्यासाठी तिला हाक मारतात. शिरवा आला तसा गेला. क्षणभराचा विरंगुळा आणि दीर्घकाळची उभारी देऊन गेला. मा.गो. देशमुख म्हणाले त्याप्रमाणे, लघुनिबंधाच्या मर्यादा सांभाळून त्यांनी दिलखुलास अनिर्बंध विस्कळीत आणि आत्मनेपदी अभिव्यक्तीची साधना केली. या कथेतेतून लघुनिबंधाने दिलेली आत्मनेपदी भाषाशैली आणि आत्मप्रत्ययामुळे आलेली मानवी सुख-दु:खाची परस्मैपदी दृष्टीने पाहण्याची खोड त्यामुळे नव्या कथेला आवश्यक असलेला थोडासा परस्परविसंगत भासणाण्या उभय दृष्टिकोनांचा शांतारामांच्या शिरव्यातून जणू परस्परानुप्रवेश झाला आहे.

रस्त्याच्या संधिप्रकाशत लेखकाला खार दिसते आणि सुरू होतो एक अबोल सुसंवाद. निवेदक नि खार यांनी एकमेकांना ओळखलेले असते. 'तू अजून मला भितेस?' 'भीत नाही, पण अंतर राखलेलं बरं! शब्दसहवासाला अंतर हवंच.' 'हूंऽऽ!' 'हुंकाराने काय सुरुवात करता?' 'मग काय ओंकाराने करू? असं चित्रासारखं बोलू नका.' 'सुसूत्र तरी बोलू की नको?' 'बोलण्यापेक्षा बोलायचा प्रस्तावच फार करता तुम्ही.' 'काय बोलू?' 'तुम्ही काय बोलायचं हे मी कसं सांगू?' परंतु तिच्या नुसत्या दर्शनाने कलावंताला कलेची, कवीला काव्याची प्रेरणा मिळते. शांतारामांची खार ही वास्तवातली खारही आहे. नि त्यांची पत्नीही आहे. खार ही बायकोचे रूप घेऊन येते. ही कथा वाचकाला तरल, निसरड्या भावनांची आंदोलने जाणवतात. पुरुषाला परकी स्त्री नेहमीच आकर्षणाचा विषय ठरते. पण शेवटी पापभिरू मध्यमवर्गीय माणूस आपल्या बायकोचाच स्वीकार करतो. ही एक प्रतीकात्मक भावस्थितीची कथा आहे.





'कंटाळा' या कथेतील वर्णन पाहा- ''शहर पेंगत होतं. त्याची रस्त्याची नाडी तेवढी थरथरत होती. एक भला मोठा माळ जांभया देत अजगरासारखा सुस्त लोळत पडला होता. उन्हानं आपली फाटकी लक्तरं झाडाझाडावर वाळू घातली होती. वारा ती वाळविण्याचा मिषानं त्यांना टरटरा फाडीत मवाल्यासारखा शिट्या फुंकीत भटकत होता. धूळ येणाऱ्या-जाणाऱ्यांशी निर्लज्जपणे खेटून जात होती. सूर्य मात्र धरतीचं सावज खरपूस भाजून त्यावर कचकचा ताव मारत होता. रोजगारी रेवड्या आपल्या ढकलगाडीवर घालून काळ हातातून भटकत होता. लाचारी त्याच्याशी लाळ घोटत होती. थंड झालेल्या चुलीशेजारी लुगडं उशाशी घेऊन घरगुती काळजी घटकाभर आडवी झाली होती. शाळू संस्कृती चार भिंताड्यांच्या आत सहीच्या कोंबड्यांना कागदी बेंद्यात कचाकच भरत होती. रेडिओचं संगीत झोपलेल्या कानांशी खवचटपणे कठंघोष करीत होतं. चैन सावरीच्या गाद्यांवर लोळत होती. गरजू गरीब घाम गाळत उरस्फोड करीत होती. उडाणटप्पू बेकारी एखाद्या भिकार हॉटेलात चहाचा सिंगल ढोसत बसली होती.'' यातील वर्णन हे असांकेतिक असून ही कथा म्हणजे गद्य काव्यच आहे. त्यातील शहराचे, रस्त्याचे, उन्हाचे, बाजाराचे वर्णन काव्यातून उत्प्रेक्षा, रूपकात्मक वर्णन नवकथेला जवळ जाणारे आहे. शांतारामांच्या कथेतील 'मी' अनुभूतीच्या प्रामाणिकपणामुळे यशस्वी झाला आहे. तो बऱ्याच वेळा निवेदक म्हणून कथेत डोकावताना दिसतो. सामरसेट मॉमच्या 'आय'सारखा तो यशस्वी ठरला आहे. म्हणूनच शांतारामांना भारतीय सॉमरसेट मॉम म्हणायला प्रत्यवाय नाही. शांतारामांच्या कथेतील निवेदनाची अशी खास शैली आहे. आशयाच्या मागणीनुसार ती बदलत जाते. हा बदल वाचकाला सौंदर्यानुभूती देतोच, अंतर्मुखही करतो.

'दीपत्कार' ही कथाही अशीच वास्तव आणि भासात्मक पातळीवरील आहे. वास्तव आणि भास यांची सरमिसळ केल्यामुळे तिला काव्यात्मकता लाभली आहे. निवेदकाच्या अतृप्त वासनेतून भासात्मक पातळीवर त्यांचे व्यक्तिकरण होते. अंधारात माणूस पाप करतो नि धर्मही. पंचज्ञानेंद्रिय संवेद्य वातावरणाने जादू केली. आणि काहीतरी तरल, काहीतरी सौंदर्यपूर्ण आस्वादक असे भावात्मक घडत गेले. त्यात सौंदर्य होते तशीच आदिम वासनाही होती. त्यात मुख्य जीवनाचे संकेतही लपलेले आहेत. कथेची वर्णनशैली कथेला एका विवक्षित उंचीवर नेते. एक रसिक मन, रसिक सभा एकरूप झाली. गायनाच्या, नर्तनाच्या कार्यक्रमाने ही जादू केली. कार्यक्रमाचे हे वर्णन पाहा- ''बजवय्याच्या मध्यभागी बसलेल्या गायिकेने श्रोत्यांना किंचित लवून अभिवादन केले. वाद्यांच्या घरट्यातून सुरांचे पक्षी बाहेर पडले. आणि मंडपात विहरू, खेळू लागले. त्या सुराच्या साथीला गायिकेचे मधुर स्वर

धावू लागले. आणि तंतूवाद्य आणि तिचा गोड गळा एकमेकांशी फेर धरू लागले. आलिंगन देऊ लागले. सूरसागराच्या लाटा माझ्या पायांशी लोळू लागल्या. मला भिजवू लागल्या. मी शांत झालो. शांतीत न्हाऊ लागलो. आनंदाने मी मोहोरू लागलो. मघाचा माझा विद्वेष संपला, तडफड संपली.'' दीपत्कार कथा तिच्या समूह भासामुळे समीक्षकांचे, रसिक वाचकांचे लक्ष वेधून घेते. कार्यक्रम मध्यावर आला नि मंडपातले सगळे दिवे एकाएकी गेले. गाणे बंद झाले. कोलाहल वाढला. काही दिसत नव्हतं. मी कुठेतरी चाललो होतो. स्त्रियांच्या भेदरलेल्या किंकाळ्या सुरू झाल्या. चीत्कार वाढू लागले. त्यांचा मागोवा घेत मी नुसता चाललो होतो. फेकला जात होतो. खोल खोल... अंधाराच्या गुहेत. स्त्रियांचे चेहरे नीट निदत नव्हते त्यांची रंगीबेरंगी वस्त्रे दिसत नव्हती. वस्त्र ओढल्याचा, वस्त्रे फाडल्याचा आवाज नुसता ऐकू येत होता. मी सैरावैरा धावत होतो. इतके दु:शासन, इतक्या द्रौपदी? त्यांना कोण सोडवणार? कोण वस्त्रे पुरविणार? मी जसजसा त्या आवाजांजवळ पोचलो तसतसे मला वाटू लागले हे सगळे आवाज प्रीतीचे, हे सगळे आवाज उन्मादाचे. वस्त्रे फाटली जात नव्हती. स्वखुशीने सगळे जण आणि सगळ्या जणी वस्त्रे भिरकावून देत होत्या. ज्यांची वस्त्रे एकमेकांत गुरफटतील ते एकमेकांचे सखे, एकमेकांच्या सख्या. माझी सखी कोण? मी कुणाचा सखा? मी कुणाशी क्रीडा करायची? मी धावत होतो. स्त्रिया मला हूल देत होत्या. ओरडून मला त्या बोलावीत होत्या. हा पाठलाग किती वेळ करायचा? तेव्हापासूनचा तो चालत होता. पळाच्या सुखासाठी स्त्रिया धावत होत्या. पुरुष धावत होते युगानुयुगे. इतक्यात दिवे परत आले. एक अशुभ स्वप्न नाहीसे झाले. घामघूम झालेला नायक दिव्यापुढे हात जोडून शांताकारं भुजगशयनं स्तोत्र म्हणत होता. दिव्या दिव्या दीपत्कार म्हणत होता. पहिले दृश्य गूढ, व्यापक साक्षात्काराचे तर दुसरे भयगंडाचे, मुक्त झालेल्या वासनेचे. भासात्मक घटनेत बेभान झालेल्या दोन्ही बाजूंनी एका सनातन मूल प्रवृत्तीचा मुक्त आविष्कार होत होता. कोणत्याही विशिष्ट सांस्कृतिक गटाच्या संस्काराने घडविलेला समूह नव्हता तो. येथे आहेत आदिमानव, लैंगिक उन्मादाने बेभान झालेली केवळ शरीरे. कथेतून व्यक्त होणारे भास, स्वप्नातील आशयद्रव्ये, व्यक्तिरेखांच्या आदिमतेचे, प्रसन्नतेचे द्योतक असल्याचे पाटणकर म्हणतात, ते खरेच आहे. अर्धजागृत जीवनजाणिवा येथे भास स्वप्नांचे रूप घेऊन येतात. त्यामुळे कथेला एक प्रकारचे काव्यात्मक तरल, भावसंपन्न स्वरूप प्राप्त होते. तिला आपोआपच आदिबंधात्मक स्वरूप प्राप्त झालेले होते.

'चंद्र माझा सखा' या कथेतही नायिका एका चांदण्या रात्री चंद्र पाहून बेभान होते. नायिका बरेच दिवस आजारी होती. नेहमीच्या हालचालींच्या अभावी तिची ज्ञानेंद्रिये क्षीण बनली आहेत; त्यामुळे कथेतील वर्णन तरल, सूक्ष्म नि प्रत्ययकारी झाले आहे. मी उठले तेव्हा मध्यरात्रीची सामसूम होती. पण सामसूम तरी का म्हणायचे? मला घरातल्या सगळ्यांचे श्वास ऐकू येत होते. फार काय बाहेरच्या सृष्टीचा श्वासदेखील मला स्पष्ट ऐकू येत होता. फुलांना पंख फुटून ती आकाशात शांत उडू लागली आहेत. किंवा मी कशिदा काढीत बसले असून माझा एक पाय सतत धडकत असणाऱ्या चितेला अडकला आहे. अर्धजागृतीत ती हळूहळू अंगणात येते. तिचे शरीर तिच्यासारखे हलके झाले होते. स्वच्छ निर्मळ चांदण्याच्या विश्वात ती येऊन पोचते. तिला एक वेगळ्या प्रकारची ऐंद्रियता प्राप्त झालेली आहे. ती म्हणते, त्या ठिकाणी येताच माझ्या व्यक्तित्वाचा






कणन् कण एका मस्त सुवासाने भारून गेला. चांदण्याचा सुगंध? तुम्ही म्हणाल, तो सुवास रातराणीचा असेल, पण रातराणीचा गंध माझ्या ओळखीचा का नाही? त्या रात्री मी अनुभवलेला तो सौरभ निश्चितच चंद्रप्रकाशाचा होता. चंद्राने तिच्यावर जादू केली होती. तो स्वच्छ, तलम, सुगंधी प्रकाश मी मनसोक्त उपभोगीत उभी राहिले. आता कासाविशी उरली नाही, अस्वस्थता राहिली नाही, जडपणाची जाणीव संपली. आपली वस्त्रे गळली आहेत, आपल्या देहाचे जोखड उतरले आहे. आणि आपण केवळ प्रकाशमय, केवळ आनंदमय झालो आहोत. एवढीच जाणीव उरली होती. इंद्रियांच्या संवेदना होत्या पण त्या संवेदनांचे बंधन नव्हते. ज्या चंद्राने ही जादू केली होती, त्याच्याकडे मी पाहत होते. आणि मोरासारखे सबंध देहाला नवीन डोळे आले होते. त्या अनंत डोळ्यांनी चंद्राकडे बघत होते. आपण एक रम्य, उत्कट भावकाव्य वाचीत आहोत, असा प्रत्यय ही कथा वाचताना येतो.

'अंधारवाट' संग्रहातील 'वाघ' ही कथा अशीच प्रतीकात्मक आहे. त्यातील वाघ हा माणसातल्या आदिम प्रेरणेचे प्रतीक आहे. अत्यंत करडा असणाऱ्या माणसाला आतल्या आत मिट्ट काळोखाची, नेणिवेची- जिला व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादा नसतात अशा नेणिवेची - भीती वाटते. आदिम इच्छांचे भय व नंतर त्यांचा केलेला स्वीकार अशा प्रकारचे स्पष्टीकरण या कथेच्या बाबतीत करता येऊ शकते. एके दिवशी रात्री निवेदक पान खाण्यासाठी दूरवर काळोखात राधेश्यामच्या ठेल्यावर जातो. पलंगतोड पान चघळीत असताना अंधारात त्याला वाघाचे डोळे चमकताना दिसतात. तो घाबरून घरी परततो. घरातही वाघ असल्याचा त्याला दिसतो. तो कुणालाही त्रास न देता झोपलेल्या पत्नी-मुलांना ओलांडून खिडकीतून पसार होतो. फक्त घरातल्या पाळीव मांजरावर तो गुरगुरतो. दुसऱ्या दिवशीही तसेच घडते. मात्र तेव्हा तो अंगणात दिसतो. शेजारी निवेदकाला ओरडून त्याला घरात घेण्यास सांगतात. निवेदक त्यांना सांगतो, तो वाघ त्याचा नाही. तो कुणाचाच नसतो आणि असला तरी ज्याचा-त्याचा असतो. पाटणकर या कथेविषयी म्हणतात, अनादी काळापासून मानवाला अशा प्रकारच्या काळोखाचे भय असते. पण आपल्या सावलीच्या शोधात निघणे म्हणजे काय असावे? एका अर्थाने हा शोध व्यक्तिमत्त्वाचा आहे. खरे पाहता सावली म्हणजे उजेडाचा अभाव. ती काळोखात अंतर्भूत व्हायला हवी. पण इथे ती सावली मिट्ट काळोखापेक्षा वेगळी आहे... तिला विशिष्टता असते, पण इथे अभिप्रेत असणारी सावली ही वेगळी आहे. अशा प्रकारचे अमूर्त पातळीवरचे प्रश्न उपस्थित करणे हे शांतारामांच्या प्रकृतीशी जुळणारे नव्हे. 'वाघ' ही त्या दृष्टीने एक जाणीवनेणिवेच्या काठावरील प्रतीकात्मक कथा आहे.

**– डॉ. पांडुरंग भानुशाली**
pandurangbhanushali326@gmail.com

**प्रा. उषा तांबे, विजया राजाध्यक्ष, प्रभाताई पुरोहित, के.ज. पुरोहित आणि सुरेखा सबनीस**



**शांताराम यांचे नवकथाकार असणे-नसणे याबद्दल विजया राजाध्यक्षांनी लिहिले आहे-**

''वाङ्मयीन जीवनातही भौगोलिक अंतरामुळे निर्माण झालेला कदाचित, एकांत नसता, तर काय घडले असते? चार नवकथाकारांत हा आजवर चौकटीबाहेरचा मानला गेलेला पाचवा कथाकारही सामील झाला असता का? मग नवकथेची समीक्षाही जरा वेगळ्या पद्धतीने झाली असती का? तसे वाटत नाही. त्या संवेदनभावात चार नवकथाकारांच्या वैशिष्ट्यांचे कदाचित नकळतच झालेले संमिश्रण आहे. म्हणूनच 'चंद्र माझा सखा'सारखी आध्यात्मिक अनुभवाची कथा, 'अधर्म'सारखी माणसांनी दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकूनही नीतिमूल्यांचा सांभाळ केल्याचे दाखवणारी कथा, 'देवाचं शेत'सारखी एका शेताचा प्रश्न-गुंते सहजपणे सुटत कसा नाहीसा झाला हे सांगणारी कथा, या खास शांतारामांच्या कथा आहेत. अनुक्रमे गाडगीळ, गोखले, माडगूळकर यांच्या वळणाने त्या जात नाहीत. कारण शांतारामांकडे असलेली सामग्री व ती हाताळण्याची पद्धतही वेगळी आहे.''

''त्यांनी जाणूनबुजून कोणतेही प्रयोग केले असे वाटत नाही. पण या कधी ऐसपैस, तर कधी नेमस्त, कधी बोलघेवड्या, तर कधी मितभाषी, कधी सूचक, तर कधी सरळ निर्णय घेऊन निश्चित उत्तरे देणाऱ्या, कधी काव्यात्म, प्रतीकात्मक, तर कधी सरधोपट कथेत संवादाचे व निवेदनाचे नाना ढंग आहेत.''



**नीला वसंत उपाध्ये**

# तितकाच भला माणूसही!

**'ओल्ड** बॉम्बे'च्या सीमेजवळील शीवच्या अलीकडचा पूर्व राजमार्गावरचा 'एव्हरार्ड नगर' हा बेस्ट बसथांबा म्हणजे, आम्हा मूळ निवासी आगरी लोकांचे चुनाभट्टी हे मूळ गाव! महापालिकेची सातवीपर्यंतची प्राथमिक शाळा वगळता, एरवी गावात बससेवा शिक्षण-वाचनालयाच्या दृष्टीने सर्वच उल्हास होता! दादरच्या शाळेत जायचे तर सकाळ-संध्याकाळ चुनाभट्टी ते शीव हे पायी चालत अर्धा तास घेणारे अंतर ताडताड चालून तोडायचे नि शीव रेल्वेस्थानकातून मध्य रेल्वेची उपनगरी गाडी पकडून दादरला शाळेत जाऊन, तसेच परतीचा प्रवास करून घरी परतायचे असा सगळा प्रकार! सुदैवाने शालान्त परीक्षेपर्यंतचेच शिक्षण घेतलेल्या नोकरदार आईवडिलांना साहित्य-वाचनाची आवड होती. त्यामुळे त्यांनी आम्हा भावंडांसाठी विकतच्या बालसाहित्याचे एक खास वाचनालय घरीच काढून दिले होते.

त्यामुळे मोठ्यांच्या/मोठ्यांसाठीच्या साहित्याचा प्रथम परिचय मला १९६२ साली शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन शीवच्या एस.आय.इ.एस. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावरच झाला! पूर्वजन्मीचे सुकृत म्हणून, तोवर ज्यांची केवळ नावेच ऐकली-वाचली होती. ते 'मौज' प्रकाशनाचे साक्षेपी संपादक श्री.पु. भागवत आणि पुढे २००७ साली 'मराठी शब्दलेखन कोश' सिद्ध करून मराठी वाङ्मयव्यवहाराला मोलाचा हातभार लावलेल्या प्रा. श्री.म. माटेशिष्या-अजोड अध्यापिका यास्मिन शेख यांनी, त्या नव्याने निघालेल्या महाविद्यालयात इतके उत्कृष्ट ग्रंथसंग्रहालय उभारले होते, की ते बघूनच वेडे व्हायला झाले! कॉलेज फी भरल्याची पावती दाखवत 'मला आता लायब्ररीतून पुस्तक वाचायला मिळू शकेल का?' विचारायला मी काऊंटरपाशी गेले तर तिथे समोरच कोणीतरी वाचून परत केलेला 'संत्र्यांचा बाग' हा कथासंग्रह पडलेला होता! शांताराम (प्रा. के.ज. पुरोहित) हे लेखकाचे नाव ओळखीचे वाटल्याने आणि कथा हा माझा आवडता साहित्यप्रकार असल्याने, झेप घालूनच ते पुस्तक मी उचलले आणि दुपारी लेक्चर नसल्याने लायब्ररीतच बसून, एका बैठकीत वाचून पूर्ण केले. कथाकार के.ज. पुरोहितांशी झालेला तो माझा पहिला परिचय!

पदवी परीक्षेला मराठी भाषा-साहित्य हाच माझा अभ्यासविषय ठरला आहे, हे कळल्यावर तर प्रथम वर्षापासूनच भागवतसर-शेखबाईंनी मला ताब्यात घेतले. आणि पद्धतशीरपणे सर्व महत्त्वाचे साहित्यिक - त्यांचे ग्रंथ माझ्याकडून शिस्तबद्धपणे वाचून घेतले. साहित्याचा अभ्यास करताना नुसती पुस्तकेच नाही वाचायची तर, त्या साहित्यिकातील माणसाचाही वेध घ्यायचे संस्कार सर-बाईंनी वर्गाच्या वार्षिक सहली सातारा-पुणे आदी ठिकाणी नेऊन, अनेक साहित्यिकांच्या घरी जाऊन, त्यांच्याशी प्रत्यक्ष गप्पा मारण्याची संधी देऊन केले होते. झपाट्याने बदलत्या मुंबईच्या वांद्रे उपनगरात १९६७ साली 'साहित्य सहवास' ही साहित्यिकांसाठीच्या निवासस्थानांची संस्था उभारायला सरकारने आरंभ केला आणि इथे-तिथे विखुरलेले डझनवारी ख्यातनाम साहित्यिक एका ठिकाणी भेटण्याची शक्यता निर्माण झाली. महाविद्यालयाच्या वाङ्मयमंडळाच्या उद्‌घाटनाच्या वेळी परिचय झाल्यावर, माझ्यात 'स्पार्क' जाणवल्याने, मराठीची प्राध्यापिका होण्याचे जुने वेड विसरून पत्रकारितेत - त्यातही बातमीदारीत उतरण्याचा सल्ला दिलेले कथाकार अरविंद गोखलेकाकाही 'रागिणी' बांधून होताच पुण्याहून मंदाकाकी व मुलांना घेऊन 'साहित्य सहवास'-मध्येच राहायला आले. आमच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्येही मला साहित्य-संस्कृती हे विशेष वार्ताक्षेत्र सोपवले गेले आणि 'साहित्य सहवास' हे एक प्रमुख वार्ताक्षेत्र बनले.

**करंदीकर–पुरोहित**

पण वृत्तसंकलनाचे काम असले–नसले तरीही ‘साहित्य–सहवास’मध्ये कधीही–कुणाकडेही गेले तरी, गोखलेकाकांच्या घराखेरीज, विंदा करंदीकर नि पुरोहितसर यांच्या घरात उभ्या–उभ्या तरी जाऊन, त्यांना नमस्कार करून आल्याशिवाय चैनच पडत नसे. विंदांचा वाढदिवस २३ ऑगस्टचा तर पुरोहितसरांचा १५ जूनचा! त्या दिवशी सकाळी आठवणीने त्यांना शुभेच्छा द्यायला फोन केला, की त्यांना झालेला आनंद त्याच्या फोनवरील बोलण्यातूनही जाणवायचा!

खरे तर, इस्माईल युसूफ वगैरे महाविद्यालयांना इंग्रजीचे अध्यापक राहिलेले पुरोहितसर कधीच मला थेट अध्यापनाला नव्हते. पण त्यांचे एकूण व्यक्तिमत्त्वच इतके आश्वस्त करणारे होते, की त्यांना आदराने ‘पुरोहित’सर म्हणूनच संबोधावेसे वाटायचे! त्यांच्याविषयी आदर वाटायचा, कारण समोरच्या माणसाशी बोलताना, ते त्याच्या–त्याच्या पातळीवर जाऊन बोलायचे, आपल्या विद्वत्तेचे दडपण त्याच्यावर येऊ द्यायचे नाहीत! बातमीदारी–सांसारिक जबाबदाऱ्या सांभाळायच्या दुहेरी कसरतीत, इंग्रजी बऱ्यापैकी चांगले असूनही, इंग्रजी ग्रंथवाचनात मी अद्ययावत राहत नाही, याबद्दलची खंत सौम्य शब्दात नेहमी बोलून दाखवायचे! इंग्रजी वाचन नाही, तर किमान अनुवादाकडे तरी वळण्याचा सल्ला त्या खंतीमधूनच त्यांनी मला दिला. म्हणूनच नॅशनल बुक ट्रस्टच्या तीन बालकादंबरीका आणि दिवंगत साहित्यिक बनी रुबन यांच्या ‘आवासाचे दिवस’ हा इंग्रजी कथासंग्रह माझ्याकडून भाषांतरित होऊन गेले.

**कथासंग्रहाचा आग्रह**

पुरोहितसरांचा मनाचा मोठेपणा असामान्य होता. एकदा कुठल्यातरी अंकात प्रसिद्ध झालेली माझी एक कथा त्यांच्या वाचनात आली, ती आवडली तर पुढल्या आमच्या भेटीत आठवणीने त्या कथेचे कौतुक त्यांनी केले आणि ‘कथासंग्रह काढला की नाही?’ म्हणून आस्थेने चौकशी केली. आता माझ्या घाईगर्दीच्या जगण्यानुसार, माझे कथालेखनही धांदल–गडबडीतच व्हायचे! उपनगरातून कार्यालयात जाताना, उपनगरी रेल्वेगाडीच्या डब्यात टेकायला मिळाले की हातातल्या कागदावर कधीही डोक्यातली कथा खरडली जायची. मग कधी कुणी दिवाळी अंकाकरिता कथा मागितली, की त्यातली एखादी ‘फेअर’ लिहून द्यायची... पण छापून आलेली कथा जपून ठेवण्याइतका निवांतपणा कधी नसायचाच त्यामुळे खूपशा कथा अशातशाच गहाळ होऊन गेल्या. पण पुरोहितसरांनी आस्थेने केलेली कथासंग्रह काढण्याची सूचना कुठेतरी स्मरणात होतीच. त्यामुळे साठी उलटून निवृत्त झाले तेव्हा प्रथम इतस्तत: विखुरलेल्या कथा मिळवून ‘ती आणि त्या’ हा स्त्रीस्पंदनाच्या कथांचा संग्रह जुळवला, तेव्हा स्वाभाविकपणेच त्याला प्रस्तावना पुरोहितसरांकडून घ्यावीशी वाटली. बिचकतच मी त्यांना जुळवलेल्या कथा वाचायला देऊन प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली तर त्यांनी इतक्या तत्परतेने आशिर्वचपर पण समतोलपणे गुणदोष–दिग्दर्शन करणारी प्रस्तावना लिहून दिली, की त्यांच्या स्नेहशीलतेने मी भारावलेच!

**गोळीबंद समीक्षा**

साहित्य अभ्यासक–समीक्षक म्हणून खरे तर खूप समीक्षालेखन आयुष्यात मी वाचले आहे. पण प्रकृती फारशी नीट नसतानाही, वयाच्या ८४ व्या वर्षी पुरोहितसरांनी संग्रहातील पंधराही कथांचे जे नेमके समीक्षण झटपट लिहून दिलेय, ते गोळीबंद–परखड पण दिलासादायी समीक्षेचा उत्कृष्ट नमुनाच आहे, अगदी मुळातूनच वाचावा असा! पण तो कथासंग्रह आता उपलब्ध नसल्यामुळे (आत्मप्रौढीचा दोष पत्करूनही!) त्या समीक्षेची धावती झलक इथे दाखवायचा मोह आवरत नाहीय! ‘चार मिश्र शब्द’ या शीर्षकाखाली सरांनी पाच पाने भरून त्या समीक्षणात लिहिले होते–

‘नीला उपाध्ये यांच्या ‘ती आणि त्या...’ या पहिल्याच कथासंग्रहातील कथा वाचल्यावर काही बाबी ठळकपणे जाणवल्या. त्यांचा हा पहिलाच कथासंग्रह असला तरी, त्यांच्या लिखाणात पहिलटपणा मुळीच जाणवला नाही. त्यांची लिहिण्याची शैली, जीवनाकडे बघण्याची दृष्टी परिष्कृत, परिपक्व अशी आहे. वृत्तपत्रीय लेखनाचा अनुभव असल्याने, कल्पित ललित लेखन केले तरी, ‘ते वृत्तपत्रीय आहे’ अशी त्याची वासलात लावणे सोपे असते. नीला उपाध्ये यांच्या या संग्रहाबाबत मात्र असे विधान करणे पूर्वग्रहदूषित आणि अन्यायाचे होईल. लेखिका वृत्तपत्रकार म्हणून मुरलेली आहे, हे येथे अप्रस्तुत आहे. जिने कथा लिहाव्यात, अशाच व्यक्तीने या कथा लिहिलेल्या आहेत.

या कथांची काही वैशिष्ट्ये अगदी सहज दिसतात. ती अशी:– या कथांमध्ये स्थळांची, पात्रांची, घटनांची विविधता आहे आणि त्यांचे चित्रण (वृत्तपत्रीय लेखनानुभवातून!) अत्यंत वस्तुनिष्ठ आहे. भाषा त्या–त्या कथानकाला अनुरूप अशी आहे म्हणजे फाजील अलंकरण किंवा भाषिक तोडमोड यांपासून ती अलिप्त आहे. ‘दे दान, सुटे गिरान’ किंवा ‘टाचण्या टोचलेलं लिंबू’ या कथांची रचना जशी कलात्मक आहे, तशीच त्यांतील भाषाही विशेष आकर्षक आहे... या संग्रहातील कथांचा दुसरा विशेष जाणवतो, तो म्हणजे, त्या कथा स्त्रीच्या दृष्टिकोनातून लिहिलेल्या आहेत. स्त्रीची दृष्टी म्हटल्यावर त्या चित्रणात शारीरिकता जशी अपरिहार्य ठरते, तशीच लेखिकेने चित्रित केलेल्या पात्रांची नैतिकताही!



शांताराम आणि विलास खोले

—“—

**विलास खोले लिहितात–**

''शांतारामांनी आपल्या कथानुभवांना कथारूप देताना निवेदनाच्या तीन पद्धती मुख्यत्वे उपयोगात आणलेल्या दिसतात. प्रथमपुरुषी निवेदनपद्धती, तृतीयपुरुषी निवेदनपद्धती आणि या दोन पद्धतींना दिलेली संवादाची जोड. शांतारामांच्या कथारूपाचा विचार करताना एक गोष्ट फार स्पष्टपणे जाणवते ती म्हणजे त्यांच्या कथेतील निवेदक अतिशय प्रभावी आहे. तो संपूर्ण कथेचे नियंत्रण करतो. त्यांच्या कथेतील गोष्टीचे अस्तित्व काही प्रमाणात का होईना, कायम राहिले आहे याचे कारणही मुख्यत: निवेदकच होय. हा निवेदक गोष्टीवेल्हाळ, काहीसे अघळपघळ बोलणारा आणि कथानिवेदन करताकरताच घटनांच्या व व्यक्तींच्या अनुषंगाने भाष्य करणारा आहे. या भाष्याला शांतारामांच्या लेखनस्वभावात महत्त्वाचे स्थान आहे. त्या भाष्यातून जीवनविषयक मर्मदृष्टी प्रकटत असते. निवेदकाच्या जाणिवेतून कथांतील पात्रांचे व्यवहार, त्यांच्या हालचाली, कृती, चिंतन आकार धारण करतात, तर काही वेळा पात्रांच्या जाणिवेतून निवेदकाचे चिंतन प्रकटत राहते. निवेदकाने लावलेल्या घटनांच्या अन्वयार्थाची लय काही कथांत अवतरते. भाषेच्या पातळीवर कथानुभवाची सचेतन रचना करताना अनुभवाचा सारा ताण वा सैलपणा वा सारे सौंदर्य आंतरिक सर्व घटकांसह व त्यांच्या आंतरसंबंधांसह ते यथार्थपणे मूर्त करतात. प्रत्येक सर्जनशील लेखक आपल्या वाङ्मयीन कलाकृतीतून जीवनदर्शन घडविण्याचे प्रयत्न करीत असतो, तसेच निवेदनाद्वारे कालाच्या तीन परिमाणांना एकदम एकत्र खेळवण्याची क्रिया सर्वत्र होत असते.''

'अशीही एक चांगुणा', 'एकाकी' या कथा त्या दृष्टीने पाहण्याजोग्या आहेत–

'बहिरी शाळुंका' या कथेचा शेवट मनात घर करून राहणारा आहे. तो असा–

'तेवढ्यात त्यांचं लक्ष पडवीतल्या सरपणाच्या ढिगाऱ्यातल्या त्या कुऱ्हाडीकडे गेलं. तिरीमिरीसरशी त्यांनी ती कुऱ्हाड दोन्ही हातांनी उचलली आणि तिचे एकामागोमाग एक घाव गाभाऱ्यातल्या फुलांनी सुरेख सजलेल्या शिवलिंगावर घालायला सुरुवात केली. एकीकडे बेभानपणे त्या बरळत होत्या, 'बोल, सांग ना मला, असा हा जळता निखारा माझ्या पदरात का घातलास तू? काय मी अस्सं पाप केलं होतं? हेच फळ दिलंस मला तू?' – श्रद्धेय शंकराला जाब विचारताना भान हरपून कुऱ्हाडीसकट शाळुंकेवर त्या कधी कोसळल्या, हे त्यांना कळलंही नाही...'

हे अतिनाट्य नव्हे! जिथे जे हवे, तिथे ते, बेतानेच दिलेले आपल्याला या कथेत दिसते. 'काय अस्सं पाप मी केलं होतं?' या प्रश्नातील 'अस्सं'कडे वाचकाचे लक्ष जायला हवे. तो साधा 'असं' नाही तर 'अस्सं' आहे. लेखिकेने फार मोठे बंड संपूर्ण आवेशासह चित्रित केले आहे. पण अतिशय थोडक्यात, शब्द वाया न घालवता, शब्दांवर भावनांचा आवश्यक तेवढाच भार देऊन ही कथा लेखिकेने लिहिली आहे. अतिशय समर्थ कथा म्हणून 'बहिरी शाळुंका' वाचकांच्या लक्षात निश्चितच राहील. 'वटवाघूळ', 'पन्नासावा वाढदिवस', 'आय हेट माय मदर' कथांनाही दाद देऊन प्रस्तावनेचा शेवट करताना पुरोहितसरांनी मला बजावले होते, ''झाले गेले विसरून म्हणजे, आतापर्यंत आपण केवळ एकच कथासंग्रह सादर केलात, आपण लिहिलेल्या आणि आपल्या आत दडून असलेल्या कथांची पुरेशी वज केली नाहीत, हे विसरा. ज्यांनी अधिक लिहावे, अधिक कथासंग्रह सादर करावेत, असे आजमितीला मला ज्यांच्याबद्दल वाटतं, अशा मोजक्या आठ-दहा लेखक-लेखिकांत मी उपाध्यांची निश्चित गणना करीन. म्हणूनच मी या संग्रहाच्या निमित्ताने समाधान आणि असमाधानही व्यक्त करीत आहे.''

दि. २२/०९/२००७

पुरोहितसर, बातमीदारानंतर इतिहासलेखनात अडकले. पण तुमच्या या शताब्दीवर्षात मी नवा कथासंग्रह काढून तुमच्या या आदेशाचे निश्चित पालन करेन! वचन देते – आय मिस यू!

**– नीला वसंत उपाध्ये**

भ्रमणध्वनी : ७०२१३४६०३३


# ‘शतकांत एकच... सचिन’ आणि ‘Scintillating Sachin’ या पुस्तकांचे प्रकाशन भरघोस प्रतिसादात संपन्न

क्रिकेटमधील शतकांचं शतक पूर्ण करणारा, क्रिकेटजगतावर आपली अमीट छाप सोडलेल्या सचिन तेंडुलकर यांच्या नुकत्याच झालेल्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, २ जून २०२३ रोजी षण्मुखानंद सभागृह, मुंबई येथे 'क्रिकेटच्या गोडन बॉयच्या सोनेरी कारकिर्दीचा उत्सव' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ग्रंथाली प्रकाशित व द्वारकानाथ संझगिरी लिखित ‘शतकांत एकच... सचिन’ आणि त्याचे सतीश मुटाटकर यांनी केलेले इंग्रजी रूपांतर 'Scintillating Sachin' या पुस्तकांचे प्रकाशन अजित तेंडुलकर यांच्या हस्ते व सचिन तेंडुलकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सुदेश हिंगलासपूरकर यांनी ‘ग्रंथाली’चे कार्य, तेंडुलकर कुटुंबीयांशी ‘ग्रंथाली’च्या आरंभापासून असलेला ऋणानुबंध या विषयी सांगताना या दोन पुस्तकांच्या प्रकाशनामागची भूमिका मांडली. प्रकाशन झाल्यावर ‘ग्रंथाली’तर्फे खास बनवून घेतलेले स्मृतिचिन्ह आठवण म्हणून सचिन व अजित तेंडुलकर, लेखक द्वारकानाथ संझगिरी, या पुस्तकाचे रूपांतरकार सतीश मुटाटकर, ज्यांच्या पुढाकारातून ही पुस्तकं निर्माण झाली त्या श्रीहर्ष फेणे, शशिकांत शानभाग यांना, मुखपृष्ठ–मांडणीकार अतुल जोशी व मुद्रक आनंद लिमये यांना प्रदान करण्यात आले.

यानंतर रंगली द्वारकानाथ संझगिरी यांनी घेतलेली सचिन यांची मुलाखत. ‘नितीननं मला व अजितला एअरपोर्टजवळ बोलावलं तेव्हा पहिल्यांदा मी फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये गेलो; बहीण काश्मीरला गेली होती तेव्हा तिनं मला बॅट आणली होती. ती अजूनही माझ्याजवळ आहे; अजितनं नेहमीच मागे राहून मला पुढे केलं; आजही आपण पाहात आहात' अशा कौटुंबिक आठवणी सांगतानाच ‘मला १२५ कोटी भारतीयांच्या अपेक्षांचं कधी ओझं वाटलं नाही; मला आव्हानात्मक स्थितीत खेळायला आवडतं; लोकांच्या अपेक्षा डोक्यावर घेतल्या तर तुम्ही ढासळून जाता; मात्र त्या सोबत आहेत असं ठरवलं की बळ वाढतं', असं उत्तर देऊन दडपणाबद्दल आपला सकारात्मक दृष्टिकोन दाखवून दिला. पत्नी अंजलीची साथ किती महत्त्वाची आहे; अर्जुन खेळताना पाहणं एक पिता म्हणून भावनिक कसं वाटतं; माझा मुलगा हेही एक दडपण त्यानं न घेता आपल्यातील पूर्ण क्षमतेनं खेळावं, अशी विविधांगी प्रश्नांना दिलेली उत्तरं रसिकांचं मन जिंकून गेली.

या सोहळ्यात प्रकाशनापूर्वी सुप्रसिद्ध क्रिकेट समालोचक हर्ष भोगले यांनी दिलीप वेंगसरकर, किरण मोरे, प्रवीण अमरे, झहीर खान या दिग्गजांची मुलाखत घेतली. वेंगसरकर यांनी सचिनच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाआधीच्या काळातील आठवणींना उजाळा दिला. दुसऱ्यांचे कौतुक करण्याच्या बाबतीत खडूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूंनी सचिनच्या फलंदाजीला मैदानातच दाद दिल्याचा किस्सा किरण मोरे यांनी सांगितला. वडील रमेश तेंडुलकर यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी कॉलेजचा विद्यार्थी नसतानाही सचिनने कीर्ती महाविद्यालयाच्या संघाकडून खेळून ट्रॉफी जिंकून दिली होती हा प्रसंग प्रवीण अमरे यांनी सांगितला. सचिन आपल्या साधेपणा व सहज संवादातून नवोदित खेळाडूंनाही दडपणमुक्त करतो हा स्वानुभव झहीरखान यांनी सांगितला.




यानंतर भारताचे सलामीचे सुप्रसिद्ध फलंदाज अंशुमन गायकवाड यांची मुलाखत ज्येष्ठ क्रीडा पत्रकार विजय लोकपल्ली यांनी घेतली. सचिन व आपल्यामध्ये कर्णधार आणि संघव्यवस्थापक म्हणून विश्वासाचे नाते निर्माण झाल्याचे गायकवाड यांनी सांगितले, तसेच सचिनच्या सर्वोत्तम तीन शतकी खेळ्यांच्या आठवणी सांगितल्या. त्यांच्या हृद्य वक्तव्याने रसिकांना मुग्ध केले.

लोकप्रिय क्रिकेट नकलाकार विक्रम साठ्ये यांनी टोनी ग्रेग, रवी शास्त्री, वीरेंद्र सेहवाग तसेच सचिनच्या हुबेहूब आवाजात संवाद सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. त्यांनी सुप्रसिद्ध मराठी नाट्यअभिनेते प्रशांत दामले, लोकप्रिय गायक शान, सचिनच्या विविध दुखापतींच्या काळात त्यावर उपचार करणारे डॉ. अनंत जोशी व क्रीडाप्रशासक रत्नाकर शेट्टी यांनी सचिनशी ऋणानुबंधाबाबत विचारले.

हृषीकेश जोशी यांनी लिहिलेले संपूर्ण कार्यक्रमाचे ओघवते व रंगतदार निवेदन करणाऱ्या सुप्रसिद्ध अभिनेते सुमित राघवन यांनी अजित यांचे पुस्तकांविषयी मनोगत वाचून दाखवले.

●

# ग्लोकल स्त्री–साहित्य



संजीवनी खेर

# सलमाचे जग

**सलमाने** ग्रामपंचायतीत उत्तम कामगिरी केल्याने तिला द्रमुकने आपल्या पक्षात बोलावले. करुणानिधी यांनी महिलांना ५० टक्के आरक्षण दिले होते. ते स्वत: उत्तम कवी होते. तामिळनाडूमध्ये ज्या ललितासारख्या स्त्री नेत्यांची परंपरा होती. तरीही स्त्रीच्या आकाक्षांना वेसण घालायचे काम राजकारण करत होतेच. त्यामुळे पचायतीत उत्तम काम केल्यावरही त्यांचा कार्यकाळ संपला की पुन्हा घरीच जावे लागत होते. ह्यात पुरुषांना मोठेपणा वाटत असे. सलमा पुढे ती विधानसभेला उभी राहिली, पण तिच्याच लोकांनी तिचे पंख कापायचे काम केले. अवघ्या हजार मतांनी ती हरली. तेव्हा तिच्या लेखनात ती अश्लील लिहिते या गोष्टीचा संदर्भ सोडून वापर केला गेला. त्यानंतरच्या काळात तिने स्वतंत्र संस्था काढून बायकांना जागे करायचे आणि त्यांनी घराच्या कोंडवाड्यातून बाहेर येऊन काम करावे याकरता प्रयत्न केले. तिला तिच्या लेखनासाठी २००४चा कथा पुरस्कार, अमुदन आदिगाल आणि देवमकल ट्रस्ट पुरस्कार मिळाले आहेत. ती धर्माच्या नावे स्त्रीला मिळणारी दुय्यम वागणूक यावर साऱ्या विरोधाला न जुमानता लिहीत असते. तिच्या धैर्याला सलाम.



सलमा ऊर्फ रुकय्या

तमिळ भाषेत लिहिणारी सलमा ही लेखिका फारशी आपल्याला माहीत नाही. परंतु तिचे लेखन देशविदेशात खूप नावाजले जात आहे. तिचे मराठीत अनुवादित झालेले पुस्तक आपल्याला वानगी दाखल पुरेसे आहे. अर्थात ५५९ पानाची ‘मध्यरात्रीनंतरचे तास’ ही कादंबरी वाचून बाजूला ठेवता येणारी नाही. मुस्लीम स्त्रीच्या जीवनातील अनेक ताणेबाणे त्यात कौशल्याने विणलेले आहेत.

सलमा नावाने लिहिणारी रुकय्या ही तिरुचेनापल्ली जिल्ह्यातील एका छोट्याशा खेड्यातील– तिरुवन कुरी येथील– स्त्री. घरात कट्टर मुस्लीम वातावरण. स्त्रीचे जग हे उंबऱ्याच्या आतच होते. शाळेत तोवरच जायचे जोवर तिला पाळी येत नाही. मुलीबाळींनी सिनेमा थिएटरमध्ये जायचे नाही. मग घरी पोर्नो फिल्म आणून पाहिल्या जायच्या. एकदा ती आणि मैत्रिणी मिळून गुपचूप सिनेमाला गेल्या. त्या चार जणी सोडता तिथं कुणी स्त्रिया नव्हत्या. कुठला सिनेमा आहे हेही पाहिले नव्हते तो प्रौढांसाठी असलेला मल्याळम सिनेमा होता. दारे बंद झाल्याने बाहेरही पडता येत नव्हते. त्यांनी तोंडावर ओढण्या बांधल्या होत्या तरी सिनेमाला जाताना भावाने त्यांना पाहिले होते. त्याने घरी सगळे सांगितले! घरी चांगली पिटाई झाली आणि शाळा नि घराबाहेर पडणे बंद झाले. तिची शाळा बंद झाली पण सिनेमा पाहणाऱ्या भावाची सुरूच राहिली. त्यानंतर लग्न होईपर्यंत नऊ वर्षे तिने घराबाहेर पाऊल टाकले नाही. घरातल्या अगदी जवळच्या नात्यातल्या पुरुषांखेरीज कुणालाही भेटायची तिला परवानगी नव्हती. ज्या वयात मोकळेपणाने हिंडायचे, फिरायचे, जीवनाचा आनंद मनमुराद घ्यायचा त्या

काळात तिला एकाकीपणे वेळ घालवावा लागला. तिची ही वैयक्तिक व्यथा कवितेतून व्यक्त होऊ लागली. कुणी थांबवू नये म्हणून अंघोळीला गेली की कागदाच्या किंवा वेष्टनाच्या कागदावर लिहायची. तिची पहिली कविता वयाच्या तेराव्या वर्षी लिहिली होती. दडपणामुळे तिच्या भावना अधिक तीव्रपणे काव्यातून लिहिल्या जाऊ लागल्या. त्यांच्या लहानशा खेड्यात मुलींवरील बंधने फार कडक होती. तिच्या कवितांना बाहेरचे जग चोरी छुपेच मिळत होते. म्हणूनच तिने टोपणनाव घेतले. तरी ती म्हणते ह्यातील सर्वच भावना ह्या फक्त माझ्याच नाहीत तर उंबऱ्याच्या आतच जगणाऱ्या आणि मरणाऱ्या स्त्रियांच्या आहेत. म्हणूनच त्या इतरांना भिडतात.

अशा चौकटीत वाढलेल्या सलमाने साहित्य, समाजकारण-राजकारण करावे, त्यात नाव कमवावे, घरातल्यांना अभिमान वाटावा असा मान मिळवावा हे सारे आश्चर्यचकित व्हावे असेच आहे. तिच्या साहित्यावर २००७ साली शिकागोच्या विश्वविद्यालयात खास चर्चेचे आयोजन झाले होते. आशियायी साहित्यासाठी असलेल डीएम सी प्राइज, क्रॉसवर्ड पारितोषिक मिळाले. तिच्या जीवनावर 'सलमा' हा माहितीपट झाला. ह्या माहितीपटाला तीन आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेत. २००९ लंडन पुस्तकमेळ्यात ती तमिळ साहित्याची एकमेव खास अतिथी होती. 'ॲन इव्हिनिंग अँड अनादर इव्हिनिंग', काव्यसंग्रह, 'सापम (कर्स)' कथासंग्रह, 'द अवर पास्ट मिडनाइट' ही कादंबरी अनेक देशी आणि विदेशी भाषांत अनुवादित झाली आहे.

ती इंग्रजी वाचकांना कवियत्री म्हणून माहीत आहे. तरी तिचे गद्यलेखनही खूप लोकप्रिय आहे. तिच्या लेखनाने तिला आणि तिच्या घरच्यांना खूप सोसावे लागले आहे. लोकांना तिच्या लेखनाची भाषा अश्लील वाटते, यासाठी तिला बऱ्याच धमक्या आल्या होत्या. घरच्यांनी तिच्यावर बंधने आणली. पण ती समाजकारण करू लागली आणि गावाची सरपंच झाली आणि सरकारदरबारी तिला कवियत्री म्हणून मान मिळू लागला, तिची वाहवा होऊ लागली. तिचे लेख प्रसिद्ध मासिकात येऊ लागले. 'मिल्क ऑफ डिझायर' प्रसिद्ध झाली. लोकांना ह्या तमिळ लेखिकेच्या सामर्थ्याचा अंदाज येऊ लागला. तिच्या काही कवितांतील बोल्ड शब्दांनी लोक खवळले. धमक्या येऊ लागल्या. घरचे लोक, जवळचे नातेवाईक अस्वस्थ झाले. पण साहित्यिक वर्तुळात तिची होणारी प्रतिष्ठा पाहून हा विरोध मावळत गेला. आरंभीच्या कवितासंग्रहात तिचे प्रकाशचित्र तिने दिले नाही आणि समारंभाला हजरही राहिली नव्हती.

मुस्लीम स्त्रीने घरातच राहावे, आपल्या शरीराचा कुठलाही भाग इतरांना दिसू नये असा पोशाख करावा अशी अपेक्षा असते. लग्नातही तिने आपण स्वत:च्या नावाने लिहिणार नाही असे घरच्यांना कबूल केले होते. त्यांचे मत बदलेल असे वाटत होते, पण ती टोपणनावानेच लिहीत राहिली. तिच्या आणि इतर काही तमिळ लेखिकांवर त्या अश्लील लिहितात असा सनसनाटी आरोप काही फिल्मी गीतकारांनी केला होता. त्यामुळे सलमाचा पती खूप नाराज झाला होता. काही लोकांनी लेखिका लैंगिक भाषा वापरते म्हणून हल्लाबोल केला होता. पण त्यामागील उद्देश त्या फिल्मी गीतकाराचा स्वार्थ होता हे समजल्यावर मग सगळे शांत झाले. तिने योनी आणि लिंग असे शब्द वापरले होते पण ते शब्द कसे काय अश्लील ठरतात. घरीदारी स्त्रियांवर अत्याचार होतात तेव्हा ते लोकांसमोर आणायचे तर ह्या शब्दांना पर्याय काय असणार होता?

तिच्या लेखनात समाजपुरुषावर ती राग व्यक्त करताना दिसते. हा राग विशिष्ट समाजावर नसतो तर एकप्रकारे वैश्विक असतो. कारण सर्वत्र तिला दुय्यम स्थान मिळत असते. स्त्रीचे जग समाजानेच उंबऱ्याच्या आत मर्यादित केलेले असते. तिला जे सोसावे लागते ते प्रातिनिधिक रूपात सलमाच्या लेखनातून व्यक्त होते. तिच्या लेखनाबरोबरच तिला नावाजले जाते ते तिच्या समाजकारण नि राजकारणाने. घरातून बाहेर न पडू शकणारी सलमा ऊर्फ रुकय्या समाजात मोकळेपणाने कशी काय वावरू लागली, लोकांची कामे कशी करू लागली ह्यामागचे श्रेय बदललेल्या राजकीय निर्णयाला आहे. गावातून राखीव जागेवर तिने उभे राहावे असे तिच्या नवऱ्याला तीव्रतेने वाटले. म्हणून तिला समाजकारणात भाग घेता आला. तिथे तिने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली. लोकांचे, वस्तीचे पाण्याचे प्रश्न तिने मार्गी लावले. रस्त्यावर दिव्यांची सोय करण्यासारखी अनेक कामे तिने इतरांच्या सहकार्याने पुरी केली. सरपंच म्हणून तिची कारकीर्द गाजली. त्यातून मोठ्या कामासाठी काम करायचे तर पक्षीय राजकारण हे स्त्रीला वाव देत नाही हेही जाणवले. घरच्या लोकांनी आपुलकीने तिच्या मुलांकडे लक्ष दिले. तिला मोकळीक मिळाली. पण लेखन, समाजासाठी काम तसेच घराकडे लक्ष देत साहित्यनिर्मिती करणं ही तारेवरची कसरत. इतर कामकाजी महिलांसारखी ती आनंदाने ते सारे करत आहे. स्त्रियांच्या आकांक्षांना ही तडजोड साधावीच लागते. घरात पुरुष मदत करत नाहीत, पण स्त्रीने ही दुहेरी जबाबदारी निभवावी ही मेख आहे.

तिच्या 'वूमन ड्रीमिंग' ह्या पुस्तकाचे प्रकाशन रँडम हाऊसने केले आहे. पण तोवर आलेल्या कटू अनुभवाने त्या कादंबरीत स्वत: लेखिकेने अनेक बदल केले. त्यातील शारीर सुखाची वर्णने, स्त्रिया त्याविषयी खाजगीत जे काही बोलतात त्यालाही तिने कात्री लावली. तिला वाटले की चांगल्या घरातल्या स्त्रिया असे बोलणार नाहीत असे वाचकाला वाटते, त्यामुळे लोक त्यावर चिडतील. तिच्या वर्णनशैलीत स्त्रीच्या मनात, देहात जे घडते त्याचे नेमके चित्रण असते. तिने स्त्रीच्या देहातील स्पंधनांबद्दल लिहिले तर ती अयोग्य ठरते.

देहव्यापारात जे घडते त्याचे चित्रण लेखिकेला जे जाणवले ते तिने निडरपणे केले. तिची इच्छा, वासना, त्यांची पूर्ती वा दमन, तिची मन:स्थिती, तगमग, उल्हास, आनंद ह्याला वाट मिळते की नाही, याविषयीचे ते लिहिणे असते. केवळ पुरुषांच्या सोयीसुखाचाच विचार प्रत्यक्षात नि साहित्यात होत असतो हे कळीचे मुद्दे ती धाडसाने मांडते.

तिच्या लेखनाचा भौगोलिक परिसर एकसारखाच आहे. तिचे तेच छोटेसे गाव, लांब पसरलेले रस्ते, घरातून येणारे स्त्रिया आणि मुलींचे दबलेले आवाज. सणासमारंभाची वर्णनं, तेच आयुष्य वर्षानुवर्षे चाललेले एकापरीने कंटाळवाणे. पण नव्याने जन्माला येणारे जीव, त्यातूनही मुलींचे लहान होत जाणारे जग आणि बाहेरील अफाट जग, तिथे होणाऱ्या गोष्टी यांच्याशी तिची गाठभेट नसणे, आधुनिक सोयी घरात आल्या तरी त्या वापरताना स्त्रीवर आलेले नवे निर्बंध... हे वाचले तरी नवल वाटते. कसेसेच होते. घरात नवा कमोड बसतो. सगळ्यांची सोय होते. घरात माणसे बरीच. पुरुषांना त्यातही अगोदर वापराचा अधिकार. मुलींना बजावले जायचे की आतल्या न्हाणी घरातून काही आवाज बाहेर येता कामा नये. हे कसे जमावायचे? पुरुषांच्या तेथील क्रियेचा आवाज आला तर चालतो. मग तिने आपले स्वच्छतेचे काम सुरू असताना मोरीतला नळ सोडून ठेवायचा म्हणजे मग बाहेर जाईल तो आवाज नळाच्या पाण्याचा असेल. किती हास्यास्पद बाब होती, पण होती खरी दडपणाची.

तिच्या 'मध्यरात्रीनंतरचे तास' ह्या बृहद्कादंबरीत अनोखे जग वाचकासमोर येते. भिन्न भिन्न वयाच्या, स्वभावाच्या मुली आणि स्त्रिया यांचे जीवन आपल्यासमोर उभे राहते. स्त्रीला शरीर असते तसेच मनही असते. ह्यात अचपळ, उन्मादी तारुण्याने जो कल्लोळ माजवलेला असतो; तो म्हटला तर व्यक्ती विशिष्ट असतो त्याच वेळी सार्वत्रिक असतो. वाचताना आपण अस्वस्थ होतो. कादंबरीचा अनुवाद सोनाली नवांगुळ यांनी केलाय. उत्कृष्ट अनुवादासाठीचा साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. मनोविकास प्रकाशनाने तो प्रकाशित केला आहे.

ह्या कादंबरीतील विश्व हे बायकांचे आहे. नात्यांचा घोळ नसला तरी प्रेम द्वेष, ओढ, पराभव, निराशा यांचे वादळी वर्णने आहेत. मुस्लीम समाजातील अनेक स्त्रीकेंद्री सण, त्यांच्या रूढीउत्सवाचे आनंददायी चित्र लेखिका रेखते. राबियाभोवती प्रामुख्याने कथा फिरते. तिचे वयात येणे, तिच्या भावभावना शाळा नि मैत्रिणी, घरातील संस्कारी वातावरण असाच असतो. आईचा धाक, आपण मुलीला नीट वाढवले नाही असा दोष लागू नये यासाठी चाललेला खटाटोप कुठल्याही भारतीय घरात असावा तसाच आहे. राबिया, अमिना, मदिना, नफिसा, फिरदौस, मैमुन, जोहरा अशी नात्यागोत्याचा स्त्रियांची मांदियाळी आहे. प्रत्येकीचा स्वभाव, कसं दिसावं त्याबद्दलचे ग्रह, एकमेकींवर कुरघोडी करायचे प्रयत्न, खाण्यापिण्याच्या आवडी-निवडी ह्यांचे कमीत कमी शब्दांत वर्णन करणे ही लेखिकेची चतुराई. त्यात पुरुष पात्रे येतात ती आपले मोठेपण, कमाई, अफेअर, क्वचित प्रेमळपणा दाखवण्याच्या मिषाने. स्त्रियांची व्रतवैकल्ये, नवस करणे, पूर्ततेसाठी दर्ग्यावर जाणे. उपरवाल्याने आपले ऐकले नाही म्हणून त्याचा राग करणे हे सारे इतर समाजात म्हणजे आपल्याकडे असते असेच आहे. वाचून वाटते हे आपल्या भोवती राहाणाऱ्यांचे जीवन माहीत नसते हेच खरं.

सगळीकडे हिंदूंतील सामान्य स्त्रीचे जीवन घरातल्या मोठ्यांचा धाक, नातेवाईक काय म्हणतील, समाज काय म्हणेल, विशिष्ट जाती, पोटजाती, प्रदेश इथल्या चालीरीती यांचा जाच सोसण्यातच जाते. या कादंबरीचा परिसर मुस्लीम कुटुंब आहे. मुली त्यांच्यावरील दडपणाला कशा तोंड देतात, नापसंत जोडीदार; त्यातून झालेला त्रास हे आपलेच कर्म म्हणून सहन करणे; लग्न, घटस्फोट, पुनर्विवाह, परदेशी गेलेल्या पतीना पत्रं, भेटवस्तू पाठवणे, सिंगापूर, श्रीलंका अशा ठिकाणी कामानिमित जाणे, तिकडे दुसऱ्या स्त्रीशी निकाह करणे, इकडे मुलबाळे, घरातील वयस्क यांची काळजी स्त्रियांनाच घ्यावी लागणं. स्त्रीच्या अपूर्ण लैंगिक इच्छा त्या आपापसात व्यक्त करतात त्याचे चित्रण महत्त्वाचे आहे. ह्या अत्यंत खाजगी गोष्टींचे चित्रण लेखिका प्रभावीपणे करते. मुलींची छोटी स्वप्नेदेखील पुरी न होणं, त्यासाठी मुलींच झुरणे, मनाला कातर करते. सायकल शिकावी, दूरच्या टेकडीवर जावे एखाद्या आवडलेल्या मुलाशी हितगुज करावे अशी साधी-निरागस स्वप्ने दूरस्थ वाटू लागतात.

न आवडलेल्या पतीशी विभक्त होऊन माहेरी आलेली सुंदर फिरदौस असो वा नको असलेल्या मुलाचा गर्भपात करताना भयंकर त्रासातून जावे लागलेली मैमुन असो, परिस्थितीशी दोन हात करत सुख शोधणाऱ्या स्त्रियांचे जीवन, त्यातील आनंद सापडलेल्या दयेचा विषय बनत नाहीत. परस्परांना आधार देत असलेल्या या कितीतरी स्त्रिया ह्या कादंबरीत आपल्याला भेटतात. स्त्रीवादाचा झेंडा हातात न घेता लेखिका प्रश्न मांडतेय. वास्तविक उत्तरं ही समोर आहेत पण त्यापर्यंत पोहोचण्याचं धैर्य कमीच स्त्रिया एकवटू शकतात. या स्त्रिया करवादताना दिसत नाहीत. काळे-पांढरे रंग ठळक असून त्यातील करड्या रंगाची रेखाटनेही मनाला भिडतात. मला त्यातील सणरीतीमधील गोडवा खूप भावला, त्यात नापसंत असलेल्या नात्यांनाही निभावण्याची वृत्ती जीवनाला कधी परीस्थिती, कधी आपलीच दुर्बलता आड येते. ह्यातूनच लेखिका एका वेगळीच भूमी आपल्या निवेदनाकरता तयार करते. त्यामुळेच ही रडकथा न बनता दृढकथा बनते. जरूर वाचावी, समजून घ्यावी अशी ही कादंबरी आहे.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com



विनता कुलकर्णी

# कर्करोगावरील उपचारांमागच्या दोन आद्य संशोधक महिला

**एकीकडे** सर्व क्षेत्रांत माणूस नवनवे प्रगतिशील संशोधन करत आहे. मानवाची आयुर्मर्यादा वाढते आहे. तर दुसरीकडे जागतिक आरोग्यसंस्थेच्या २०२०च्या अहवालानुसार कर्करोगामुळे जगात सुमारे एक कोटी मृत्यू- (सर्वसाधारण रुग्णांच्या सहा मृत्यूंपैकी एक) कर्करोगामुळे आहे. अमेरिकेच्या बाबतीतही वेगळी परिस्थिती नाही. कर्करोग हे अमेरिकेतही मृत्यूचे दुसरे सर्वाधिक सर्वसामान्य रोगकारण आहे. (संदर्भ- अमेरिकन कॅन्सर सोसायटी- Cancer Journal for Clinicians Volume 73, Issue 1 p. 17- 48 - Cancer Statistics, 2023) अमेरिकेत दरवर्षी जून महिना हा कॅन्सर सर्व्हायव्हर (यंदा सुमारे १७ कोटी अमेरिकन लोकांच्या) सन्मानार्थ साजरा केला जातो. यामध्ये समाविष्ट काही रुग्ण अजूनही कर्करोगावर उपचार घेत असतात, किंवा काहींनी सध्या तरी या रोगाविरुद्धची लढाई जिंकलेली असते.

'जिवासवे जन्मे मृत्यू' हे सत्य असले, तरी कर्करोगाशी प्रत्यक्ष लढा न दिलेल्या काहींचे विविध टोकाचे गैरसमजही असतात. एक म्हणजे, कर्करोग झाला म्हणाजे माणूस लगेच मृत्युपंथाला लागला, आणि दुसरा गैरसमज एकदा उपचार घेऊन झाले, की कर्करोगाशी संबंधित अडचणी थांबल्या. सत्य हे आहे, की अनेक प्रकारचे कर्करोग असल्याने २१व्या शतकात काही उपचाराने आटोक्यात येण्यासारखे आहेत, तर काही मुळातच किंवा नंतर अधिक आक्रमक असल्याने, याबाबतीत तरी 'सब खेकडे (कर्क) बारा टक्के' नसून 'कोणी ढिले, कोणी पक्के' असतात... विविध कर्करोगांतून सध्या बरे होऊन जगणाऱ्यांपैकी कित्येकांना पुढील वाटचालीत नवीन संघर्षास, शारीरिक, भावनिक किंवा आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागते. बऱ्याचदा केवळ हिमखंडाचे टोक गाठले, तरी रोग पुन्हा उसळी मारू नये म्हणून डॉक्टरांना पुढेही, सातत्याने, ठरावीक कालावधीने रुग्णाच्या तपासण्या-चाचण्या कराव्या लागतात. वर्तमान-स्थितीत, कर्करोगातून वाचलेल्या काहींचे मानवी शरीर थकलेले आणि मन भविष्याच्या काळजीने सक्षम नसते. त्यातूनही मानसिक आरोग्य-समस्या उद्‌भवू शकतात. त्यासाठी मग वेगळे उपचार! अमेरिकेत जूनमधे कॅन्सर सर्व्हायव्हर महिना- म्हणजे, या रोगाच्या विविध टप्प्यावर आलेली आव्हाने जाणून घेऊन, त्या आव्हानांना धीराने दिलेला किंवा अजूनही देत असलेला लढा गौरवण्यासाठी, कॅन्सरग्रस्तांना जमेल ती मदत करावी आणि कर्करोगाविषयी जनजागृती व्हावी, हादेखीलही या प्रथेमागचा एक उद्देश!

रोगप्रतिबंधक दैनंदिन जीवनशैली, कर्करोग तपासणी, मार्गदर्शक तत्त्वांचे पालन, योग्य उपचार या सर्वात प्रगती होऊन कॅन्सर सर्व्हायव्हर लोकांचे प्रमाण दरवर्षी वाढते आहे. आता, अनेक प्रकारचे कर्करोग अत्यंत प्रभावी उपचार करण्यायोग्य मानले जातात. यशाचा हा आलेख असाच उंचावर जात आहे आणि जात राहावा. अमेरिकन कॅन्सर सोसायटीच्या जानेवारी २०२३ अहवालानुसार गेल्या तीन दशकांत अमेरिकेत कर्करोगाच्या मृत्यूचे प्रमाण कमी होत असून सध्या पूर्वीपेक्षा ते ३३ टक्क्यांनी कमी झाले आहे. कर्करोगावर मानक उपचारांनी, यशस्वी सामना केलेल्यांच्या यशोगाथा अमेरिकेने साजऱ्या केल्या आहेत. अशा रुग्णांसाठी, Share and Care, Increasing Cancer Survivorship Together, या उद्देशाने संकेतस्थळही आहे- www.facesandvoicesofcancer.org. अर्थात या यशोगाथा ठरण्यामागे भरीव कामगिरी आहे ती डॉक्टर आणि संशोधकांची. त्यातील दोन आद्य संशोधक महिला डॉक्टरांबद्दल-



**अमेरिकन शास्त्रज्ञ डॉ. गर्ट्रूड बेल एलियन** (१९१८-९९)
जीवरसायनशास्त्रज्ञ आणि औषधशास्त्रज्ञ
(बायोकेमिस्ट आणि फार्माकॉलॉजिस्ट)

गर्ट्रूड बेल एलियन ही मूळची न्यू यॉर्कची रहिवासी. मात्र तिचे आजीआजोबा प्रथम अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिचे वडील दंतवैद्य आणि आई गृहिणी. लहानपणापासूनच तिला अभ्यासाची अतिशय आवड होती. मात्र तिच्या आजोबांचा कर्करोगाने मृत्यू झाल्याने एलियन व्यथित झाली. मग तिने अगोदर रसायनशास्त्र, औषधशास्त्रात शिक्षण घेण्याचे ठरवले. न्यू यॉर्क शहरातील हंटर कॉलेजमधून तिने वयाच्या १९ व्या वर्षी रसायनशास्त्रात पदवी प्राप्त केली. मात्र पदवीनंतर तिला नोकरी शोधण्यात अतिशय अडचण आली, कारण अनेक प्रयोगशाळा महिला केमिस्ट नियुक्तीस नकार देत. मग तिने अर्धवेळ लॅब असिस्टंटची नोकरी व काही वर्षे पर्यायी माध्यमिक शिक्षिका म्हणून काम केले. एकीकडे न्यू यॉर्क विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी शिक्षण पूर्ण केले. तिने रीतसर शिकून डॉक्टरेट पदवी मिळवली नसली तरी पुढच्या आयुष्यात तिच्या शास्त्रीय कामाचा बोलबाला झाल्यावर तिला न्यू यॉर्कच्या पॉलिटेक्निक विद्यापीठातून मानद पीएच.डी. आणि हार्वर्ड विद्यापीठातूनही मानद डॉक्टर ऑफ सायन्स पदवीने गौरवण्यात आले.

एलियनने पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केल्यावर काही काळाने जागतिक दुसऱ्या महायुद्धाने निर्माण झालेल्या रिकाम्या जागांवर सर्व कार्यालयांत, प्रयोगशाळांतही महिलांची भरती होऊ लागली. १९४४ मध्ये (Burroughs-WellCome-Fund आता Glaxo Smith Kline) येथे एलियनला काम मिळाले. आणि तेथेच तिची वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जॉर्ज एच. हिचिंग्ज यांच्याशी ओळख झाली. एलियनच्या ज्ञानपिपासेने आणि अभ्यासू वृत्तीने ते प्रभावित झाले आणि त्यांनी तिला प्रयोगशाळेच्या कामात अधिक जबाबदारी घेण्यास सुचवले. त्यांच्यासोबत तिने पुढे संशोधनकार्यात ४० वर्षांची भागीदारी केली. एलियनने महत्त्वपूर्ण संशोधनासाठी आपली पुढची बहुतेक कारकीर्द प्रयोगशाळांमध्ये घालवली. १९५०च्या दशकादरम्यान, जॉर्ज हिचिंग्ज या शास्त्रज्ञाबरोबर एलियनने बायोकेमिस्ट्री (जीवरसायनशास्त्र) आणि रोगविषयक ज्ञानावर आधारित औषधे तयार करण्यासाठी एक वेगळी पद्धत विकसित केली. ज्यामुळे त्या काळात या औषधांनी रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या अनेक बालकांना जगण्यास मदत केली.

शास्त्रज्ञ एलियन यांनी वैद्यकशास्त्रात संशोधनाचे ४५ पेटंट विकसित केले आणि त्यांना विविध विद्यापीठांनी २३ मानद पदव्यांनी गौरवले. १९८३मध्ये गर्ट्रूड एलियन अधिकृतपणे सेवानिवृत्त झाल्या परंतु त्या आपल्या संशोधनकार्यात, जुन्या प्रयोगशाळेत एमिरेटस (सन्मानदर्शक पदवीधारक सेवानिवृत्त) शास्त्रज्ञ आणि सल्लागार म्हणून कार्यरत होत्या. प्रवास, फोटोग्राफी हे छंद, नातेवाईकांकडे येजा या सर्वाचा आनंद घेत असूनही प्रयोगशाळा आणि संशोधन हेच खरे जीवन असे एलियननी एके ठिकाणी म्हटले आहे. याच काळात १९८८मध्ये एलियनने जॉर्ज हिचिंग्ज आणि सर जेम्स ब्लॅक या सहकाऱ्यांसमवेत, औषध विकास प्रक्रियेत केलेल्या प्रगतीसाठी नोबेल पारितोषिक मिळवले. त्यांनी विकसित केलेल्या पद्धतीस तर्कशुद्ध औषध-रचना/(डिझाइन) म्हणून ओळखले जाते. ही नवीन पद्धत फक्त चाचणी-आणि-त्रुटी वापरण्याऐवजी औषधाचे लक्ष्य समजून घेण्यावर लक्ष केंद्रित करते. या पद्धतीचा वापर करून, एलियन आणि तिच्या सहकाऱ्यांनी रक्ताचा कर्करोग, (त्याच बरोबर मलेरिया, एकाच्या शरीरातील दान केलेला -किडनी- अवयव गरजू रुग्णावर प्रत्यारोपणास नाकारण्याच्या समस्येवर लढण्यासाठी वापरले जाणारे पहिले औषध, एचआयव्ही, एड्सवर लवकर उपचार करणारे (अँटी-रेट्रोव्हायरल) औषध, नागीण (Shingles/Herpes Zoster) आणि इतरही रोगांवर प्रभावी औषधांचे संश्लेषण आणि विकास करण्यामध्ये डॉ. एलियन यांचा मोलाचा सहभाग होता. जागतिक आरोग्य संघटना आणि अमेरिकन असोसिएशन फॉर कॅन्सर रिसर्चसाठी सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले. नॅशनल मेडल ऑफ सायन्ससह त्यांना त्यांच्या कामासाठी अनेक पुरस्कार मिळाले. अमेरिकन नॅशनल इन्व्हेंटर्स हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट केलेल्या त्या पहिल्या महिला ठरल्या.

**आफ्रिकन-अमेरिकन डॉ. जेन कुक राइट, एम.डी. (१९१९-२०१३)**

ही आफ्रिकन वंशाची, अमेरिकन डॉक्टर आणि वैद्यक क्षेत्रातील मानांकित संशोधक. लहानपणापासून जेनला अभ्यास, संशोधन याविषयी आवड निर्माण होण्याचे कारण तिचे



वडील. मानवी हक्कांच्या चळवळीत सक्रिय कार्यकर्ते जेनचे वडील शल्यतज्ज्ञ डॉ. लुई थॉम्पसन राइट हे हार्वर्ड मेडिकल स्कूलमधील पहिल्या आफ्रिकन अमेरिकन पदवीधरांपैकी एक. ते न्यू यॉर्क शहरातील नगरपालिकेच्या रुग्णालयात नियुक्त पहिले आफ्रिकन अमेरिकन डॉक्टर व पहिले आफ्रिकन अमेरिकन पोलिस सर्जन होते. त्यांनी न्यू यॉर्क परिसरात हार्लेम हॉस्पिटलमध्ये कर्करोग संशोधन केंद्राची स्थापना केली. ज्या काळात केमोथेरपी ही केवळ प्रायोगिक उपचारपद्धती मानली जात होती, तेव्हा जेन यांचे वडील डॉ. लुई या विषयावर प्रयोगशाळेत संशोधन करत होते आणि त्यांची मुलगी डॉ. जेन रुग्णांवर चाचण्या करत होती. त्यांनी कर्करोगविरोधी एजंट्सच्या विस्तृत श्रेणीचे विश्लेषण करून, रुग्ण आणि 'टिश्यू कल्चर'चा (जिवंत उतींपासून प्राप्त झालेल्या पेशींच्या कृत्रिम माध्यमात वाढ.) प्रतिसाद यांच्यातील संबंध शोधले आणि कर्करोगावर केमोथेरपीसाठी अधिक सुलभ तंत्रपद्धती विकसित केली. १९५२ मध्ये, डॉ. लुई राइट यांच्या मृत्यूनंतर, डॉ. जेन राइट यांची वयाच्या ३३व्या वर्षी हार्लेम न्यू यॉर्कमधील या कर्करोग संशोधन केंद्राच्या प्रमुख पदावर नियुक्ती झाली. १९५५मध्ये डॉ. जेन राइट न्यू यॉर्क युनिव्हर्सिटीमध्ये सर्जिकल संशोधनाचे सहयोगी प्राध्यापक आणि न्यू यॉर्क युनिव्हर्सिटी मेडिकल सेंटर आणि त्याच्याशी संलग्न बेलेव्ह्यू आणि युनिव्हर्सिटी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर केमोथेरपी संशोधनाच्या संचालक पदावर कार्य करू लागल्या. संपूर्ण अमेरिकेत आफ्रिकन अमेरिकन महिला डॉक्टरांची संख्या केवळ शे-दोनशे होती, तेव्हा डॉ. जेन राईट या राष्ट्रीय मान्यताप्राप्त वैद्यकीय संस्थेत सर्वोच्च स्थानावर असलेल्या आफ्रिकन अमेरिकन महिला होत्या. आता आजवर या वाटेने पुढे गेलेल्या अनेक डॉक्टरांच्या संशोधनकार्याने, अमेरिकेत कर्करोगाच्या विविध समस्यांवर सुमारे १०० + प्रकारची केमोथेरपी औषधे आहेत. (संदर्भ - https://medlineplus.gov/ency/patientinstructions/000910 MedlinePlus.gov नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसीन).

आज जगभर विविध कर्करोगांसाठी केमोथेरपी एक प्रमाणित उपचारपद्धती आहे. १९६४मध्ये, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांनी डॉ. जेन यांची हृदयरोग, कर्करोग आणि पक्षाघातासंबंधित उपचार प्रकल्पावरील आयोगावर नियुक्ती केली. जेन राईट अमेरिकन सोसायटी ऑफ क्लिनिकल ऑन्कोलॉजी'च्या संस्थापकांपैकी एक, १९६७ पर्यंत, युनायटेड स्टेट्सच्या वैद्यकीय संस्थेत सर्वोच्च श्रेणीप्राप्त आफ्रिकन अमेरिकन महिला डॉक्टर आणि १९७१ मध्ये, 'न्यू यॉर्क कॅन्सर सोसायटी'च्या पहिल्या महिला अध्यक्षा होत्या. डॉ. जेन राइट १९८७ मध्ये व्यवसायातून निवृत्त झाल्या. त्यांच्या चाळीस वर्षांच्या कारकिर्दीत, त्यांनी कर्करोगावरील उपचारात्मक केमोथेरपीवर अनेक शोधनिबंध प्रकाशित केले आणि आफ्रिका, चीन, पूर्व युरोप आणि सोव्हिएत युनियनमध्ये अमेरिकेच्या वतीने कर्करोग संशोधकांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्वही केले.


**- डॉ. विनता कुलकर्णी** (शिकागो)
vinata@gmail.com




**डॉ. स्मिता दातार** यांना **'फक्त 'ती'च्यासाठी'** या पुस्तकासाठी सन २०२२ या वर्षीचे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे **डॉ. शकुंतला क्षीरसागर पुरस्कृत विलास शंकर रानडे स्मृती** पारितोषिक देण्यात आले. त्यांचे ग्रंथाली परिवारातर्फे अभिनंदन!

अभिनंदन

## 'नदीष्ट'ला राष्ट्रभाषा सन्मान पुरस्काराचे नामांकन




भारतीय भाषांमधील साहित्यकृतीच्या हिंदी अनुवादाला बँक ऑफ बडोदातर्फे 'राष्ट्रभाषा सन्मान पुरस्कार' दिला जातो. २०२३ च्या पुरस्कारासाठी १२ कादंबऱ्यांची नामांकन यादी घोषित झाली. यात मराठीमधील मनोज बोरगावकर यांच्या 'नदीष्ट' या कादंबरीचा समावेश आहे. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ संजीव चड्ढा यांनी ही घोषणा केली. या नामांकनाबद्दल लेखक मनोज बोरगावकर व भाषांतरकार गोरख थोरात यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा.



शरद काळे

# ई कचरास्रोत – पृथ्वीवरील कृष्णविवरे

**कृष्णविवर** किंवा ब्लॅक होलबाबत सर्वसामान्यांना मोठे कुतूहल असते. अनेक प्रचलित दंतकथांमुळे कृष्णविवरे अधिकच रहस्यमय बनली आहेत. कृष्णविवर हा एक खूप जास्त घनतेचा आणि गुरुत्वबल असलेला खगोलीय घटक आहे. त्याची निर्मिती काही विशिष्ट ताऱ्यांच्या अंतिम अवस्थेत होत असते. कृष्णविवराच्या निर्मितीसाठी ताऱ्यांचे वस्तुमान खूप जास्त असावे लागते. असे खूप जास्त वस्तुमानाचे तारे त्यांच्या आयुष्याच्या शेवटी आकुंचन पावत कृष्णविवरात रूपांतरित होतात. अशा कृष्णविवरांजवळचे गुरुत्वाकर्षण इतके जास्त असते की प्रकाशदेखील त्यांना भेदून बाहेर पडू शकत नाही आणि यामुळेच अशा ताऱ्यांना कृष्णविवर असे म्हणतात. आज इलेक्ट्रॉनिक कचरस्रोताची जी निर्मिती आपण पृथ्वीवर करत आहोत, त्याची तुलना या कृष्णविवराशी करावी लागेल!

इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत म्हणजे निरुपयोगी किंवा नादुरुस्त झालेली इलेक्ट्रॉनिक उपकरणे! अर्थात फक्त अशा नादुरुस्त उपकरणांचाच यात समावेश होतो असे नसून इतर अनेक गोष्टींचाही यात समावेश होतो. इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे ह्यात थोडा फरक आहे. इलेक्ट्रॉनिक उपकरणे ही इलेक्ट्रिक असतात, पण सर्व इलेक्ट्रिक उपकरणे इलेक्ट्रॉनिक असतीलच असे नाही. म्हणजे गणिताच्या भाषेत सांगायचे झाले तर इलेक्ट्रिक या शब्दाने वैश्विक (universal set) संच दर्शवला जातो तर इलेक्ट्रॉनिक शब्दाने या वैश्विक संचाचा उपसंच (subset) दर्शवला जातो. मोबाइल किंवा भ्रमणध्वनी हा इलेक्ट्रॉनिक असतो तर विजेचा बल्ब हा इलेक्ट्रिक असतो. इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत या शब्दांतर्गत या दोन्ही प्रकारच्या गोष्टींचा समावेश होतो. हा इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत पर्यावरणासाठी अत्यंत घातक असू शकतो. विशेषतः आपल्या देशात यातील बहुतेक कचरास्रोत हा डम्पिंगक्षेत्रात पाठवला जातो. या क्षेत्रात जसजसे त्याचे ढीग जमा होऊ लागतात, तसतसे त्या ढिगातून स्रवणाऱ्या विविध धातूंचे अंश जमिनीत व पाण्यात मिसळतात. या धातूंच्या प्रदूषणामुळे अनेक सागरी आणि जमिनीवरील परीसंस्थांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे.

इलेक्ट्रॉनिक कचरास्रोतात ज्या गोष्टींचा समावेश होतो, त्यांचे त्यांच्या उद्‌गमानुसार पाच प्रकारे वर्गीकरण करण्यात येऊ शकते.

१. गृह उपकरणे – यात मायक्रोवेव्ह ओव्हन, इलेक्ट्रिक कूकर, हीटर, पंखे, ट्यूब लाईट, विद्युत बल्ब, रेफ्रिजरेटर, वातानुकूल यंत्रे, कूलर, मिक्सर, घरघंटी, धुलाई यंत्रे, हेअर ड्रायर, इलेक्ट्रिक शेवर, डिश वॉशर, पाण्याचे फिल्टर, व्हॅक्युम क्लिनर, फूड प्रोसेसर, वायर, प्लग, स्विच, गिझर, बॅटरी सेल या गोष्टींचा समावेश असू शकतो.

२. गृह मनोरंजन उपकरणे – दूरदर्शन व ट्रान्झिस्टर संच, टेप रेकॉर्डर, व्हिडीओ कॅसेट रेकॉर्डर, व्हिडीओ कॅसेट, ऑडिओ कॅसेट, डीव्हीडी प्लेयर, ग्रामोफोन रेकॉर्ड यांचा समावेश होतो.

३. संदेशवहन आणि माहितीतंत्रज्ञान उपकरणे – यात मोबाइल फोन, संगणक, लॅपटॉप, आय पॅड, टॅब्लेट, हार्ड ड्राइव्ह, पेन ड्राइव्ह, सीडी, फ्लॉपी डिस्क, स्कॅनर, झेरॉक्स यंत्रे, फॅक्स यंत्रे, अनालॉग टेलिफोन यंत्रे, प्रिंटर, मॉडेम इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

४. इलेक्ट्रॉनिक मदतनीस – मसाज खुर्ची, इलेक्ट्रिक हीटिंग पॅड, दूरदर्शन व इतर संयंत्रांचे रिमोट नियंत्रक, टेबल लॅम्प, शोभेचे विद्युत दिवे, विद्युत माळा, स्मार्ट दिवे, ट्रेड मिल, स्मार्ट घड्याळे, व्यायामाची विद्युत साधने, रक्तदाब यंत्रे,

ग्लुकोमीटर इत्यादी.

५. कार्यालयीन आणि वैद्यकीय उपकरणे - झेरॉक्स, प्रिंटर, नेटवर्क सर्व्हर, वायफाय डोंगल, डायलिसिस उपकरण, क्ष-किरण यंत्रे, सी.टी. स्कॅनर, इन्व्हर्टर, जनरेटर, यूपीएस, डीह्युमिडीफायर, ऑटोक्लेव्ह, श्रवणयंत्रे, सूक्ष्मदर्शक, कटिंग आणि वेल्डिंग यंत्रे इत्यादी.

यावरून असे लक्षात येईल की इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक उपकरणांची व्याप्ती आपल्या जीवनात एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाली आहे, की असे एकही क्षेत्र उरले नाही, जिथे यांचा वापर केला जात नाही. खेळाच्या क्षेत्रातदेखील विविध प्रकारची मोजमापे करण्यासाठी विविध इलेक्ट्रॉनिक किंवा अंकीय उपकरणांचा वापर केला जातो. बँकिंग क्षेत्रात एटीएम यंत्रे आणि इलेक्ट्रॉनिक व्हॉल्ट यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, अशी सामग्री निकामी झाल्यावर तिचा कचरा होणारच!

नादुरुस्त झाल्यानंतर जी उपकरणे पुन्हा दुरुस्त होऊ शकत नाहीत, किंवा दुरुस्तीसाठी जो खर्च येतो, तो नव्या उपकरणाच्या किमतीच्या जवळपास असतो, तेव्हा लोकांचा कल नवे उपकरण घेण्याकडे झुकतो, व नादुरुस्त उपकरण कचरा म्हणून टाकले जाते. काही दशकांपूर्वी नगण्य असलेला हा अंकीय कचरा आता मात्र भूमितीच्या श्रेणीने वाढत चाललेला आहे. सन २०१९च्या माहितीनुसार चीनमध्ये एक कोटी मेट्रिक टन एवढ्या इलेक्ट्रॉनिक कचरास्रोताची नोंद झाली होती. जगातील कोणत्याही देशापेक्षा हा सर्वात जास्त इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत चीनमध्ये निर्माण झाला होता. अमेरिकेत त्यावर्षी सुमारे ७० लक्ष टन, भारतात ३२ लक्ष टन, जपानमध्ये २५.६ लक्ष टन, ब्राझीलमध्ये २१.४ लक्ष टन, रशिया, इंडोनेशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी या ५ देशांमध्ये प्रत्येकी १६ लक्ष टन एवढ्या प्रचंड प्रमाणावर हा इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत निर्माण झाला होता. जागतिक स्तरावर पाहिले तर त्या वर्षी ५.४ कोटी मेट्रिक टन एवढा इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत निर्माण झाला होता. जगाची लोकसंख्या ८०० कोटींचा आकडा नुकताच पार करून गेली आहे. दरवर्षी पाच कोटी टन इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत निर्माण होतो, म्हणजे माणशी सहा किलो हा कचरास्रोत दरवर्षी निर्माण होत आहे!

दरवर्षी हे प्रमाण वाढतच चालले आहे. म्हणजे गेल्या दहा वर्षांमध्ये सुमारे ४५-५०कोटी मेट्रिक टन इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत निर्माण झालेला असून येत्या वीस वर्षांमध्ये किमान १०० कोटी मेट्रिक टन इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत निर्माण होणार आहे. हे आकडे अतिशय भयावह आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक कचरास्रोतांचे पुनर्चक्रांकन कसे करायचे? ते झाले नाही तर तो ठेवायचा कुठे आणि त्यासाठी जी नैसर्गिक साधनसंपत्ती वापरली जात



आहे, तिची टंचाई जाणवू लागेल, तो प्रश्न कसा सोडवायचा? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर आ वासून उभे आहेत. हा भस्मासूर मानव जातीच्या मूळावर येऊ शकतो, हे वास्तव आहे. सन २०१९ मध्ये उपलब्ध आकडेवारीनुसार फक्त १७ टक्के इलेक्ट्रॉनिक कचरास्रोताचे पुनर्चक्रांकन होऊ शकलेले आहे. म्हणजे ८० टक्क्यांहून अधिक कचरास्रोताचे ढीग तसेच पडून आहेत, आणि ह्या ढिगांची उंची दरवर्षी वाढतच जाणार आहे!

कोणत्याही इतर कचरास्रोतांपेक्षा इलेक्ट्रॉनिक कचरास्रोतांची वाढ खूपच अधिक आहे. माणसाचे खाणे दरवर्षी सरासरी फारसे बदलत नाही; तसेच, कपडे, पादत्राणे, निवारा यांसारख्या इतर जीवनावश्यक सरासरी गरजाही अव्वाच्या सव्वा वाढत नाहीत. त्यामुळे ओल्या कचरास्रोतांचे प्रमाण फारसे वाढत नाही! पण इलेक्ट्रॉनिक किंवा इलेक्ट्रिक गरजा कमालीच्या वाढत चाललेल्या आहेत. त्यामुळेच ह्या कचरास्रोतांची वाढ जबरदस्त आहे. या गरजा का वाढत आहेत? त्यांची महत्त्वाची कारणे अशी आहेत.

१. माहितीतंत्रज्ञान क्षेत्रात होत असलेल्या जलद प्रगतीमुळे उपकरणे कालबाह्य होण्याचे प्रमाण वाढत आहे. तसेच, त्याच्या वापराचा काळ (लाइफ टाइम) कमी होत चालला आहे. मोबाईल फोनचे उदाहरण घेतले तर भारतात साधारण २००० सालापासून बाजारात आलेल्या या फोनच्या किमान सात ते आठ पिढ्या होऊन गेल्या आहेत! म्हणजे अगदी आठ जरी नाहीत, तरी प्रत्येक माणसाने गेल्या वीस वर्षांत किमान चार तरी मोबाईल फोन विकत घेतले व त्यातील तीन फोन इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या स्वरूपात पडून राहिले आहेत!

२. लोकांची क्रयशक्ती गेल्या दोन दशकांमध्ये किमान चौपट किंवा अधिकच वाढली आहे, त्यामुळे नव्या वस्तू खरेदी करण्याचे प्रमाण बरेच वाढले आहे. उपकरणांचे नवीन व्हर्जन अमेझॉन किंवा फ्लिपकार्ट यासारख्या इलेक्ट्रॉनिक बाजारात अवघ्या काही मिनिटांमध्ये विकले जाते, हे काय दर्शवते?

३. या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची किंवा उपकरणांची दुरुस्ती करणाऱ्या कुशल कामगारांची संख्या तोकडी असून विशेषतः

ग्रामीण भागात यांची उणीव तीव्रतेने भासते. त्यामुळे इच्छा असूनही उपकरण नादुरुस्त अवस्थेत पडून राहते, व शेवटी ते फेकून दिले जाते.

४. देशात आणि जगातही अनेक शहरांमधून ई कचरास्रोत जमा करण्याचे प्रमाण वाढत चालले असले तरी त्यांचे पुनर्चक्रांकन करण्यासाठी ज्या पायाभूत सुविधा हव्या आहेत, त्या खूपच अपुऱ्या आहेत. त्यामुळे टनांनी जमा झालेल्या या ई कचरास्रोतांचे नेमके काय करायचे, हा प्रश्न प्रशासनासमोर उभा राहिलेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणातला हा कचरास्रोत ठेवायचा कुठे, ह्या प्रश्नाला, भारतासारख्या आधीच जागेची टंचाई जाणवत असलेल्या देशात उत्तर नाही. त्यामुळेही नाइलाजाने या कचरास्रोताची अडचण होत आहे.

५. मध्यम, उच्च मध्यम व उच्चवर्गीयांची संख्या वाढत चालली आहे, ही देशातील सुबत्ता वाढण्याची दर्शक आहे. पण ही वाढती सुबत्ता आणि कमीत कमी गरजा असलेली जीवनशैली यांच्यात व्यस्त प्रमाण असल्यामुळे ई कचरास्रोत वाढत चालला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सुशिक्षित लोकच ई कचरास्रोत वाढवण्यात अधिक कारणीभूत आहेत.

६. प्रगत देशांमध्ये निर्माण होत असलेले ई कचरस्रोत ठेवायला जागा नसल्यामुळे अप्रगत देशांमध्ये पाठवण्याचे दुष्टचक्र काही वर्षांपासून सुरू आहे. अशा देशांमध्ये स्वस्त वस्तू किंवा उपकरणे म्हणून हा कचरास्रोत विकला जातो! तिथे त्याला मागणीदेखील भरपूर आहे. प्रगत देशांमधील या ई कचरस्रोतांच्या हाताळणीचे नियम अतिशय खर्चीक आणि कडक असल्यामुळे, अप्रगत देशांमध्ये पाठविण्याचा मार्ग स्वीकारला जात आहे! भारतातदेखील असा कचरास्रोत पाठवला जात असे, पण सरकारी पातळीवर याची दखल घेतली जाऊन, ते प्रमाण कमी होत आहे. मात्र अनेक अप्रगत देशांमध्ये कोणत्याही पायाभूत सुविधा नसतांना असे ई कचरस्रोत फेकले जात असून तेथील आरोग्याच्या समस्यांमध्ये वाढ होत चालली आहे. ही श्रीमंती दादागिरी या गरीब राष्ट्रांसाठी जीवघेणी ठरत आहे. या अप्रगत देशांमध्ये हे सारे थांबवण्याची कायदेशीर बाजू अगदीच लंगडी आहे, व शासनातील भ्रष्टाचार त्यास हातभार लावत आहे.

७. बाजारातही वापरा आणि फेका या पद्धतीनेच नवनवीन उपकरणे येत आहेत. या वाढत्या बाजारपेठेचे रूपांतर या ई कचरास्रोताच्या डम्पिंग भस्मासुरात होत आहे, हे लक्षात आल्यावरदेखील जागतिक पातळीवर यावर कोणतीही उपाययोजना करण्याची मानसिकताच दिसून येत नाही, हे विदारक सत्य आहे. जिथे माणसेच डिस्पोजेबल होत आहेत, त्या यंत्रमानवी संस्कृतीत याहून दुसरे काहीच निष्पन्न होणार नाही. उपकरणांचा लाइफ टाइम कमीत कमी कसा ठेवता येईल, याकडेच सारे संशोधन केंद्रित होत आहे, व त्याला अनुसरूनच व्यापारी प्रणाली विकसित होत आहेत! जगाच्या पाठीवर कोणत्याही देशात याला सरकारी पातळीवर लगाम घालण्याचे प्रयत्न होताना दिसत नाहीत.

८. सामुदायिक स्वरूपात ह्यातील अनेक सुविधा वापरणे शक्य आहे, पण त्यासाठी प्रशासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णयांची आवश्यकता आहे. परंतु मांजराच्या गळ्यात घंटा कुणी बांधायची?

इलेक्ट्रॉनिक कचरास्रोत हे पर्यावरणासाठी अतिशय घातक असतात. विशेषतः आपल्या देशात या कचरस्रोताची विल्हेवाट डम्पिंग क्षेत्रातच फेकून देऊन लावली जात आहे. तिथे जे प्रचंड मोठमोठे ढीग किंवा टेकड्या निर्माण होत आहेत, त्यात अनेक बहुमोल स्रोत गाडले जात आहेत! शिवाय अनेक मौल्यवान धातूंचे अंश हळूहळू आजूबाजूच्या पर्यावरणात पसरत चालले असून अन्नसाखळीत त्यांचे दुष्परिणाम दिसत आहेत. म्हणजे एका परीने स्रोतांची उपलब्धता कमी होत जाणार आहे, व दुसऱ्या परीने त्यांच्यामुळे पर्यावरणाचे अतोनात नुकसान होत आहे. असे दुहेरी संकट आपल्यासमोर उभे राहिलेले आहे. अनेक अप्रगत किंवा विकसनशील देशांमध्ये असे कचरास्रोत जाळले जात आहेत. ही उपकरणे कोणतीही संरक्षक उपाय नसताना सुट्या भागांमध्ये मोडली-तोडली जातात. त्यातील मौल्यवान धातू मिळविण्यासाठी बऱ्याच वेळा खनिज आम्लांचा मुक्तहस्ताने वापर केला जातो! हे आम्ल हाताळण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण दिले जात नाही! जाळण्यामुळे किंवा आम्लांच्या वा तत्सम घातक रासायनिक द्रावणांच्या वापरातून विषारी पदार्थांची निर्मिती होऊन माती, पाणी आणि हवा या मूलभूत पर्यावरणास हानी पोहोचवत आहेत. आरोग्याच्या गंभीर समस्या त्यामुळे निर्माण होत आहेत. चेतासंस्था आणि मेंदू, फुप्फुसे, मूत्रपिंडे यासारख्या अतिमहत्त्वाच्या इंद्रियांना या प्रदूषणामुळे दीर्घकालीन अपंगत्व येऊ शकते. कर्करोगाचे प्रमाण अशा ठिकाणी वाढते असते. पर्यावरणात त्यामुळे जे नुकसान होत आहे, त्याचे परिणाम उद्या प्रगत राष्ट्रांनाही भोगावे लागणार आहेत. हवामानबदल, तापमानवृद्धी व अन्न पाण्याचे प्रदूषण यांची जागतिक व्याप्ती वाढत चालली आहे, त्यातून कुणालाही सवलत मिळणार नाही. हे चित्र आता स्पष्ट होऊ लागले आहे.

आय.टी. उत्पादनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या घातक पदार्थांमुळे मानवी आरोग्यास आणि पर्यावरणास हानी पोहोचते, असे अनेक संशोधकांनी प्रयोगांनी सिद्ध केले आहे. ही उत्पादने करताना घातक रसायने व द्रावणे वापरली जातात. उत्पादन होत असताना डायऑक्सिन, क्लोरीन, ब्रोमीन आणि फ्लुओरिन तसेच इतर विषारी पदार्थांच्या वाफा पर्यावरणात पसरतात. ह्या वाफा कित्येक वर्षे वातावरणात टिकतात व त्या दरम्यान सजीवांच्या सृष्टीत प्रवेश करतात. ऑगस्ट २०१८मध्ये संयुक्त

राष्ट्रांच्या एका अभ्यास अहवालानुसार या घातक वाफांच्या संपर्कातून दर १५ सेकंदाला एका कामगाराचा मृत्यू होतो! म्हणजे वर्षाला २२-२३ लाख कुशल कामगार अकाली मृत्यूच्या दाढेत रगडले जातात. हे आकडे अतिशय भयंकर आहेत. एड्स, क्षय, मलेरिया या रोगांनी होणाऱ्या एकूण मृत्यूंपेक्षा हे आकडे अधिक आहेत. याचा फटका अप्रगत किंवा विकसनशील राष्ट्रांना अधिक बसतो, कारण ह्या सर्व उत्पादनांची केंद्रे हीच राष्ट्रे आहेत. कमी करआकारणी, स्वस्त कामगार यामुळे या बहुराष्ट्रीय कंपन्या या देशांमध्येच हे सारे उत्पादन करतात. मृत्युमुखी पडणाऱ्या दहापैकी नऊ कुशल कामगार या देशांमधील आहेत!

यातील अतिशय घातक असणारी दोन महत्त्वाची उदाहरणे म्हणजे ज्वालारोधक आणि प्लास्टिसायझरही आहेत. अग्निसुरक्षेच्या गरजेपोटी ज्वालारोधक पदार्थ ही उपकरणे घडवताना वापरली जातात, तर ती सहजपणे हाताळण्यासाठी आणि टिकाऊ बनवण्यासाठी प्लास्टिसायझर वापरली जातात. विशेषतः केबल म्हणजे वाहकतारा या लवचिक हव्या असतात, तशाच टिकाऊ आणि ज्वालारोधकही हव्या असतात. म्हणजे एका विशिष्ट समस्येचे निराकरण करत असताना त्यातून पर्यावरणास घातक असलेली दुसरी समस्या निर्माण होत असते. या रसायनांमुळे कामगारांच्या संप्रेरक प्रणालींवर (हार्मोन) विपरीत परिणाम होत असतात. तसेच, स्मृतिभ्रंश, मधुमेह, लठ्ठपणा, वंध्यत्व हेही प्रकृतीदोष त्यातून निर्माण होऊ शकतात. ह्या पदार्थांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे शरीरात त्यांचा संचय होऊ शकतो. विशेषतः मायक्रोप्लास्टिक हा नवा भस्मासूर यातून निर्माण होत आहे. यांचे परिणाम नवीन जन्माला येणाऱ्या बालकांवर होऊ शकतात. कॅडमियम, पारा, शिसे आणि हेक्झॅव्हॅलंट क्रोमियम यांसारखे जड धातू प्लास्टिक, पेंट (रंग), आणि स्क्रीन प्रकाशित करण्यासाठी तसेच सर्किट बोर्डमध्ये सर्रास वापरले जातात. हे घटक विषारीच आहेत. यांना मानवी कर्कजन्य म्हणून वैद्यकीय प्रणालीत ओळखले जाते. असे पदार्थ कचऱ्याच्या स्वरूपात जाळले गेले तर ते वाफेच्या स्वरूपात पर्यावरणात पसरत जातात. कर्करोगाचे वाढते प्रमाण आणि या विषारी वाफा यात निकटचा संबंध आहे.

पर्यावरण व आरोग्य समस्यांबरोबरच, आर्थिक नुकसान आणि स्रोत गमवण्याचा तिहेरी धोका या ई कचरास्रोतांमुळे निर्माण झालेला आहे. इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये किंवा वस्तूंमध्ये सोने, चांदी, प्लॅटिनम, पॅलेडीयम, पारा, क्रोमियम, बेरेलीयम, कॅडमियम, तांबे अशा धातूंचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या स्रोतांची उपलब्धता कमी होत चालली आहे. सन २०१६ मध्ये एका शास्त्रीय अंदाजानुसार सुमारे ५५०० कोटी युरो किमतीची ही धातुसंपदा त्या वर्षीच्या ई कचरास्रोतांमध्ये होती. दरवर्षी हे प्रमाण वाढते आहे, असे लक्षात घेतले तर काही वर्षांमध्येच ह्यातील बरेचसे स्रोत कायमस्वरूपी गमावले जातील. कदाचित या कचरास्रोतांमधून ते परत मिळवण्यासाठी तंत्रज्ञान विकसित होईलही, पण तोपर्यंत पर्यावरणाचे जे नुकसान होईल, त्याची भरपाई कोणी करू शकणार नाही. त्याचे परिणाम माणसाबरोबर सर्वच सजीव सृष्टीला भोगावे लागणार आहेत!

इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात ई कचरास्रोत कमी करण्यासाठी किंवा पूर्णतया रोखण्यासाठी चक्रीय अर्थव्यवस्था स्वीकारून रुजवणे कितपत शक्य किंवा अशक्य आहे, यावर गंभीरपणे विचारमंथन होण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेत उत्पादनांची रचना ठरवताना ती दीर्घकालीन कालावधीसाठी कशी टिकतील, पुनर्वापर करण्यासाठी किती सहज असतील, आणि त्यांची उपयुक्तता संपल्यावर त्यातून नवीन उत्पादने तयार करण्यासाठी किती क्रियाशील असतील या बाबींकडे लक्ष द्यावे लागेल. कचरा निर्माणच होऊ दिला जाणार नाही, हे ब्रीदवाक्य या अर्थव्यवस्थेत मध्यवर्ती हवे म्हणजेच आयटी क्षेत्रात टिकाऊ, सहजपणे नवीन प्रणाली सामावून घेऊ शकणारी आणि पुनर्वापर करण्यायोग्य अशा उत्पादनांची निकड निर्माण झालेली आहे. ह्यात एक अन्य अतिशय महत्त्वाचा घटक हा या प्रयत्नांना कलाटणी देणारा ठरणार आहे, तो म्हणजे माहितीसुरक्षितता! उपभोक्त्याची जी माहिती या उपकरणांमध्ये साठवली जाते, त्या माहितीचा दुरुपयोग न होऊ देता साध्य करायचे आहे! त्यामुळे मूळ मालकाची माहिती चोरली न जाता ते उपकरण पुन्हा वापरता आले पाहिजे! अन्यथा त्या उपकरणांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यावर त्यातील सामग्रीचा पुनर्वापर कठीण किंवा अशक्य होऊन बसेल.

तंत्रज्ञान हे दुधारी शस्त्र आहे. त्याचा वापर करताना आपण तारतम्याने करायला हवा. अन्यथा त्याचे दुष्परिणाम समस्त सजीवसृष्टीला भोगावे लागतील. अंकीय प्रणालीचा वापर फोटोग्राफीक्षेत्रात सुरू झाला, त्याचा अतिशय चांगला परिणाम पाहायला मिळाला. डिजिटल फोटो ही क्रांती होती. त्यामुळे फोटो रीळ विविध रसायने वापरून आधी निगेटिव्ह बनवून मग परत प्रिंट करायचे हा पर्यावरण प्रतिकूल कार्यक्रम संपलाच! परंतु तीच अंकीय प्रणाली घड्याळांसाठी वापरली जाऊ लागली आणि त्यामुळे बॅटरी सेलमुळे होणारे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढले. म्हणजे डिजिटलायझेशन तंत्र कुठे वापरायचे हे तारतम्य माणसाने दाखवायचे आहे. चावी देणारी घड्याळे प्रदूषण करत नाहीत, आणि अचूक वेळही दर्शवतात! व्हिडीओ प्लेयर आले, मग सीडी व डीव्हीडी प्लेयर आले आणि आता त्यांची जागा ब्ल्यू रे प्लेयरनी घेतली. त्या प्रत्येकातून ई कचरा वाढतच गेला! मग आपण नक्की काय मिळवले? डेस्कटॉप जाऊन लॅपटॉप आले, टॅबलेट आणि आयपॅड आले, आणि ई कचरा वाढतच गेला! समजते पण उमजत नाही आणि उमजले तरी प्रत्यक्षात

काही करता येत नाही, अशी आपली अवस्था झाली आहे!

ई कचरास्रोतांचे पुनर्चक्रांकन करण्यासाठी आणि असे स्रोत अप्रगत किंवा विकसनशील देशात पाठवण्यावर बंदी घालण्यासाठी सन १९८९ मध्ये बेसल या गावी आंतरराष्ट्रीय परिषदेत ठराव पारित करण्यात आला होता. तेव्हापासून ई कचरस्रोत पुनर्चक्रांकनास सुरुवात झाली. त्या क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध होऊ लागल्या. या स्रोतात चांदी, सोने, पॅलेडियम, टिन आणि तांबे यांचे प्रमाण बरेच असल्यामुळे त्यांचे पुनर्चक्रांकन हे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. संगणकाचे हार्ड ड्राइव्ह तोडून त्यापासून अॅल्युमिनियमच्या विटा बनवून त्यांचा वापर मोटारी बनवण्याच्या कारखान्यात केला जाऊ लागला. सन १९९१ मध्ये पहिल्या ई कचरास्रोत पुनर्चक्रांकन उद्योगाची पायाभरणी स्वित्झर्लंडमध्ये झाली. तिथे जुने रेफ्रिजरेटर पुनर्चक्रांकन करण्यासाठी घेतले जात होते. त्यानंतर दहा वर्षांनी या पुनर्चक्रांकनासाठी युरोपीयन युनियनने नियमावली बनवली. अमेरिकेत फेडरल सरकारने यासाठी कोणतेही नियम अजून बनवलेले नाहीत, पण ५० पैकी २५ राज्यांनी त्यासाठी कायदे केले आहेत. भारतात ई कचरास्रोत व्यवस्थापन नियम प्रथम २०१६ साली बनवण्यात आले, त्यात आता बरेच बदल करून एप्रिल २०२२ पासून नवीन नियमावली बनवण्यात आली आहे. तिची अंमलबजावणी एप्रिल २०२३ पासून सुरू झाली आहे. यात उत्पादकावर कमीत कमी ३०% उत्पादन परत घेऊन त्यावर पुनर्चक्रांकन करणे आता सक्तीचे झाले आहे. याला एक्स्टेंडेड प्रोड्युसर रिस्पॉन्सीबिलिटी (EPR) असे म्हणतात.

या ई कचरास्रोतांचे प्रमाण कमी करण्यासाठी वैयक्तिक पातळीवर आपण पुढील पाच गोष्टी करू शकतो.

१. इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर जितका जास्तीत जास्त काळ करता येईल तितका करून आपला कार्बन ठसा कमी करण्याचा प्रयत्न करावा.

२. कोणतेही नवीन उपकरण घेताना ते अत्यावश्यक आहे याची खात्री पटली तरच ते घ्यावे व ते काळजीपूर्वक जास्तीत जास्त काळ वापरण्याचा प्रयत्न करावा.

३. जे उपकरण/यंत्र आपण घेत आहोत, त्याची दुरुस्ती होण्याची खात्री करून घ्यावी, तसेच पुढील काही वर्षांसाठी जे बदल अपेक्षित आहेत, ते सामावून घेण्याची त्यात क्षमता आहे, याचीही खात्री करून घ्यावी.

४. आपल्या कार्यालयातील, घरातील आणि परिसरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा पुनर्वापर कसा करता येईल याचा विचार करावा. जुनी उपकरणे चांगल्या स्थितीत ठेवून जिथे त्यांची आवश्यकता असेल किंवा उपयोग होऊ शकेल, अशा ठिकाणी ती पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावा.

५. ही उपकरणे पूर्णपणे नादुरुस्त होतील, तेव्हा त्यांचे पुनर्चक्रांकन होईल याची दक्षता घ्यावी.

आपण हे करू शकलो तर या आधुनिक माहितीक्षेत्रातील कृष्णविवरे आपल्याला नियंत्रणात ठेवता येतील, अन्यथा त्यात आपणही लुप्त होऊ शकतो ही गोष्ट सदैव ध्यानात ठेवूया.

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com

ग्रंथाली

**भास्कर कदम** लिखित

**नांदगाव ते लंडन**

**(प्रवासवर्णन)**




**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

**उजेड पेरायचा आहे**

**(कवितासंग्रह)**




**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १५० रुपये**



किरण येले

# नवस फेडायला टॅक्सी चालवणारा सॉफ्टवेअर इंजिनीयर लेखक

**आयुष्यात** थोडा काळ का होईना काळीपिवळी टॅक्सी चालवायची, हे मी बरीच वर्षं घोकत होतो. आता का? तर बरीच करणं. १. मन्नत : बरीच वर्षं रखडलेलं आमचं घर होण्यासाठी आईनं अपार कष्ट आणि धडपड केली. तेव्हाच मी ठरवलेलं की आपलं मुंबईतलं घर झाल्यावर या युनिव्हर्सचे मुंबईचे आभार मानायचे. कसे? तर किमान एक महिना टॅक्सी चालवून. लोकांना सेवा देऊन. म्हणजे लोक कसे गुरुद्वारात चपला सांभाळतात. किंवा भंडाऱ्यात आनंदानं वाढायला सरसावतात. तसं काहीतरी.

हा उतारा कोणत्याही कथेचा नाही तर हे त्याच्या ब्लॉगवर लिहिलंय नील आर्ते या सॉफ्टवेअर इंजिनीयर आणि पुण्यात सेटल झालेल्या तरुण लेखकाने. त्यानंतर त्यानं रोज मुंबईत काळीपिवळी टॅक्सी चालवताना आलेले भन्नाट अनुभव त्याच्या ब्लॉगवर आणि फेसबूकवर महिनाभर टाकले आहेत. नील आर्तेने अनेक कथा लिहिल्या असल्या आणि त्याची कथा हंस दिवाळी अंक २०२२ मध्ये प्रसिद्ध झाली असली तरी पुस्तकरूपात त्याचे साहित्य अजून प्रकाशित झालेले नाही.

मराठी साहित्यात गेल्या ऐंशीच्या दशकापर्यंत साहित्य हे छान टेबलवरबसून, शेजारी सुवासिक उदबत्ती लावून, आसपास आवाज कुणी करणार नाही अशी तंबी देऊन, एकांतात लिहिले जाईल याची काळजी घेतल्याचे आपण वाचले आहे. बहुजन समाज लिहू लागल्यावर जुन्या धारणा मोडीत निघाल्या आणि सुवासिक वातावरणात लिहिलेले साहित्य मध्यमवर्गीय प्रश्नांपुरते मर्यादित असल्याचे मराठी वाचकांच्या लक्षात आले. मराठीत दुर्गा भागवत, राजन गवस, अभय बंग, अनिल अवचट अशी काही मंडळी तळागाळातल्या लोकांत काम करत होती आणि ते अनुभव लिहीत होती. त्यामुळे त्यांच्या साहित्यात जिवंतपण आहे हे जाणवतं. या पार्श्वभूमीवर नील आर्तेसारखा नव्या दमाचा लेखक असे वेगळे अनुभव घेऊ पाहत आहे याचे कौतुक आणि अप्रूप वाटणे साहजिक आहे.



नील आर्ते

नील आर्तेच्या कथांचे विषय अनवट आहेत. त्यातला आशय आजची पिढीचा आहे. त्याच्या कथेतील भाषा नव्या पिढीची आहे. आजचे तरुण वाचन करत नाहीत असा एक तक्रारीचा सूर आपल्याला ऐकू येतो याचे कारण आजच्या तरुणांना मराठी, हिन्दी वा इंग्रजी साहित्यातील कथेची भाषा आपली वाटत नाही. कथेचे विषय तर तरुणांचे नसतातच. आणि कथास्थळे लेखकाच्या कक्षेबाहेरची असतात. पण तरुणांसाठी लिहिलेली कथा कशी असू शकते याचे उदाहरण म्हणून नीलच्या 'शनिवारचा स्टड' कथेचा एक अंश..

एप्रिलमधली शनिवार संध्याकाळ, शिवाजीपार्कचं सीसीडी तरुणाईनं फुललेलं. त्यानं एन्ट्री टाकली आणि सगळ्या पोरींचं काळीज लक्कन हललं. ट्रेंडी स्पाईक्स, 'जॅक-जोन्स'ची मांडीवर फाटलेली डार्क ब्ल्यू जीन्स आणि डिझेलचा तलम स्लीवलेस टीशर्ट. सव्वासहा फूट उंची, शिडशिडीत बांधा; पण

फोरआर्म आणि दंडात दिसणारी प्रचंड ताकत. सीसीडीमधल्या विविध मुली विविध कारणांसाठी तत्काळ त्याच्या प्रेमात पडल्या : मियाला त्याच्या वाईड नेक टीशर्टमधून दिसणाऱ्या रुंद छातीवरला तीन मूर्तींचा एक्झॉटिक टॅटू आवडला, सुहानीला त्याचे रुसक्या पोरासारखे किंचित फुगलेले गाल खूप क्युट वाटले, आणि साल्साला आवडली त्याची नजर : एकाच वेळी किंचित रागीट, आश्वासक आणि निरागस, चक्क तिला पाहूनही तिच्या 'गळ्याखाली' न जाणारी बेदरकार, शांत, स्थिर नजर! सगळ्या मुलींच्या प्रेमळ आणि त्यांच्या बॉयफ्रेंड्सच्या जळू नजरांना फाट्यावर मारत आपल्याच मस्तीत त्यानं एक टेबल पकडलं आणि तो शांतपणे टिश्यू-पेपरवर काहीतरी लिहीत बसला. साल्सा तर वेडावली होती, माहीत नाही किती वेळ गेला १० सेकंद, ५ मिनटं, की २ तास?

अचानक तो उठला, हसत दाणदाण पावलं टाकत तो साल्साकडे आला, आणि त्यानं तो टिश्यू-पेपर साल्साला दिला. साल्सा थुयथुयली, नक्की त्याचा नंबर देत होता तो. तिच्या डोक्यावर अलगद प्रेमळ हात ठेवून तो आला तसा परत फिरला आणि निघून गेला. साल्सानं खुशीत टिश्यू उघडला आणि ती बावचळली. अक्खा टिश्यूपेपर राम-नामानं भरला होता, आणि कुठेतरी हनुमानजयंतीची आरती जोरात चालू होती.

वाचकहो, या गोष्टीला पुढच्या श्लोकाचा आधार आहे :

अश्वथामा बळीर्व्यासो हनुमानाश्च बिभीषण कृपाचार्य च परशुरामां सप्तैता चिरांजीवानाम

अर्थ : अश्वथामा, बळी, व्यास, हनुमान, बिभीषण, कृपाचार्य, आणि परशुराम हे सात चिरंजीव आहेत.

ही कथा अवधानपूर्वक वाचल्यावर वाचकांना शेवटास दिलेल्या इशाऱ्यात कथेचा अर्थ लागतो. सात चिरंजीवपैकी एक या हॉटेलमध्ये आला आहे का असा विचार मनात आला की त्याची शरीर, नजर, देहबोली, बेदरकार वृती आणि मागे चाललेली हनुमानआरती याचे अनुबंध लागू लगातात. नीलची कथा चमकदार वाटण्याचा धोका संभवतो; पण चमकदार नाही. त्याच्या कथेतून एक विचार थेट पोहोचतो. 'नळीबाव' ही त्याची कथा वाचकासाठी इथे देत आहे.

**नळीबाव**

मटणाच्या रश्शाचा घमघमाट सुटला होता. दोन दोन पेग व्हिस्कीनं अरुकाका, एस.के., आणि पुनीत तिघांच्याही पोटात आग लागली होती! तेवढ्यात मम्मीनं ताटंच घेतली. चौघंही टेबलावर बसले. स्टीलची चकचकीत ताटं, चकचकीत वाट्या, कांदा-टॉमॅटो-दह्याची कोशिंबीर. गरमागरम मऊसूत चपात्या. वाटीतला वाफाळता लालभडक मटणाचा रस्सा आणि खास पुनीतसाठीच्या वाटीत मोठ्ठा नळीचा तुकडा!

पुनीत खुशारला, ''मम्म्या, आय लव्ह यू!'' त्यानं तीनचार किसेस हवेत फेकले आणि नळी गरमगरम असतानाच चोखली. आतला बोन-मॅरोचा घसघशीत गोळा बक्कन त्याच्या तोंडात गेला! किंचित तुपकट, उबदार, गुलगुलीत, राखाडी-पांढऱ्या रंगाचा तो ऐवज पुनीतच्या घशातून खाली उतरला आणि त्यानं सुखानं डोळेच मिटले! मम्मीना प्रेमाचं भरतं आलं, ''माझं लेकरू ग ते पाय मोडून बसलंय बिचारं. खा बाळा खा, हाडात शक्ती यायला पाह्यजे लवकर लवकर. माझं पोर ते. ही मेली दळिद्री लोकं कुठेपण फुटपाथवर झोपतात आणि आम्हाला त्रा...''

एस.कें.नी त्यांच्या मांडीला हळूच चिमटा काढला तेव्हा कुठे त्या गप्प झाल्या.

''काय मग अरुशेठ कोणता नवीन प्रोजेक्ट चाललाय सध्या?'' त्यांनी सफाईनं विषय बदलला.

आवडीचा विषय निघाल्यावर अरुकाका तरारला, ''अरे, सध्या आम्ही मायक्रॉइड्सवर काम करतोय!''

''मायक्रॉइड्स म्हणजे?''

''सांगतो... नॅनो-बॉट्स ऐकलेयत ना तुम्ही? म्हणजे सूक्ष्म यंत्रमानव!''

''नॅनो कार माहितीये माला'', पुनीत फिदीफिदी हसला... ''त्या दिवशी गाडी ठोकली तेव्हा एक नॅनो पण चेपली... ओय ओय...'' एस.कें.नी त्याच्या धडक्या पायावर टेबलाखालून जोरात पाय मारला!

''अरु, त्याच्याकडे लक्ष देऊ नकोस. अहो, तुमच्या पोराला अजून पेग देऊ नका आता, लगेच टाईट होतो तो. तू बोल पुढे!''

''तर आम्ही थोडा वेगळा विचार केला : नॅनो बॉट्स पूर्णपणे यांत्रिक असतात पण त्यांच्यात काही जैविक गुणधर्म आणता आले तर? उदाहरणार्थ, मुंग्या किंवा वाळवी किंवा मधमाश्यांइतकी कार्यक्षमता आणि बुद्धिमत्ता! ह्या मठ्ठ सूक्ष्मयंत्रांना चांगला मेंदू आणि थोडा फार कॉन्शस देता आला तर?... म्हणजे मानवाएवढा नाही पण एखाद्या मुंगीएवढा?

पुनीतच्या मठ्ठ मेंदूला हा सगळा डोस हेवी व्हायला लागला होता शिवाय कोणीच त्याच्याकडे बघतसुद्धा नव्हतं... ''मम्मी अजून नळी-बाव पायजे मला'', पुनीत लाडात आला.

मम्मींना परत प्रेमाचं भरतं आलं, ''अगदी अस्सा आहे ना माझा पुन्नू लहानपणीसुद्धा 'नळी-बाव नळी-बाव' करत चारचार मटणाच्या नळ्या चोखायचा... घे बेटा'', त्यांनी आपल्या ताटातली नळीपण पुनीतच्या ताटात टाकली.

''अहो, गप्प बसा जरा. अरु तू सांग पुढे'', एस.कें.-मधला उद्योगपती जागा झाला होता.

''थोडक्यात काय लहान लहान जिवांची बुद्धी आणि यंत्रांचा आज्ञाधारकपणा हे दोन्ही एकत्र करायच्या दिशेनं आमचं

काम सध्या चालू आहे.'' म्हणजे नॅनोबॉट्सपेक्षा मोठे पण इटुकलेच आणि यंत्र आणि सजीवांचं हायब्रीड असलेले म्हणून आम्ही त्यांना मायक्रॉइड्स म्हणतो.

''विचार कर ना हे मायक्रॉइड्स काय काय करू शकतील : अवघड जागेची ऑपरेशन्स म्हण किंवा कोपऱ्यात सांदी-फटीत जाऊन करायची अनेक किचकट कामं. छोट्या-मोठ्या कामांसाठी गाडीचं इंजिन उघडायचीपण गरज नाही!''

'ठ्ठॉक ठ्ठॉक...' पुनीत मम्मीनं दिलेली नळी जोरात ताटात आपटत होता. आता नळी गार झाल्यामुळे आतला बाव बाहेर येत नव्हता. 'पुच्च्यूक पुच्च्यूक' त्यानं दोनदा परत चोखून बघितलं पण नो लक्क! मग एक डोळा मिटून त्यानं नळीत खोलवर बघितलं... होता होता आत बाव होता... भरपूर लुसलुशीत तुपकट बाव... पण ह्या नळीचं तोंड अगदी अरुंद होतं त्यामुळे लोचा होत होता. अरुकाका ताटावरून उठला आणि खरकट्या हातांनीच त्यानं आपली बॅग जवळ ओढली. 'पुनीत एक मिन्ट थांब तुझा बाव काढूया आपण!' त्यानं बागेतून एक जिन-तानच्या गोळ्यांच्या डबीसारखी चपटी डबी काढली. आतमध्ये दहाबारा दाणे होते. आपल्या बडीशेपेच्या गोळ्या असतात ना त्याच्या साधारण अर्ध्या आकाराचे! हे आमचे मायक्रॉइड्स आता निष्क्रिय आहेत... त्यांना आपण ॲक्टिव्ह करूया. त्यानं ते सगळे दाणे एका बशीत ओतले आणि एका बाटलीतला लाल द्रव त्यांच्यावर ओतला.

''हे काय? रक्त?''

''नाही हे बायोफ्लुइड आहे, यात रक्ताचे काही घटक आहेत आणि इतर बऱ्याच गोष्टी हे आमच्या मायक्रॉइड्सचं खाणं कम बॅटरी-चार्ज!''

लाल द्रव पडल्यावर ते दाणे बशीतच हळूहळू थरथरायला लागले. तेवढ्यात अरुकाकानं लॅपटॉपवर काही कमांड्स सेट केल्या आणि एखाद्या जादूगाराच्या आवेशात खाट्टकन एन्टर मारलं! दाणे अजून जोरात थरथरायला लागले आणि मग झप्पकन ते बशीतून बाहेर आले आणि तुरुतुरु चालत टेबलावरून पुनीतच्या ताटाकडे गेले, तिकडून नळीजवळ...

मग त्यांनी शिस्तीत रांग केली सैनिकांसारखी आणि एक-एक जण आत घुसला नळीच्या तोंडातून... मग १०-२० सेकंद फक्त गुं-गुं असा क्षीण आवाज येत राहिला आणि मग ते सगळे छोटे सैनिक बाहेर आले. प्रत्येकानं थोडा थोडा नळी बाव आपल्याबरोबर आणला होता तो त्यांनी ताटात एकत्र जमा केला आणि ते शिस्तीत ताटाच्या बाजूला जाऊन उभे राहिले!

''हा घे पुनीत, तुझा नळी-बाव सगळाच्या सगळा!'', अरुकाका मिस्कील हसत होता.

पुनीतनं एक डोळा मिटून नळीत बघितलं, नळी लख्ख साफ झाली होती आणि सगळ्या बावाचा घसघशीत गोळा त्याच्या ताटात! ''तर हे आहेत आमचे छोटुले सैनिक ऊर्फ मायक्रॉइड्स. अशी छोट्या छोट्या सांदीकोपऱ्यातली कामं करण्यासाठी कस्टमाइझ्ड करता येतं त्यांना. इन फॅक्ट मी त्यांना नावं पण ठेवलीयेत सगळी आपल्या आवडत्या शेक्सपीयरच्या पात्रांची: हा मॅक्बेथ, हा हॅम्लेट, ही डेस्डीमोना, हा ऑथेल्लो आणि हा एस.के.चा आवडता शायलॉक!''

''हे घे'', अरुकाकानं भिंग सरकवलं. पुनीतनं भिंग लावून बघितलं :

एखादं मोठ्ठ डोकं आणि हाता-पायाच्या काड्या असलेलं मुडदूस बाळ जर बडीशेपेएवढं छोटं झालं तर कसं दिसेल... तसे दिसत होते ते सैनिक. तोंडाच्या जागी त्यांना कुरतडण्यासाठी बाऽऽऽरीक तीक्ष्ण दात होते आणि हातापायांना अणकुचीदार नख्या... इतक्यात शायलॉकनं अचानक भिंगातून थेट पुनीतकडे बघितलं आणि तो फिस्सकन हसला! पुनीतनं दचकून ताटच उडवलं आणि सगळं मटण बावासहीत त्याच्या प्लॅस्टरवर पडलं. एस.के. प्रचंड इम्प्रेस झाले होते, ''आयला! माझ्या दाढांत जाम फटी आहेत अऱ्या... नेहमी मटणाचे तुकडे अडकतात. तिकडे या तुझ्या सैनिकांना पाठवता येईल आत? कदाचित, पण त्यांना माणसांच्या इतकं जवळ जाऊ देण्यासाठी बऱ्याच टेस्ट्स कराव्या लागतील आम्हाला. सो सध्या तरी नाही. चल, बराच उशीर झालाय. परत डबीत बोलावतो त्यांना. वहिनी डेझर्टमध्ये काय आहे?''

अरुकाकाला गाडीपर्यंत सोडून एस.के. परत आले आणि आल्याआल्या बायकोवर बरसले... ''अगं, तुला देवानं अकलेचा भाग थोडा कमी दिलाय का? ते ॲक्सिडन्टचं सगळ्यांसमोर काय बडबडतेस? तुझ्या लाडक्या पोरानं दारू पिऊन फूटपाथवरच्या तीन जणांना गाडी ठोकलीय आणि स्वत:चा पाय मोडून घेतलाय हे आता लाउडस्पीकर घेऊन सांग ना...'' मागचा अख्खा आठवडा हे सगळं निस्तरण्यात घालवलाय मी पोलीस आले होते वास काढत माहितीये ना?

मोडकी गाडी बघून त्यांना संशय येऊ नये म्हणून बंगल्यातलं फणसाचं झाड तोडून पाडलं मी गाडीवर पुनीतचा पाय दोन दिवस आधीच मोडल्याचं खोटं सर्टिफिकेट आणलं डॉक्टरकडून. माझे सगळे कॉन्टॅक्ट्स वापरून प्रकरण दाबलंय मी, आणि माझे आई, तू दवंडी पिटत चाललीयस. आणि पोरगा झोपलाय मस्त डाराडूर ए.सी.मध्ये बाप आहे ना सगळ्यांना मॅनेज करायला. युसलेस!

पुनीतची बेडरूम :

पुनीत मेल्यासारखा डाराडूर झोपला होता उशीवर मोडका पाय ठेवून.

ए.सी.ची झडप हलकेच वर-खाली होत होती. पुनीतच्या उघड्या तोंडातून थोडी लाळ गळत होती! तेवढ्यात प्लॅस्टरच्या कडेला लपलेला शायलॉक हळूच फटीतून आणखी आत घुसला...

कर्र-कर्र प्लॅस्टर खरवडून त्यानं थोडी जागा केली... आत... आणखी थोडं आत जात तो जखमेजवळ पोचला आणि त्यानं टाके हळूहळू कुरतडायला सुरुवात केली...

टाक्यांच्या आत जखम होती... अर्धवट सुकलेली पण कुठेकुठे अजूनही लसलसती लालसर जखम! जखमेच्या आत चीर पडलेलं हाड आणि त्या हाडातला नळी-बाव... लुसलुशीत तुपकट! मघाशी नळी-बाव उकरल्यापासून तो वास आणि चव शायलॉकला वेडं करत होती...

हाडाची चीर आणखी मोठी करत शायलॉक आत आत घुसला...

आणि पुनीत गुरासारखा किंचाळू लागला!

नील आर्तेचे आवडते लेखक सुहास शिरवळकर, अनंत सामंत, जी.के. ऐनापुरे, किरण गुरव, हृषीकेश गुप्ते, पंकज भोसले, गणेश मतकरी, स्वप्नील चव्हाण, वसीमबार्री मणेर असले तरी नीलच्या कथांचे विषय, भाषा आणि शैली यातील एक पंकज भोसले सोडल्यास कुणाशीही मिळतीजुळती नाही. त्याच्या कथातील विषय आणि भाषा आजच्या पिढीची भाषा आहे, जी मराठी-हिंदी आणि इंग्रजी साहित्यातही अभावाने जाणवते. (चेतन भगतची पुस्तके खापण्याचे कारण हे आहे) मराठी साहित्यात मुळात तरुणांसाठी कादंबरी आणि कथा नाही. 'कोसला' गेली पन्नास वर्षे चालली याचे कारण त्यात तरुणांचे विश्व आहे. तरुण मनाची कुचंबणा जी आजही होत आहे ती अधोरेखित होते आहे. मराठी साहित्यात असे तरुणाईचे विश्व फक्त कविता आणि नाटकात येते. मराठी कथा आणी कादंबरीत अजूनही चाळिशीच्या पुढील जाणिवा दिसत राहतात. नील आर्ते याच्या कथा वाचताना मराठी साहित्यात असलेले हे न्यून काही अंशी कमी होईल अशी आशा करायला हरकत नाही.

**– नील आर्ते**

भ्रमणध्वनी : ९८६७६१५५१७


nilart@gmail.com

**– किरण येले**

kiran.yele@gmail.com

# शिवाची शक्ती भाग २

## शिल्पा जितेंद्र खेर




पोलीसपत्नींच्या जीवनावर आधारित या दहा कथा आपल्यासमोर मांडण्याच्या अभूतपूर्व कल्पनेबद्दल मी शिल्पा खेर यांना मनापासून शुभेच्छा देते. पोलीस अनेकदा उपाशीपोटी कित्येक तास कार्यरत असताना त्यांची मुले, पत्नी हेदेखील घरी त्यांची वाट पाहत असतात. या कौटुंबिक दृष्टिकोनातून समाजाने त्यांचे जीवन जाणणे आवश्यक आहे.


**– डॉ. मीरा चड्डा बोरवणकर**

IPS, Director General of Police (Retd.)

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये**

# ललिताक्षरं

## डॉ. वसुधा सहस्रबुद्धे, चारुशीला धर प्रा. विजया पंडितराव, वासंती वर्तक




या चारही जणींची संवेदनशीलता एकाच जातकुळीतली आहे. प्रत्येकीकडेच एक रसिकत्व आहे. उत्कटता आहे. कलादृष्टी आहे. छोट्या छोट्या क्षणांमधे जाणवलेला आयुष्याचा अर्थ पकडताना स्त्री म्हणून जात्याच असणारी एक कोमलता प्रत्येकीच्या लेखनाला भावोत्कटतेचे एक परिमाण देऊन गेली आहे.

**– मोनिका गजेंद्रगडकर**

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये**

## 'श्रमिकांच्या अनोख्या जगात' पुस्तकप्रकाशन

'श्रमिकांच्या अनोख्या जगात' हे विवेक पटवर्धन यांनी लिहिलेले, 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ २० मे रोजी 'ग्रंथाली प्रतिभांगण' वास्तूत झाला. सतीश प्रधान (भूतपूर्व टाटा समूहाचे एचआरप्रमुख) व डॉ. सुचिता कृष्णप्रसाद (लेबर इकॉनॉमिस्ट व एल्फिन्स्टन कॉलेजच्या इकॉनॉमिक्स विभागाच्या भूतपूर्व प्रमुख) हे प्रमुख पाहुणे होते. लेखक विवेक पटवर्धन हे एशियन पेंट्स कंपनीचे भूतपूर्व एचआरप्रमुख आहेत. ते कामगारविषयक ब्लॉग सातत्याने लिहीत असतात. 'श्रमिकांच्या अनोख्या जगात' पुस्तकात त्यांचे काही ब्लॉग तसेच औद्योगिक संबंधावरील इतर लिखाण आहे. त्यांनी याबाबत मनोगत व्यक्त केले.




यावेळी बोलताना डॉ. सुचेता कृष्णप्रसाद यांनी नव्वदीनंतर बदललेल्या कामगार क्षेत्राचा आढावा घेतला. औद्योगिक संबंध म्हटले की संघर्ष आलाच. तो हाताळताना विवेकाची साथ नसेल तर उद्योग आणि विशेषत: कामगार कसे होरपळले जातात ह्याची अनेक उदाहरणे पुस्तकात मिळतात. औद्योगिक संबंधांचे तानेबाणे केवळ वैचारिक व सैद्धांतिक पातळीवर न विशद करता लेखक थेट संघर्षामुळे त्रस्त कामगारांचे जीवनपट वाचकांसमोर उलगडतात. त्यात नेतृत्वाचे अनेक नमुने प्रसंगानुरूप येत जातात. पायरीपायरीने कामगारांची शिताफीने फसवणूक करून अखेरीस उद्योग बंद पाडणारे कारखानदार व त्यांचे प्रतिनिधी, प्रसंगी शासनाचेही प्रतिनिधी आहेत आणि गोविंदकाकांसारखे भयानक आर्थिक मंदी असूनही कामगार कपात न करणारे उद्योजकही आहेत.

सतीश प्रधान यांनी पुस्तकातल्या काही उताऱ्यांचा संदर्भ दिला. विशेषकरून अमेरिकेतल्या पहिल्या कामगार नेत्याच्या वाक्याचा दाखला दिला– बिलहेवुडच्या– 'ते रानटी सम्राट सोन्याचे– त्यांनी सोनं शोधलं नाही, त्यांनी सोन्याच्या खाणीत काम केलं नाही, त्यांनी सोनं शुद्ध करण्यात भाग घेतला नाही, पण विचित्र किमयेनं सगळं सोनं त्यांच्या मालकीचं झालं.' भारतातल्या नव्हे तर जगात सर्वत्र वाढत्या आर्थिक तफावतीच्या संदर्भात ते बोलत होते. सदर पुस्तकात अनेक ज्वलंत समस्या प्रभावीपणे मांडल्या आहेत. तसेच, समाजाने त्यांच्या निराकरणाचे पाऊल उचलले पाहिजे असे आवाहनही आहे.

डॉ. मृण्मयी भजक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ●

---

## रोगनिदान शास्त्राचे अंतरंग उलगडणारी 'प्रतिभांगण'मधील प्रसन्न संध्याकाळ!

पॅथॉलॉजीमधील ज्येष्ठ तज्ज्ञ आणि एस.आर.एल. कंपनीचे प्रमुख डॉ. अविनाश फडके यांची अभ्यासपूर्ण मुलाखत मधुमेहतज्ज्ञ डॉ. सतीश नाईक यांनी बुधवार, २४ मे रोजी 'ग्रंथाली प्रतिभांगण'मध्ये घेतली.

प्रतिभांगणमध्ये 'ग्रंथाली'तर्फे विविध प्रकारचे कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जातात त्यात 'आरोग्याची कॅप्सुल' हा मान्यवर डॉक्टरांच्या मुलाखतींचा एक कार्यक्रम आयोजित केला जातो त्यातील हे चौथे पुष्प! पॅथॉलॉजी अर्थात रोगनिदान शास्त्राविषयी सर्वसामान्य वाचक आणि रुग्णांच्या मनात अनेक शंका असतात या साऱ्यांचा ल.सा.वि. काढून डॉक्टर नाईक यांनी नेमके प्रश्न विचारले आणि त्यांची अतिशय सोपी पण सखोल उत्तरे डॉक्टर फडके यांनी दिली.

पॅथॉलॉजी अर्थात रोगनिदान शास्त्र ही अलीकडच्या काळात उदयाला आलेली एक महत्त्वाची शाखा. रोगनिदानशास्त्र आता इतके प्रगत झाले आहे की आजचे सुमारे ८५ टक्के रोगनिदान हे केवळ याच शास्त्राच्या आधारे होत आहे; हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल. भारत ही जगाची फार्मसी ठरली आहे हे या मुलाखतीतून उलगडले.

रोगनिदानशास्त्राच्या सगळ्या चाचण्या यांत्रिक पद्धतीने होत असल्या तरी त्यात मानवी बुद्धिमत्तेचे महत्त्व शिखर–स्थानीच आहे हे डॉक्टर अविनाश फडके यांनी स्पष्ट केले. याशिवाय इतर देशांच्या तुलनेत आपल्याकडील या चाचण्यांचे दर कसे कमी आहेत हे त्यांच्याकडून ऐकणे दिलासादायक होते.

डॉक्टर फडके यांना प्रारंभी 'औषधनिर्माण' या विषयात अधिक रस होता, पण काही कारणांमुळे त्यांना रोगनिदान–शास्त्राकडे वळावे लागले. यामुळे नाउमेद न होता त्यांनी त्या क्षेत्रात इतके प्रावीण्य मिळवले की आज भारतभर त्यांच्या सुमारे २५० शाखा असून या क्षेत्रातील एक अग्रणी नाव म्हणून त्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहिले जाते.

एकूणच मानवी कल्याण आणि त्याला निरामय अशा उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाणारी ही मैफल दीर्घकाळ रसिकांच्या स्मरणात राहील अशी झाली. आणि हो, ज्यांना ही मैफल समक्ष अनुभवता आली नाही त्यांच्यासाठी ती granthali pratibhangan या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहेच!

●

## विश्वास सहकारी बँकेचे विश्वास ठाकूर यांच्याशी 'कॉर्पोरेट गप्पा'

शनिवार, २७ मे २०२३ रोजी 'ग्रंथाली–प्रतिभांगण'मध्ये झालेल्या कार्यक्रमात विश्वास ठाकूर या अतिशय रंगतदार, बहुपैलू व्यक्तिमत्त्वाची मुलाखत झाली. मुलाखतकार ज्ञानेश चांदेकर यांच्या प्रश्नांना ठाकूर यांनी दिलखुलास उत्तरे दिली. ठाकूर यांनी वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी बँक स्थापन करण्यापासून बँकिंग क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळालेली बँक अशी ख्याती मिळवण्यापर्यंत बँकेचा प्रवास विश्वास ठाकूर यांनी या मुलाखतीत उलगडून दाखवला. 'मला तरुणपणी कर्ज हवे असताना ते एका बँकेने नाकारले. त्यावेळी मी जिद्दीने स्वतःचीच बँक स्थापन केली.' असे ते म्हणाले.

ज्यांना इतरत्र कर्ज मिळत नाही, ज्याची पत नाही त्याला कर्ज मिळवून देणे हे सहकारी बँकांचे मुख्य काम आहे. त्यामुळे कोरोनाकाळामध्ये त्यांच्या बँकेने साडेचार हजार लोकांना एक लाख रकमेची कर्जे दिली. त्यातील ९० टक्क्यांहून अधिक कर्जे वसूलही झाली आहेत. दुर्दैवाने रिझर्व्ह बँकेचा सहकारी बँकांकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक नसला तरी सहकारी बँका आपले काम नेटाने करत आहेत. सामान्य माणसाला सहकारी बँकांकडून कर्जरूपाने मदत मिळत असते, पण काही जण कर्ज परत करताना खूप टाळाटाळ करतात. अशा कर्ज न फेडणाऱ्यांचे व कर्ज फेडणाऱ्यांचेही रंगतदार अनुभव त्यांनी सांगितले.

बँकिंग क्षेत्रातील आपल्या विविध अनुभवांवर आधारित 'नात्यांचे सर्व्हिसिंग' हे पुस्तक ठाकूर यांनी लिहिले आहे. त्याला शासनाचा पुरस्कार मिळाला असून चौदा आवृत्त्याही निघाल्या आहेत. बावीस देशांमध्ये साडेपाच लाख श्रोते असलेला विश्वास रेडिओ हा उपक्रमही ते यशस्वीपणे राबवत आहेत.


विश्वास ठाकूर यांच्या उत्स्फूर्त आणि ओघवत्या कथन–शैलीमुळे मुलाखत रंगतदार झाली.


●

## प्रकाशन वृत्तांत

### भास्कर कदम यांच्या दोन पुस्तकांचे नाशिक येथे प्रकाशन

विचारांचा समृद्ध वारसा आहेच. शिवाय सामाजिक जाणिवेच्या भावनेतून भास्कर कदम यांनी पुस्तकाची मांडणी केल्याने एका लेखकाच्या अनुभवसंपन्न नजरेतून प्रवास घडतो, असे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केले.




नाशिक येथे नांदगावचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार भास्कर कदम यांच्या 'नांदगाव ते लंडन' व 'उजेड पेरायचा आहे' या पुस्तकांचे प्रकाशन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बबनराव घोलप, अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक फ.मुं. शिंदे, प्रा. लीलाताई शिंदे, माजी आमदार पंकज भुजबळ आदी मान्यवरांसह ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

ज्येष्ठ साहित्यिक फ.मुं. शिंदे यांनी वाचक हा मोठा लेखक असतो. समाजाच्या उपयोगाचे जे आहे ते पेरायचे आहे. भावना आणि भूगोल लेखक आपल्या जगात आणून सोडतात आणि हेच कदम यांच्या प्रवासवर्णनातून व्यक्त होत असल्याचे शिंदे म्हणाले.


सुरुवातीला ज्येष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांनी कदम यांच्या पुस्तकाविषयी विवेचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र मालुंजकर यांनी केले. प्रास्ताविक गौतम संचेती यांनी केले.

●

## प्रकाशन वृत्तांत

### 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'मागील शक्ती

'ग्रंथाली प्रकाशन आणि भाग्यश्री फाऊंडेशन आणि प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने २२ मे २०२३ रोजी 'शिवाची शक्ती' भाग–२ या शिल्पा जितेंद्र खेर लिखित पोलीसपत्नींच्या मुलाखतींवर आधारित पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक अजित पारसनीस यांच्या हस्ते साहित्य मंदिर सभागृह, नवी मुंबई येथे संपन्न झाले. या प्रसंगी नवी मुंबईचे आयुक्त राजेश नार्वेकर, पोलीस सहआयुक्त संजय मोहिते, मेजर सुभाष गावंड, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालयाचे अध्यक्ष सुभाष कुळकर्णी, भाग्यश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र खेर आदी मान्यवर उपस्थित होते.




'पोलीसपत्नींच्या जीवनातील विविध घटनांवर आधारित असलेल्या या पुस्तकाचे मुख्य उद्दिष्ट आपला पती सामाजिक सुरक्षेचे दायित्व खंबीरपणे निभावत असताना आपल्या घरची बाजू समर्थपणे सांभाळणाऱ्या पत्नीचे मानसिक सामर्थ्य समाजा–समोर आणणे हे आहे.' असे लेखिका शिल्पा खेर म्हणाल्या.

श्रीमती अलका राजवाडे, श्रीमती भारती मोहिते, श्रीमती प्रीती परदेशी, डॉ. सोनाली देशमुख, श्रीमती रोहिणी जोशी, श्रीमती श्रावणी येरुणकर या सहा पोलीसपत्नींच्या मुलाखती डॉ. लतिका भानुशाली यांनी घेतल्या. हे या कार्यक्रमाचे खास आकर्षण होते.

'या सर्व पोलीसपत्नींचे व्यक्तिमत्त्व सक्षम आहे. त्यांच्याकडील संयम, धैर्य, सहनशीलता या गुणांद्वारे आपला संसार त्यांनी कशाप्रकारे यशस्वी केला हे खरंच तरुणांनी शिकण्यासारखे आहे.' असे मत मेजर सुभाष गावंड यांनी व्यक्त केले.

पोलीस सहआयुक्त संजय मोहिते म्हणाले, पोलीस–दलातील शिपाई, अधिकारी यांचे कार्य इतके जबाबदारीचे असते की आपल्या कुटुंबाच्या साथीशिवाय ते पार पाडणे अशक्य आहे. लग्नानंतर आपण आय.पी.एस.ची परीक्षा दिली असून त्याचा अभ्यास करताना आपल्या पत्नींने त्यावेळी सर्व नोट्स तयार केल्या व अभ्यासासाठी सहकार्य केले, या गोष्टीचा त्यांनी आर्वजून उल्लेख केला.

नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी अतिशय सुंदर पद्धतीने या पुस्तकाचे विश्लेषण केले. समाजातील सुव्यवस्था राखण्याकरता पोलीस देत असलेले फार मोठे योगदान या पुस्तकातील तरुणांच्या संवादातून चांगल्याप्रकारे समजून येते. असे ते म्हणाले.


अजित पारसनीस यांनी या प्रसंगी त्यांच्या दिवंगत पत्नीच्या काही आठवणी सांगितल्या. तिच्या खंबीर साथीमुळे मी अतिशय खडतर अशी ही जबाबदारी पूर्ण करू शकलो, असे आवर्जून सांगून पुढे ते म्हणाले, 'सध्याचे वातावरण पाहता पोलिसांना यापुढे अग्निपथावरून चालावे लागणार आहे. परंतु मला खात्री आहे, की आमचे पोलीसदल सर्व प्रसंगांचा सामना धैर्याने व सक्षमपणे करेल आणि नेहमीप्रमाणे त्यांच्या धर्मपत्नी त्यांची पूर्णपणे साथ देतील.'

या पुस्तकाला IPS Director General of Police (Retd.) डॉ. मीरा बोरवणकर यांची अतिशय समर्पक प्रस्तावना लाभली आहे. त्या म्हणतात, हे पुस्तक वाचून झाल्यावर माझ्याप्रमाणेच वाचकही पोलीसपत्नींना मनापासून सलाम करतील, याची खात्री मला वाटते. तसेच, सर्व पोलीसदलाकडे लोक नक्कीच एका पूर्णतः नवीन प्रशंसापूर्ण दृष्टिकोनातून पाहतील. ●

---

### 'ललिताक्षरं' पुस्तक प्रकाशन

चार मैत्रिणींच्या सहज आविष्कारातील 'ललिताक्षरं' पुस्तकाचे चिन्मयी सुमित यांच्या हस्ते नुकतेच प्रकाशन झाले.




टॅग आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनेत्री–लेखिका–दिग्दर्शिका संपदा जोगळेकर यांनी संपादित केलेलं आणि प्रा. विजया पंडितराव, वसुधा सहस्रबुद्धे, वासंती वर्तक आणि चारुशीला धर या चार मैत्रिणींच्या लालित्यपूर्ण लेखणीतून निर्माण झालेल्या 'ललिताक्षरं' या ललितलेख 'ग्रंथाली'च्या संग्रहाचे प्रकाशन काशीनाथ घाणेकर येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी चिन्मयी म्हणाल्या, की चारही लेखिकांचे लेख वाचनात खिळवून ठेवतात.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या हर्षदा बोरकर यांनी हे लेख म्हणजे अनुभवाचा कवडसा असल्याचे म्हटले. यावेळी संपदा जोगळेकर–कुलकर्णी यांनी या पुस्तकाच्या संपादनामागची भूमिका विशद केली. या चारही लेखिकांनी त्यांच्या पुस्तकातील एकेक लेख वाचून दाखवले. ●

# एका प्रशासकीय अधिकाऱ्याचं अनुभवकथन!

ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या हस्ते प्रकाशित झालेल्या सुरेश काकाणी लिखित यांच्या 'मुंबई फाइट्स बॅक' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन करताना बढ़ती हैं लपटें भयकारी; पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या उपस्थितीत आणि कोविडयोद्ध्यांच्या हस्ते नुकतेच मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात झाले.

'लढा मुंबईचा कोविडशी' : 'एका प्रशासकीय अधिकाऱ्याचं अनुभवकथन' असे शीर्षक असणाऱ्या हे पुस्तक वैशाली रोडे यांनी इंग्रजीतून मराठीत भाषांतरित केले असून ग्रंथालीने प्रसिद्ध केले आहे. या पुस्तक प्रकाशन समारंभाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे कोविडविरोधातील लढ्यात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या महानगरपालिकेच्या 'सी' विभागात काम करणारे स्वच्छता कामगार संदेश जाधव, जिजामाता नगरमध्ये आशा सेविका म्हणून कार्यरत असणाऱ्या मनीषा कांबळे, सेवन हिल्स रुग्णालयात 'वॉर्ड बॉय' म्हणून काम करणारे प्रवीण परब, शीव रुग्णालयातील अधिपरिचारिका (नर्स) वैशाली पालये आणि कस्तुरबा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर चंद्रकांत पवार यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.




ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली प्रकाशनच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

पुस्तक प्रकाशन समारंभात उपस्थितांशी संवाद साधताना समारंभात पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने म्हणाले, की 'कोविडकाळामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व कामगार–कर्मचारी–अधिकाऱ्यांनी अथक आणि अविरत काम करून कोविडशी दिलेला लढा हा जगात अतुलनीय आहे. त्यामुळेच 'मुंबई मॉडेल' म्हणून सुप्रसिद्ध झालेल्या या लढ्याची अत्यंत समर्पक आणि प्रभावी नोंद ओघवत्या शैलीत घेणाऱ्या सुरेश काकाणी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन स्वच्छता कामगार, आशा सेविका, वॉर्ड बॉय, नर्स आणि डॉक्टर यांच्या हस्ते होणे, ही बाब निश्चितच चपखल आणि कौतुकास्पद आहे.' याप्रसंगी डॉ. लहाने यांनी त्यांचे कोविडकाळातील अनुभव आणि त्यावेळी काकाणी यांनी केलेल्या सहकार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

लेखक सुरेश काकाणी यांनी आपल्या भाषणात मुंबईसारख्या लोकसंख्येची घनता जास्त असलेल्या शहरात कोविड विषाणूचा मुकाबला करणे, हे अत्यंत मोठे आव्हान होते, असे सांगितले. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिवस रात्र एक करून केलेल्या कामांमुळे मुंबईचा कोविड विरोधातील लढा हा यशस्वी झाला असल्याचे सांगतानाच या लढ्याचे श्रेय हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चमूला असून 'लढा मुंबईचा कोविडशी' हे पुस्तक आपण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संपूर्ण चमूला अर्पण केले असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) संजय कुऱ्हाडे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना पुस्तकाचे लेखक व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांच्या व्यवस्थापकीय कौशल्याचा आणि मार्गदर्शनाचा कोविडविषयक नियोजन व व्यवस्थापनात खूप फायदा झाला आणि त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मुंबईच्या कोविड लढ्याला मोठे बळ मिळाले असे सांगितले. तर संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये) डॉक्टर नीलम अंद्रादे यांनी आपल्या मनोगतात कोविडकाळातील अनुभव नमूद करताना काकाणी यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाचा कसा फायदा झाला, याबद्दल सविस्तर विवेचन केले. लोकमान्य टिळक सर्वोपचार रुग्णालय व वैद्यकीय म हाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर मोहन जोशी यांनी कोविडकाळातील आपले अनुभव सांगतानाच काकाणी यांचे पुस्तक हे वैद्यकीय क्षेत्रातील मंडळींनी आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचावे, असेच झाले असल्याचे नमूद केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉक्टर मंगला गोमारे यांनी कोविडकाळात सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेपुढे उभ्या राहिलेल्या विविध आव्हानांचा मुकाबला करताना काकाणी यांच्या मार्गदर्शनाचा आणि प्रशासकीय कौशल्याचा खूप फायदा झाल्याचे आवर्जून नमूद केले. कितीही मोठे आव्हान असले किंवा समस्या असली, तरी ती अत्यंत शांतपणे आणि संयमाने हाताळण्याचा काकाणींचा सद्गुण अनुकरणीय असल्याचेही त्या म्हणाल्या. या कार्यक्रमादरम्यान लेखक सुरेश काकाणी यांची प्रकट मुलाखत डॉ. मृण्मयी भजक यांनी घेतली. या मुलाखतीदरम्यान डॉक्टर भजक आणि उपस्थितांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना काकाणी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रभावी उत्तरे दिली.

**– गणेश पुराणिक**

# ग्रंथपरिचय



**डॉ. निर्मोही फडके**
९९२०१ ४६७११

**घेतला वसा**
**सूर्यबाला**
**अनुवाद : शुभदा फडणवीस**




हिंदी साहित्यातील ज्येष्ठ साहित्यिक सूर्यबाला ह्यांची 'मेरे संधि पत्र' ही दीर्घकथा १९७२ साली प्रकाशित झाली. ह्या दीर्घ कथेला आणि सूर्यबाला ह्यांनी लिहिलेल्या इतर दोन कथांना मराठी वाचकांपर्यंत पोहोचवले आहे, अनुवादक शुभदा फडणवीस ह्यांनी.

स्त्री आणि पुरुष ह्या दोघांमधील लिंगभिन्नतेला असलेले सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक पदर आणि त्यामुळे निर्माण होणारे नातेसंबंधांतील ताणतणाव हा ललित साहित्याकरता महत्त्वाचा विषय राहिलेला आहे.

'पुरुषास स्त्रीस अंकित ठेवण्याचे फायदे माहीत आहेत, परंतु ज्या दिवशी त्याला स्वतंत्र, सक्षम स्त्रीच्या सहवासाचे फायदे कळतील, त्या दिवशी तो तिच्यावरची पकड सैल करण्याचा विचार करू लागेल.' – सिमोन द बोव्हुआर.

'घेतला वसा'मधील नायिकेच्या बाबतीत हे गृहीतक एका वेगळ्या प्रकारे लागू होईल. विसाव्या शतकातील एका गरीब भारतीय कुटुंबातील ही सर्वगुणसंपन्न मुलगी. कला–क्रीडा ह्यांची आस असलेली. बिजवर उद्योगपतीसह लग्न करण्यास तिला होकार द्यावा लागतो, कारण घरची आर्थिक परिस्थिती. तो दोन लहानग्या मुलींचा बापही असतो. त्या दोघींची 'आई' म्हणूनच तिचा गृहप्रवेश होतो. त्या क्षणापासून ती स्वतःमध्ये संपूर्ण कायापालट घडवून आणते. जणू आधीचे तिचे रसरशीत आयुष्य ती जगलीच नव्हती. इथे पुन्हा सिमोन द बोव्हुआर ह्यांचे वाक्य आठवते, 'स्त्री जन्मत नाही, तर घडवली जाते.'

'घेतला वसा' ही दीर्घ कथा तिच्या दोन मुलींचीही कथा आहे. जी त्या तिघींच्या निवेदनातून वाचकापर्यंत पोहोचते. भारतीय स्त्रीत्वाची ठरावीक चौकट आणि त्यात अडकलेली 'टिपिकल' भारतीय नारी, हे कथानायिकेचे स्वरूप आहे असे प्रथमदर्शनी वाटते, पण साठ–सत्तरच्या दशकांतील ह्या कथानायिकेच्या सोशीकपणाला इतरही वेगळे, चिंतनशीलतेचे कंगोरे आहेत, हे विशेष. तिच्या दोन्ही मुलीही त्या काळातील बदलत्या स्त्रीत्वाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात.

वाचकाला केवळ गुंतवून ठेवणारेच नव्हे, तर लख्खकन काही वेगळे सुचवणारे आशयगर्भ लेखन हे 'घेतला वसा'मधील तीनही दीर्घकथांचे बलस्थान आहे.

'मानसी' ही कथा एका पुरुषाचे निर्मळ आत्मकथन आहे, ज्यामधून दोन मायलेकी आणि त्या पुरुषाची पत्नी अशा तिघींचे व्यक्तिमत्त्व उलगडत जाते.

'कात्यायनी संवाद' हीदेखील प्रथमपुरुषी निवेदन असलेली कथा. मेधा आणि कात्यायनी ह्या दोन मैत्रिणींच्या संवादांतून आपल्यासमोर स्त्रीत्वाचेच नव्हे तर माणूसपणाच्या जाणिवांचे एक अद्‌भुत चित्र उभे राहते.

'मानसी' आणि 'कात्यायनी संवाद' ह्या दोन्ही कथांमधील मुख्य व्यक्तिरेखा ह्या उच्चशिक्षित प्राध्यापक आहेत. 'मानसी'मधील पुरुष व्यक्तिरेखा कमालीची संवेदनशील, तर कात्यायनी तितकीच कणखर आहे. प्रेम करण्याचे टोकाचे विरोधी सूर आणि 'स्व'त्व जपतानाही जगण्याकरता कराव्या लागणाऱ्या तडजोडी ह्या सर्व कथांमधून आपल्याला अनुभवायला मिळतात.

स्त्रीवादी विचारांचा प्रभाव असलेल्या १९७५ नंतरच्या कालखंडापूर्वीच त्यांचे अतिशय चिंतनशील रूप 'मेरे संधि पत्र' अर्थात 'घेतला वसा'मध्ये आपल्याला दिसून येते.

अनुवादामुळे होणारी दोन भाषांच्या लेखन–कृतींमधील अनेकपदरी देवाणघेवाण ही जितकी मोहक ठरते, तितकीच ती महत्त्वपूर्णही असते. इतर भारतीय भाषांमधील रचनावैविध्य, आशय, सांस्कृतिक संदर्भ, जगण्याचे नवे आयाम, भावभावना, जाणिवांचे–नेणिवांचे रंग इत्यादी वाचकांपर्यंत पोहोचण्याकरता अनुवाद प्रक्रिया गरजेची ठरते. अर्थात तो अनुवाद तितकाच समतोल, सर्वव्यापी असावा लागतो. 'घेतला वसा' वाचताना ह्याचे प्रत्यंतर येते. शुभदा फडणवीस ह्यांनी मूळ लेखनकृतीमधील आशय अतिशय अभ्यासपूर्ण रितीने मराठी भाषेमध्ये शब्दबद्ध केला आहे. अनुवादामध्ये कथांमधील लालित्य सजगतेने प्रवाही ठेवले आहे. अगदी काही मोजक्या जागी मूळ हिंदी शब्द तसेच वापरल्यामुळेही मराठी वाक्यांचे भावसौंदर्य खुलून आल्यासारखे वाटते. उदा. 'विलायती चिंच' हा मराठी शब्द न वापरता 'चिचबिलाई' हा मूळ हिंदी शब्द तसाच वापरणे, इत्यादी.

भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय सांस्कृतिक, सामाजिक धारणा आणि जगण्याकरता आवश्यक असलेली स्त्रीत्वाची तसेच माणूसपणाची सशक्त जाणीव ह्यांचा मिलाप 'घेतला वसा'मधील तीनही दीर्घकथांमधून प्रभावीपणे साकार होतो.

'कात्यायनी संवाद' कथेतील कात्यायनीचे शेवटचे उद्‌गार हे ह्या सशक्त जाणिवेचे प्रतिनिधित्व करतात.

'...माझ्या या भोगवट्याकडे बघताना ती एका शोषित असहाय्य स्त्रीची कहाणी म्हणून बघू नकोस. मला कसलंच बंधन नाही... मी शोषित, प्रतारित असण्यासाठी बाध्य नाही. 'बिचारेपणा'बद्दल माझ्या मनात चीड आहे. माझा आत्मा, माझा विवेक जसं मार्गदर्शन करतो तशीच जगते मी. माझ्या जगण्याला तू दुर्बलता समज, दुरभिमान समज वा परिस्थितीशरणता समज... स्वतंत्र आहेस तू.'

**'मेरे संधि पत्र' (हिंदी उपन्यास)** मूळ लेखक – सूर्यबाला
**'घेतला वसा' – मराठी अनुवाद**, अनुवादक – शुभदा फडणवीस
मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस
पृष्ठसंख्या १३३, मूल्य २०० रुपये

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**‘भक्ती’पंथेचि जावे**
**भक्ती बर्वे-इनामदार**
**संपादन : अरुण घाडीगावकर**




**फुलराणीचा शब्दातून व्यक्त झालेला स्मृतिगंध**

*‘‘मम्मी पाठोपाठ वर्षभरातच माझा दादा, आमचे बापू आणि मग शफी! हे सारं काय उजव्या सोंडेच्या गणपतीमुळे? तो पावला नाही मला? कुणास ठाऊक? ईश्वरी संकल्पनेविषयी मीच साशंक आहे/झालेय. सांगोवांगी असते, तेव्हा त्याला अंधश्रद्धा म्हणतात आणि स्वानुभव असला की श्रद्धा? मग ईश्वरी शक्ती, ईश्वरी शक्ती असं म्हणतात ते काय असतं? उजव्या सोंडेचा गणपती अजूनही माझ्याकडे आहे. एवढं होऊनही मी त्याचा त्याग केलेला नाही, करणार नाही.’’*

आपल्या अभिनयाने रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारी अभिनयसम्राज्ञी म्हणजे भक्ती बर्वे. ‘फुलराणी’ असा शब्द उच्चारताच नजरेसमोर उभे राहते आणि ‘तुला शिकवीन चांगलाच धडा’ म्हणणारी भक्ती बर्वे! ‘ती फुलराणी’ अशी ओळख लाभलेली अभिनय सम्राज्ञी भक्ती बर्वे यांना आजही रसिकमनाच्या हृदयात अढळ स्थान आहे. ज्यांनी भक्ती बर्वे यांचा अभिनय पाहिला ते भाग्यवानच म्हणायला हवेत.

भक्ती बर्वे यांना लाभलेला कालखंड १९४८ ते २००१ असा आहे. यातला अगदी सुरुवातीचा सात-आठ वर्षांचा काळ सोडला तर उर्वरित संपूर्ण कालखंड त्यांच्या झळाळत्या कारकिर्दीचा साक्षीदार आहे. काही काळ आकाशवाणी व नंतर दूरदर्शनवर त्यांनी काम केले आणि तिथेही आपल्या कामाची छाप उमटवली आहे. तरी रसिकमनाला त्यांची झालेली ओळख ही गुणी, दर्जेदार अभिनेत्री हीच होती व आजही ती कायम आहे. बालनाटकातून रंगभूमीवर आलेल्या भक्ती बर्वे पुढे रंगभूमीसाठीच आपला जन्म आहे, इतक्या तन्मयतेने त्या त्याच्याशी एकरूप राहिलेल्या आहेत. त्यांनी ज्या नाटकांतून आपल्या अभिनयाची मोहोर रसिकमनावर उमटवलेली आहे त्यांची यादी पाहिली तर आपल्या लक्षात येते की ती सर्वच नाटके दर्जेदार होती, आणि ती ओळखली गेली ती भक्ती बर्वे या नावानेच. मराठी रंगभूमीवर त्यांचा वावर जितका सहज आणि लीलया होता तितकाच तो हिंदी आणि गुजराती रंगभूमीवर होता. अशा गुणी अभिनेत्रीच्या हातून झालेले लेखन हे त्यांच्या अभिनय, निवेदनाइतकेच दर्जेदार आणि रंजक आहे. त्याचा प्रत्यय ‘भक्ती’पंथेचि जावे’ या लेखसंग्रहातून येतो.

भक्ती बर्वे यांची स्नेहमांदियाळी हा खरे तर स्वतंत्र पुस्तकाचा विषय ठरेल. दामू केंकरे, सुधा करमरकर, अमरीश पुरी, अशोक हांडे, सुधीर भट, ज्योत्स्ना भोळे, माणिक वर्मा, वंदना गुप्ते, पु.ल. देशपांडे, शफी इनामदार, शौनक अभिषेकी ही काही नावे, ज्यांचा या संग्रहात समावेश केलेला आहे. हा समावेश केवळ नाममाहात्म्य सांगण्यासाठी नाही, तर त्यांच्यातल्या माणुसकी आणि माणूसपण, अभिनय, कर्तव्यनिष्ठा, कलासद्गुणांच्या अलंकाराना सांगणारा आहे. त्या राहत असलेल्या मॉडेल हाऊस आणि परिसरात अनेक तपस्वी मान्यवर राहात असत. त्यापैकी दामू केंकरे हे एक होत. त्यांच्यामुळे आपण या क्षेत्राशी जोडले गेलो याचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात, त्यात सुधा करमरकर आणि साहित्य सघाचाही वाटा आहेच.

साहित्य संघ या संस्थेविषयी असलेला जिव्हाळा, प्रेम, कृतज्ञता आणि आपलेपणा त्यांच्या शब्दात व्यक्त झालेला आहे तो असा,‘‘नाटकाची आवड निर्माण व्हायला साहित्य संघांने खतपाणी घातलं. कलानंद घेण्याचं बीज संघानं रोवलं. ज्येष्ठश्रेष्ठ नाट्यकर्मींची ओळख संघामुळे झाली. ज्या साहित्यसंघांने अनेक कलाकार घडवले, अशा त्या संस्थेतून मी रंगभूमीवर पदार्पण केलं, याचा मला आनंद आणि अभिमान आहे. कोवळ्या वयातले संस्कार असे रुजले आहेत, की आजही साहित्य संघाबद्दल कुणी चांगलं बोललं नाही तर मी दुखावते.’’


भक्ती बर्वे यांच्याकडे रंगभूमीशी निगडित अनुभवांचा समृद्ध असा खजिना होता. त्या अनुभवांचा परिचय वाचकांना व्हावा यासाठी ‘लोकप्रभा’ने त्यांच्याकडून आग्रहपूर्वक लेखन करवून घेतले. त्या लेखांचे हे पुस्तक आहे. रंगभूमीवर सादर होणारा प्रत्येक प्रयोग हा नवाच असतो. प्रेक्षकांचा प्रतिसाद नटाला जिवंत ठेवतो, त्याची उभारी वाढवतो, त्याचे अस्तित्व जपतो. नेहमीच नटाला आपल्या अटीवर जगता येत नाही. नाटकात काम करणे ही केवळ हौस नाही. थिएटर हा आयुष्यातला फार मोठा आधार आहे. एकांकिका स्पर्धा ही रंगभूमीला उपकारक ठरणारी चळवळ आहे. कलावंतनिमिर्तीबरोबर प्रेक्षक घडवण्याचे महत्त्वाचे काम या स्पर्धांमुळे नकळत झालेले आहे. लिटल थिएटर (बालरंगभूमी) या संस्थेने उत्तम नाट्यकर्मीच नाही, उत्तम प्रेक्षक घडवण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. अशा स्वअनुभवांना त्यांनी मोकळेपणाने व्यक्त केले आहे. अनेकांच्या आठवणी, काही हृद्य, काही दुःखद, काही उभारी देणाऱ्या. या सगळ्या भक्ती बर्वे यांच्याशी निगडित आहेत. त्यातून त्यांची रंगभूमी, प्रेक्षक, सहकलाकार, भेटलेल्या व्यक्ती, घटना, याकडे पाहण्याचा, त्यांचा शोध घेण्याचा, त्यातून स्वतःला तपासून पाहण्याचा दृष्टिकोन आपल्याला दिसून येतो. हे काही त्यांचे चरित्र नाही, पण त्यातले काही अंश नक्कीच सापडतात. विशेष हा, की यातून त्यांनी स्वतःचा उदोउदो केलेला आहे, असे कुठेही आढळत नाही, उलट घेतले ते लहानपणच! यातून त्यांचा कालखंड उभा राहतो तोही एका गुणी दर्जेदार अभिनेत्रीच्या नजरेतून!

अरुण घाडीगावकर यांनी या पुस्तकाचे संपादन केलेले आहे. नाट्यसमीक्षा, मुलाखती, रंगभूमीविषयक विपुल लेखन त्यांनी केलेले आहे. त्यासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. सतीश भावसार यांनी सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य २५० रुपये    सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

**महती मैदानांची**
**भास्कर सावंत**




**अशी मैदाने, अशी महती**

*''सोशल सर्व्हिस लीगचे मैदान हे जसे खेळाने, विद्यार्थ्यांच्या कवायतीने बहरलेले होते तसे ते त्याकाळी कलाकारांनीही वेढले होते. तेव्हा दिग्गज कलाकारांचे भेटण्याचे हक्काचे ठिकाण म्हणून जनमानसात हे मैदान 'अ‍ॅक्टर पार्क ' म्हणून रूढ होते. मात्र अनेक कलाकारांचा आधार असलेले हे मैदान कामगार रंगभूमीची अवस्था पाहताना दुखावते. नाट्यकर्मीचे वैभव पाहताना बहरतेही, पण हीच कला चार भिंतीत बंद होऊन पाहताना, नाट्यरंगभूमीकडे पाठ फिरवणाऱ्या नाट्यरसिकांची अजची मनःस्थिती पाहताना हळहळतेही.''*

खेळ आणि मैदानाचे नाते हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असाव्यात इतके घट्ट आहे. मैदानासाठी मोठ्या मोकळ्या जागेची आवश्यकता असते. ती अडचण मुख्यत्वे जाणवते शहरांतून, जिल्हा पातळीवरील गावांतून. त्यातून तुलना करायची झाल्यास मुंबई हे शहर म्हणजे सगळ्यात कमी मोकळी जागा असणारे महानगर. या शहराच्या विकासआराखड्यानुसार एक हजार लोकसंख्येसाठी चार एकर जमीन मोकळी, मैदानासाठी असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात ती आहे साडेचारशे फूट! त्यामुळे इथे एकेकाळी असलेली मोठमोठी मैदाने बऱ्याचअंशी संकोचलेली आहेत. त्यांचे जे काही अस्तित्व आज दिसत आहे त्यासाठी अनेकांनी लढे दिलेले आहेत, हे विसरता येत नाही. अशा मुंबईसह कोकण, पश्चिम महाराष्ट्र या भागात असलेल्या मैदानांची माहिती, तिथे सुरू असलेल्या खेळाविषयीची माहिती संकलित करून ती आपल्यापुढे ठेवली आहे क्रीडाप्रेमी, क्रीडाकार्यकर्ते भास्कर सावंत यांनी.

मुंबईत प्रामुख्याने परिचित असणारी मैदाने, पार्क म्हणजे शिवाजी पार्क, आझाद मैदान, ऑगस्ट क्रांती मैदान, जांबोरी मैदान, भवानीमाता क्रीडांगण, गोदरेज मैदान, ओम समर्थचे मैदान, कामगार मैदान, एस.एम. जोशी मैदान. परंतु याशिवाय मुंबईच्या इतर भागात अनेक मैदाने आहेत, त्यांनी स्वतःची वैशिष्ट्ये जपलेली आहेत. यात विशेष ठरावीत अशी शैक्षणिक मैदाने आहेत, जशी राजा शिवाजी विद्या संकुल, अँटनी डिसिल्वा हायस्कूलचे मैदान, रुईया कॉलेज. शिवाय पारशी, हिंदू, कॅथलिक, बॉम्बे जिमखाना यासारखे क्लबही आहेत.

एकोणिसाव्या शतकात युरोपीय पोलो ग्राऊंड म्हणून ओळख असणाऱ्या मैदानाला कापाचे मैदान असे संबोधले जाई. तेच मैदान पुढे स्वातंत्र्याच्या लढ्यात सभेसाठी उपयुक्त ठरले. त्यामुळे स्वातंत्र्य म्हणजेच आझादी मिळवून देणाऱ्या मैदानाची पुढे ओळख निर्माण झाली ती आझाद मैदान अशी. ७ ऑगस्ट १९४२ रोजी ज्या मैदानावर काँग्रेस अधिवेशन भरले, त्यात म. गांधीजींनी 'चले जाव'चा नारा दिला ते मैदान म्हणजे गोवालिया टँक. तेच मैदान 'ऑगस्ट क्रांती मैदान' म्हणून ओळखले जाऊ लागले. माहीम पार्क म्हणून प्रसिद्ध असलेले मैदान छत्रपती शिवाजीमहाराजांच्या त्रिशतक जन्मदिनाचा योग साधून शिवाजी पार्क झाले. त्यासाठी तसा ठराव पास झाला.

कोल्हापूर, सांगली, मिरज ही नावे ओळखली जातात ती प्रामुख्याने कुस्तीसाठी. तेथील आखाडे, तालमी, व्यायामशाळा ही त्या नगरींची भूषणस्थाने आहेत. कोकणातील कर्जत, भांबेड, डेरवण, महाड आणि रत्नागिरी येथील मैदानांचा आढावा घेतलेला आहे. तो घेताना, लेखक कोकणात असलेल्या सर्व नद्यांचा आणि लाभलेल्या समुद्रकिनाऱ्याचा आवर्जून उल्लेख करतात. चौदा मोठ्या नद्या आणि सातशे किमीचा समुद्रकिनारा असे वैभव हाताशी असूनही जलतरण क्रीडाप्रकारात कोकण प्रकर्षाने कुठे दिसतो, असा प्रश्न उपस्थित करतात.

मुंबईची अलीकडील ओळख क्रिकेट खेळामुळे अधिक लोकप्रिय झालेली आहे. त्यासाठी मोठमोठी मैदाने व क्लब इथे आहेत. परंतु त्यांचा सदुपयोग सर्वसामान्यासाठी होण्याऐवजी ती महागडी ठरत आहेत, त्यांचा उपयोग तारांकित क्लब म्हणून केला जात आहे याचीही खंत लेखक व्यक्त करतात.

लेखक केवळ मैदानांची, क्रीडाप्रकारांची माहिती या पुस्तकात देतात असे नाही, त्यासोबत त्या मैदानांचा इतिहासही सादर करतात. त्यात सक्रीय असलेल्या ध्येयनिष्ठ नामवंत व्यक्तींची माहिती देतात, ज्याच्या कार्याचा अभिमान वाटावा. त्या मैदानावर खेळल्या जात असलेल्या क्रीडाप्रकारात नावारूपाला आलेले खेळाडू, त्यांना मिळालेले सन्मान, यांचीही माहिती नावांसह देतात. यात कुस्ती, खोखो, कबड्डी, जलतरण, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, क्रिकेटमध्ये अग्रेसर ठरलेल्या खेळांडूची नावे आहेत.

इस्राएली व्यक्ती डेव्हीड ससून यांचे कार्य, त्यानुसार नामवंतांची दिलेली यादी, मैदाने, खेळ, व्यक्ती, इतिहास, आकडेवारी अशी सर्वांगीण माहिती या पुस्तकात लेखकाने दिलेली आहे. ही सर्व माहिती लेखस्वरूपात प्रसिद्ध झालेली असून एक दस्तऐवज ठरावी इतकी ती उपयुक्त आहे. ती देत असताना सगळेच सुरळीत, ठाकठीक आहे अशी भलावण लेखकाने केलेली नाही. जिथे जिथे उणिवा आहेत, खटकणारे आहे, त्याविषयी खंत व्यक्त केलेली आहे. ऱ्हास होत असलेल्या मूल्यांकडे लक्ष वेधले आहे. अधिकाधिक मैदाने उपलब्ध व्हावीत, आहे ती अशीच अबाधित राहावीत, ज्यांनी ही मैदाने वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे. त्यांच्या ध्येयाचे चीज व्हावे, महाराष्ट्र हा सतत खेळता राहावा, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. त्यापाठी त्यांची पंचेचाळीस वर्षांची तपश्चर्या आहे.

वि.वि. करमरकर, ज्येष्ठ क्रीडा पत्रकार यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना या पुस्तकासाठी लिहिलेली आहे. भास्कर सावंत यांचे मनोगतही पुस्तकातील पंचेचाळीस लेखांइतकेच वाचनीय आहे.


लेखक भास्कर सावंत अनेक क्रीडासंस्थांशी जोडलेले आहेत. मैदान बचाव चळवळीचे संस्थापक अध्यक्ष आहेत. कला-साहित्य या प्रांतात त्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. काव्यसंग्रह, अनुवाद, नाट्यलेखन, संपादन याबरोबरच राजकीय कारकिर्दीची त्यांना पार्श्वभूमी आहे. सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ नेटके आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

## ओवळी

**विद्या प्रभू**




**परंपरा आणि समाजमनाचा शोध**

*''ओवळीचं फूल लहान, बटणाएवढं आणि नाजूकही. त्याला देठही नाही. म्हणून त्यांची पाती किंवा वळेसर गुंफता येत नाही. पण इतकं सुगंधी फूल माळायला हवंच, पण कसं? मग ध्यानात आलं, फुलाला देठ नाही पण मध्यभागी वेज आहे. त्यात दोरा सहज ओवता येतो, अगदी सुईविना. बहुधा म्हणूनच मालवणी मुलखातल्या स्त्रियांनी त्यांना 'ओवळा' (नपु.) म्हटलं आणि ती ज्या झाडाला लागतात त्याला 'ओवळी' (स्त्री) म्हणतात. 'ओवळी', प्रमाण मराठीत आहे 'बकुळी'.''*

निसर्गाचे अप्रतिम रूप मनाला मोहिनी घालते. त्याच्या विविध रंगीबेरंगी छटा, नाजूकसा राठपणा मनाला भुरळ घालतो. पानाफुलांचा हळुवारपणा, डेरेदार वृक्षांचा उमदेपणा आणि कणखर असूनही आई झालेली पर्वतरांग कधी कवेत घेते तेही कळत नाही. नजरेला आव्हानच देत थेट मानवाचे खुजेपण दाखवत आपल्या मस्तीत जगणारा अथांग पसरलेला विशाल दर्याराज आपला मित्र, सखा असल्यासारखा सलगी करताना पाहून तर जीव हरखून जातो. अर्थात हे सारे अनुभवणारे मन कोमल असावे लागते आणि नजरेतून अंतःकरणापर्यंत जाणारा रस्ता अलवार सुगंधी पावलासाठी निर्वेध, निष्कंटक आणि तितकाच प्रशस्त मोकळा असावा लागतो. हे ज्याच्याकडे आहे त्याच्यासाठी निसर्ग स्वर्ग आहे आणि तो जगातला सर्वात भाग्यवान. असा स्वर्ग म्हणजे कोकण आणि भाग्यवान आहेत विद्या प्रभू!

कोकणच्या निसर्गसौंदर्याची वर्णने बा.भ. बोरकर, वसंत सावंत यांपासून अनेक कवींनी केलेली आपण वाचलेली आहेत. श्री.ना., खानोलकर, मधुमंगेश यांसारख्या प्रतिभावंतांच्या साहित्यातून आलेला कोकण साक्षात आपल्या रसिकमनाच्या अंगणात आपण अनुभवला आहे. तिथला नुसता निसर्गच नाही, तर तिथली माणसे, संस्कृती, बोली, सण, होणारे बदल, यांच्याशी आपले नाते त्यातून जोडले गेले आहे. त्यामुळे साहित्यातून हा कोकण आपल्या भेटीला येतो, तेव्हा त्याचे प्रत्येक वेळी नवे रूप असते आणि आपण त्याचे अगत्याने आस्थेने स्वागत करतो. कारण प्रत्येक वेळी तो नव्या उत्साहाने आपल्या भेटायला आल्याचा आनंद देणारा असतो. हे सर्व सांगण्याचे कारण 'ओवळी' हा विद्या प्रभू यांचा लेखसंग्रह!

विद्या प्रभू या कोकणकन्या! त्यांच्या एकूण साहित्यातून निर्झरासारखा हा कोकण अविरतपणे प्रवाहित आहे असे आपल्याला दिसून येते. आतापर्यंत त्यांची पाच पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. मालवणी भाषेतील म्हणी, मालवणी बोलीभाषेतील वाक्प्रचार व हुमाणी, कोकणातील लोककथा आणि गजाली, शब्दसौरभ, अबोली, ही त्यांची यादी. त्यात 'ओवळी' हा लेखसंग्रह त्यांच्या साहित्यमालेत माळले गेलेले एक नवीन सुंदर, अलवार, कोकणगंधभारीत फूल.

या लेखसंग्रहात एकूण सतरा लेख आहेत. हे 'परिपूर्ण' या सदरात मोडणारे लेख आहेत. लेखासाठी केवळ विषय पुरेसा नसतो, त्याला पूर्ण आकार देणारी संदर्भसामग्रीचीही आवश्यकता असते. बोलीभाषा, परंपरा, संस्कार, व्यवहार, श्रद्धा यांच्यासोबतच लेखकाला स्वतःचा आवाकाही तपासून पाहावा लागतो. त्याला अभ्यास, तत्त्वज्ञान, चिंतनाची कास असावी लागते. हे सारे मंथन जुळून आले तरच समाधान देणारा नवनीताचा थर दिसू लागतो. असे थरभारले लेख या संग्रहात आहेत, याचे मोठे समाधान हे लेख वाचल्यानंतर आपल्या मनाच्या पृष्ठभागावर विसावल्याचे अनुभवास येते. 'मत्स्यसूक्त' हा लेख 'मासे' याविषयी आहे. समुद्र, नद्यानाले यातून मिळणाऱ्या माशांच्या नावांची त्यांनी यादी दिलेली आहे. ती जवळपास एकूणचाळीस इतकी भरते. याशिवाय इतर जिवाणू वेगळे. त्याचप्रमाणे या माशांच्या संदर्भास अनुसरून आलेल्या चोवीस म्हणी अर्थ आणि संदर्भासह दिलेल्या आहेत. 'तारली व्हकाल, बांगडो न्हवरो' या लेखात तारली आणि बांगडा या माशांच्या लग्नाचा विषय आहे. परंतु या श्रद्धेय परंपरेला जोडून मेंढा-मेंढी, बकरा-बकरी, तुळस आणि श्रीकृष्ण, रवळनाथ आणि सातेरीदेवी, मेघराज आणि धरित्री, उषा आणि रवी, यांच्याही लग्नांचा आढावा या लेखात घेतलेला आहे. यात समजुती, अपेक्षा, श्रद्धा, पद्धती, यांचाही समावेश आहे. 'गोंधळ','गजाल', 'जिवाभावाची चवथ', 'आज धयकाल्याचो दिस' हे लेख कोकणातील परंपराचा शोध घेत एकूण समाजमनाचा शोध घेतात. मालवणी भाषेचा गोडवा, महती, समृद्धी, आणि तिच्यातले चैतन्य शब्दसंदर्भासह आलेले आहेत. कालिदासाच्या भाषेचा, कविमनाचा, त्यात आलेल्या उपमा, अलंकार, उपमेयांचा घेतलेला वेध आपल्याला पुन्हा कालिदासाकडे घेऊन जाणारा आहे.

विद्या प्रभू या व्यासंगी लेखिका आहेत. संस्कृत, हिंदी, मराठी आणि इंग्रजी अशा चार भाषांवर प्रभुत्व असलेल्या उत्तम अध्यापिका आहेत. निसर्गाच्या सोबत बोलीभाषा, मानवी मन आणि त्याचे व्यवहार, निसर्ग व त्याची रूपे, तरल अशी निरीक्षणक्षमता, नेमकेपण टिपण्यातली सौंदर्यदृष्टी, प्रत्येक विषयाच्या तळाशी जाण्याची जिज्ञासा, आणि निसर्गावर भरभरून प्रेम करण्याची असोशी, यामुळे या लेखांना स्वतःचे असे वेगळे सौंदर्य लाभलेले आहे. लेखांची मांडणी मुद्देसूद, लेखनात हळुवार तरलपणा, साधी-सोपी अनलंकृत भाषा तरीही स्वतःचे वैभव असलेली. शब्दांचे अर्थ, त्यांची केलेली उकल, आवश्यक तिथे त्यांचे व्याकरणस्वरूपातील स्थान, भरभरून व्यक्त होण्यातील ऊर्जा, संतसाहित्य, भगवद्गीता, पुराणे, सूक्ते, म्हणी, संस्कृत-इंग्रजी भाषांतील वचने, यांचा अभ्यास व केलेली चपखल योजना, त्यामुळे हे लेख वाचनीय व संस्मरणीय ठरले आहेत.


या लेखसंग्रहाला रोहिदास पोटे, यांची आशयघन प्रस्तावना आहे. लेखिका आणि लेखसंग्रह यावर त्यांनी सुंदर अभ्यासपूर्ण विवेचन केलेले आहे. लेखिकेने दोन शब्दांत मांडलेले त्यांचे मनोगत लेखसंग्रह समजून घेण्यासाठी साहाय्यभूत ठरावे, असे आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि लेखांना उठाव देणारी आतील बोलकी चित्रे सरदार जाधव यांची आहेत.

**मूल्य ३५० रुपये  सवलतीत २१० रुपये**

## ग्रंथपान

**शिवाची शक्ती भाग २**

**शिल्पा जितेंद्र खेर**




**सावलीची ढाल**

'देश स्वतंत्र झाल्यापासून आतापावेतो एकूण शहीद झालेल्या पोलिसांची संख्या सैन्यदलातील हुतात्मा झालेल्या सैनिकांपेक्षा जास्त आहे. सध्या दर वर्षाला २०० ते ३०० पोलीस समाजासाठी शहीद होतात. दहशतवाद व फुटीरतावाद चरणसीमेवर होता, त्या काळात दरवर्षी १००० ते १५०० या संख्येत पोलीस शहीद होत होते. २१ ऑक्टोबर ह्या दिवशी 'पोलीस शहीद दिवस' देशभर हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा केला जातो. ही माहिती समाजापर्यंत पोहोचली तर 'सद्‌रक्षणाय'चा खरा अर्थ कळून येईल.'

पोलीस हा शब्द उच्चारला तरी त्याची अनेक रूपे आपल्यासमोर उभी राहतात. खाकी गणवेश घातलेला, हातात सतत काठी असलेला एक निर्विकार चेहरा, तरी धाक वाटणारा. तो पोलीसठाण्यात असतो तेव्हा त्याचा चेहरा वेगळा असतो आणि तो एखाद्या कामगिरीवर निघालेला असतो तेव्हा आणखी वेगळा. काम गिरी फत्ते झाल्यानंतर, हवे ते यश पदरात पडले, तरी या चेहऱ्यावर फारसा बदल दिसत नाही. तो त्याच्याच एकूण व्यापात असतो, कायम कुठल्यातरी जबाबदारीच्या ओझ्याखाली असल्यासारखा. एखाद्या चौकात वाहतुकीची शिस्त सांभाळताना त्याचे शरीर यंत्रासारखे काम करत राहते. एखादी मोठी घटना घडते तेव्हा त्याच्यातला माणूस जागा होतो ते सर्वशक्तीसह. तहानभूक, झोपविश्रांती यासारख्या सुविधा त्याच्यासाठी नाहीत, तो सतत चोवीस बाय सात कामगिरीवर दिसावा, हीच सगळ्यांची अपेक्षा. तो माणूस आहे, आपल्यासाठी झटतो आहे, हेच मुळी सर्व जण सोयीस्करपणे विसरलेले असतात. हो, इतके असूनही पुन्हा त्याच्याविषयीचा अपप्रचार प्रत्येकाच्या ओठांवर, लाच खाणारा, तत्पर नसणारा, दुर्लक्ष करणारा, असा. यावरून लक्षात येते, की समाज पोलिसांना अजून पुरेसा समजून घेताना दिसत नाही. सगळ्यांच्या साठी अहोरात्र रक्षकाची भूमिका घेणाऱ्या या पोलीस नावाच्या हुद्देकरालाही भावभावना असतात, त्यालाही कुटुंब आहे, या कुटुंबासाठीही त्याने वेळ देणे, जबाबदारी उचलणे, वेळप्रसंगी धावून जाणे, हीदेखील त्याची कुटुंबप्रमुख म्हणून जबाबदारी आहे, हेही आपण नजरेआड करतो. आपल्या या शुष्कवृत्तीला पाझर फोडणे कठीण आहे. मग या पोलिसाच्या कुटुंबाला काय झळ सहन करावी लागत असेल, त्यांना कुठल्या समस्यांना सामोरे जावे लागत असेल, होत असलेला कोंडमारा ते कसे सहन करत असतील, कठीणप्रसंगी आपल्या माणसाचे काय होईल या काळजीने कुटुंबाचा जीव कसा टांगणीला लागत असेल, याची तर आपल्याला कल्पनाच नसते, तसा विचार आपण कधीही करत नाही. हे सगळे मांडण्याचे कारण 'शिवाची शक्ती' हे पुस्तक.

या पुस्तकाच्या लेखिका आहेत शिल्पा जितेंद्र खेर. पोलीस, सैनिक यांच्याविषयी अत्यंत आत्मीयता आणि जिव्हाळा असलेल्या लेखिका. देशप्रेम, देशासाठी आहुती देणारे शूरवीर, त्यांचे कुटुंब, हे त्यांच्या लेखनाचे आस्थेवाईक विषय. समाजाविषयीदेखील त्यांच्या मनात तितकीच आत्मीयता आहे.


'शिवाची शक्ती' हा विषय हाताळताना त्याच्या केंद्रस्थानी आहेत पोलीसदलातील अहोरात्र परिश्रमपूर्वक जिवाची बाजू लावून कामगिरी पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अर्धांगिनी. सावलीसारखी भासत असेल तरीही ढालीसारखी खंबीरपणे साथ देणारी, कुटुंबाची एक बाजू समर्थपणे सांभाळणारी, स्वतःच्या अडचणींचा पाढा बाजूला ठेवून पतीला समजून घेणारी, त्याला लढण्यासाठी बळ देणारी, म्हणून खऱ्या अर्थाने ठरलेली त्यांची, शिवाची शक्ती!


या पुस्तकात एकूण दहा महिला आहेत, अलका राजवाडे, डॉ. सोनाली देशमुख, प्रीती परदेशी, भारती मोहिते, श्रावणी येरुणकर, वंदना फुलारी, स्मिता मोराळे, प्रिया कर्णिक, रोहिणी जोशी आणि शबाना शेख. शिवाची शक्ती म्हणून त्यांना आलेले विविध कडू, कटू, गोड अनुभव लेखिकेने त्यांच्याशी बोलून इथे आपल्यासमोर मांडलेले आहेत. त्यांना मुलाखतीचे स्वरूप आहे. त्यासाठी निगडित परंतु मोजकेच असे प्रश्न लेखिकेने विचारलेले आहेत. एक कुटुंबकर्ती पत्नी आपला संसार आणि स्वतःचे स्वपण कशी जपते, ताणतणावांना कशी सामोरे जाते, आपला पती हा 'सद्‌रक्षणाय खलनिग्रहणाय' म्हणून कार्यरत आहे याची जाणीव कितपत रुजलेली आहे, अशा स्वरूपाचे हे प्रश्न आहेत ज्यातून पत्नीच्या संपूर्ण व्यक्तिम त्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. या सगळ्याच महिला जबाबदार अशा उच्चपदस्थ पोलीस अधिकारी यांच्या पत्नी असल्याने त्यांना अनेक ताणतणावांना सामोरे जावे लागले आहे. २६/११ चा अनुभव आहे. गडचिरोली आणि नक्षलवादी यांचे अनुभव आहेत. शहरी जीवन सोडून निबिड जंगलात कुठलीही सोय नाही अशा दहशती वातावरणात जगणे आहे, तरीही त्यांची निष्ठा, प्रेम, कर्तव्यभावना, उदात्ततेचे समर्पण आहे. हे सगळेच अनुभव आपल्याला पतीपत्नीसोबतच पोलीसदलाचेही अंतरंग दाखवणारे आहेत. आपले पती ज्या दुर्गम घनदाट जंगलात कर्तव्य बजावत असत ते ग्यारहपत्ती जंगल स्वतः एकटीने जाऊन प्रत्यक्ष पाहण्याचे धारिष्ट्य प्रीती परदेशी दाखवतात, त्यावरून लक्षात येते, त्यांची मानसिकता किती प्रगल्भतेने तयार झालेली आहे. या सगळ्याच महिलांना शिवाची शक्ती का म्हटले आहे याचा प्रत्ययही त्यातून येतो. एक मोठा अंतर्मुख करणारा विषय लेखिकेने आपल्यासमोर ठेवला आहे. मुलाखतीचे स्वरूप असल्याने तो नेमकेपणाने आलेला आहे. ओघवत्या शैलीने नटलेला असल्याने तो तितकाच रसपूर्ण झालेला आहे. पोलीस अधिकारी आणि त्यांच्या पत्नी यांचा अल्पपरिचय प्रत्येक मुलाखतीच्या अगोदर दिलेला आहे, तोही उपयुक्त ठरतो.

मेजर सुभाष गावंड यांची अनुभवसंपन्न प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. सतीश भावसारांचे मुखपृष्ठही तितकेच आशयसंपन्न आहे.

**मूल्य ३५० रुपये   सवलतीत २१० रुपये**

पुस्तकप्रकाशन – सचिन आणि अजित तेंडुलकर यांना स्मृतिचिन्ह प्रदान करताना





कार्यक्रम व प्रकाशन क्षणचित्रे



पुस्तकप्रकाशन – 'लढा मुंबईचा कोविडशी'



पुस्तकप्रकाशन – 'ललिताक्षरं'



पुस्तकप्रकाशन – 'नांदगाव ते लंडन' आणि 'उजेड पेरायचा आहे'




पुस्तकप्रकाशन–'कलगीतुरा'




आरोग्याची कॅप्सुल – डॉ. अविनाश फडके आणि डॉ. सतीश नाईक





कॉर्पोरेट गप्पा – ज्ञानेश चांदेकर आणि विश्वास ठाकूर



पुस्तकप्रकाशन – 'श्रमिकांच्या अनोख्या जगात'

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

सारस्वत बँक | सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)



डेअर टू ड्रीम...

प्री-अप्रूव्हड
शैक्षणिक कर्ज
₹1.5 कोटींपर्यंत
@ 10% प्र. व.

विद्यार्थिनींसाठी खास 9.5% प्र.व. व्याजदर

कोर्स फीस्च्या 100% अर्थसहाय्य

परतफेडीचा कालावधी 12 वर्षे
(मोरॅटोरियम कालावधी व्यतिरिक्त)

प्रोसेसिंग फीस् वर 25% सूट

भारतातील आणि परदेशातील शिक्षणासाठी

फॉरेन करन्सी / फॉरेक्स रेमिटन्सच्या खरेदीवरील कमिशनवर 25% सूट
शैक्षणिक कर्जावरील भरलेल्या व्याजदरावर टॅक्स बेनिफिट (इन्कम टॅक्स ऍक्ट 1961 च्या कलम 80E अंतर्गत)

अधिक माहितीसाठी 90290 50027 या नंबरवर मिस्ड कॉल द्या.

ऑफर फक्त मर्यादित कालावधीकरिता

नियम व अटी लागू. एप्रिल 2023
www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.